महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

जानेवारी २०१५ : शके-१९३६

♦ संपादक ♦

श्री. कृष्णकुमार भा. पाटील
सचिव, राज्यमंडळ, पुणे

कार्यकारी संपादक

श्री. अनिल गुंजाळ
सहसचिव, राज्यमंडळ, पुणे

♦ संपादन सहाय्यक ♦

श्री. गोवर्धन सोनवणे
डॉ. उमेश प्रधान
डॉ. स्नेहा जोशी
डॉ. जयश्री अत्रे
डॉ. सुलभा विधाते

♦ सल्लागार मंडळ ♦

| | |
|---|---|
| **श्री. गंगाधर म्हमाणे** | **अध्यक्ष** |
| श्री. लक्ष्मीकांत पांडे | सदस्य |
| श्री. सं. मा. गणोरकर | सदस्य |
| श्री. सुनील चौहान | सदस्य |
| श्री. द. गो. जगताप | सदस्य |
| श्री. भि. पां. कांबळे | सदस्य |
| श्री. सु. ह. डेरे | सदस्य |

# शिक्षण संक्रमण


- परीक्षा पद्धती - काही विचार — डॉ. जयंत नारळीकर — ७
- आई-बाबांची शाळा — डॉ. नीला सत्यनारायण — १०
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची सुवर्णमहोत्सवी वाटचाल — डॉ. ज्योती गायकवाड — १३
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यशिक्षणाची गरज — श्री. सुरेश साळगावकर — १८
- भविष्यवेधी शिक्षण — डॉ. न. म. जोशी — २२
- शिक्षण आणि चारित्र्य — श्री. विजय कुवळेकर — २६
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्रांतीचे तत्त्वज्ञान — डॉ. बबन जोगदंड — २८
- आदर्श शाळा संकल्पना — डॉ. उमेश दे. प्रधान — ३१
- शैक्षणिक नेतृत्वाचे मानसशास्त्र व शालेय गुणवत्ता — श्री. लक्ष्मीकांत पांडे — ३६
- एकविसाव्या शतकातील भाषा शिक्षणाचे महत्त्व — सौ. संजीवनी कुवळेकर — ४०
- Skill Development and Application of the Taxonomy of Psychomotor Domain — Prof. (Dr.) R. H. Dave — ४२
- Facing the Future : Some Reflections — Prof. D. V. Sharma — ४४
- Pathway to Universalisation of Secondary Education in India — Prof. Puran Chand — ४९
- Some Issues for the Consideration of Member-Boards — Prof. D. S. Muley — ५३
- शिक्षणाच्या विकासासाठी अभ्यासिका — श्री. दीपक पां. पोवार — ६०
- उच्च शिक्षणापुढील आव्हाने — डॉ. मोहन खेडकर — ६५
- शैक्षणिक अंधश्रद्धा निर्मूलन — श्री. महेंद्र बैसाणे — ६८
- माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपक्रमाचे महत्त्व — प्रा. सौ. नीला कदम — ७२
- शिक्षकांनी स्वत:ला समृद्ध कसे करावे ? — श्री. शहाजी ह. ढेकणे — ७५
- यशवंत व्हा ! जयवंत व्हा !!! — डॉ. हेमंत म.पेडणेकर — ७८
- राष्ट्रभाषा हिंदी के विकास में महाराष्ट्र राज्य का योगदान — श्री. गोविंद म. दाभोलकर — ८२
- आजच्या शिक्षणपद्धतीतील उणिवा व उपाययोजना — श्री. बा. ल. नागवेकर — ८५
- शिक्षणातून असा साधावा राष्ट्रविकास — सौ. वैष्णवी बोरगावकर — ८९
- एकविसाव्या शतकातील शिक्षणापुढील आव्हाने — श्री. जी. टी. राठोड — ९२
- व्यावसायिक शिक्षण - काळाची गरज — श्री. पी. के. कऱ्हाड — ९५
- चारित्र्य निर्मितीसाठी शिक्षक — कु. यु. जी. ठाकरे — ९७
- माझ्या कल्पनेतील आदर्श शिक्षण पद्धती — डॉ. श्रीकांत गो. सबनीस — १०१
- शिक्षण वास्तव व अपेक्षा — श्री. आशिष प्र. इंगळे — १०४
- डॉ. आंबेडकरांचे शिक्षणासंबंधी विचार — प्रा. गौतम डांगे — १०७
- प्रकटन — १११
- प्रतिक्रिया ... — ११२


'शिक्षण संक्रमण' हे मासिक मालक, महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकंडरी ॲण्ड हायर सेकंडरी एज्युकेशन, पुणे यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. कृष्णकुमार भास्करराव पाटील यांनी **डिलाईट प्रिंटर्स,** १६-ए, हिमालया इस्टेट, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ येथे छापून स.नं. ८३२-ए, फायनल प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक : श्री. कृष्णकुमार भास्करराव पाटील**

• वर्गणी मनीऑर्डरने किंवा ड्राफ्टने पाठवावी. **वार्षिक वर्गणी :** ♦ माध्य.शाळा/क.म.विद्यालय/शिक्षक/पालक रु.२००/- किरकोळ अंक किंमत रु. २०/-

**Email :** monthly@msbshse.ac.in | **Website :** http.//www.mahahsscboard.maharashtra.gov.in | फोन : ०२०-२५७०५०००

• अंकातील लेखांचे अन्यत्र कोठेही पुनर्मुद्रण करण्यासाठी राज्यमंडळाची पूर्वानुमती घेणे आवश्यक आहे.

**महत्त्वाचे : या अंकात व्यक्त झालेली मते त्या त्या लेखकाची स्वतंत्र असतात; मंडळ त्यास सहमत असेलच असे नाही.**



या कुन्देन्दुतुषारहारधवला
या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्डमण्डितकरा
या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभुतिभिर्देवैः सदा वन्दिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती
निःशेषजाड्यापहा ।।

# मनोगत ...



जानेवारी-२०१५ चा शिक्षण संक्रमण चा अंक राज्यमंडळाच्या अभिमानाच्या क्षणाचा साक्षीदार आहे. सन २०१५ हे राज्यमंडळाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे आणि या सुवर्णमहोत्सवाची नांदी हेच सदर अंकाचे खास वैशिष्ट्य आहे. राज्य मंडळाची ध्येयधोरणे व शैक्षणिक बदलाचा संदेश दूरवर पोहोचवण्याचे कार्य शिक्षण संक्रमण करीत आहे. राज्यमंडळाचे मुखपत्र असलेले शिक्षण संक्रमण हे राज्यमंडळाचा आरसा आहे. ही अभिमानाची बाब आहे.

पन्नास वर्षाचा यशस्वी प्रवास आणि राज्यमंडळाच्या कार्याचा चढता विकसित आलेख आपल्यासमोर येत्या वर्षभरात मांडावा असा मानस आहे. वर्षभरातील अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांमधून तो आपल्यासमोर शिक्षण संक्रमणच्या माध्यमातून येईलच.

राज्यातील शैक्षणिक प्रक्रियेतील अग्रगण्य अशा महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळाची (राज्यमंडळ) १९६६ साली स्थापना झाली. तेव्हापासून मंडळाने अनेक स्थित्यंतरे, बदल अनुभवले. अनेक आव्हाने पेलली, राज्याच्या, समाजाच्या बदलत्या जाणीवा, गरजा यांचा सातत्याने अभ्यास करत राज्याच्या शालेय शिक्षणाला भरीव स्वरूप दिले. राष्ट्रीय पातळीवर स्थान निर्माण करून दिले. आज देशपातळीवर शिक्षणक्षेत्रात महाराष्ट्राची Oxford of the East अशी ख्याती आहे. ही सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे आणि आमच्या कार्याच्या यशस्वीतेची पावती आहे.

सुवर्णमहोत्सवी वर्ष हा सुवर्णकाळ राज्यमंडळाच्या संख्यात्मक व गुणात्मक विकासाच्या चढत्या आलेखातील एक अभिमानाची वाटचाल आहे. या काळात गेल्या ५० वर्षातील स्थित्यंतरे, बदल, आव्हाने आणि अनेक यशस्वी उपक्रम योजना यांचा धावता आढावा आपल्यासमोर मांडला आहे. मागे वळून पाहता अडचणींवर प्रतिकुलतेवर मात करीत गाठलेल्या यशाच्या पाऊलखुणांचा धांडोळा घेणे कालच्या अनुभवातून आजमितीस असलेल्या कार्यबाहुल्यातून उद्याच्या विधायक योजनाचा विचार व त्या अनुषंगाने कार्यकृती हा मंडळाचा निर्धार आहे.

'तमसो मा ज्योतिर्गमय' अंधारातून प्रकाशाकडे जा या ध्यासाबरोबर नेमके ध्येय, अचूक निर्णय आणि काटेकोर अंमलबजावणीही आमच्या कार्यपद्धतीची त्रिसूत्री आहे. इ. १० व इ. १२ वी हे प्रत्येक विद्यार्थ्याचे ध्येय-स्वप्न असते. जीवनाच्या या अत्यंत महत्त्वाच्या संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे काम मंडळ करते. देशाच्या सक्षम पिढीसाठी भक्कम पाया मंडळ निर्माण करून देते. विद्यार्थ्याची केवळ शैक्षणिक नव्हे तर बौद्धिक, मानसिक, भावनिक जडणघडण करण्यात राज्यमंडळ महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. एका अर्थाने योग्य दिशेने जाणारा भावी नागरिक, समाज घडविण्याचे शिक्षण देण्याचे कार्य राज्यमंडळ करत असते.

विद्यार्थी, पालक व शिक्षक ह्या त्रयींसाठी त्यांच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध असणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे आणि त्यासाठी उच्चकोटीची गुणवत्ता जोपासणे, वृद्धिगंत करणे हा मंडळाचा नेहमीचा अग्रक्रमाचा ध्यास राहिला आहे. म्हणूनच गेल्या ५० वर्षातील संख्यात्मक व गुणात्मक विकास हे राज्यमंडळाचे उल्लेखनीय व व्यवच्छेदक वैशिष्ठ्य आहे. अर्थात त्यासाठी आजपर्यंत राज्यमंडळाच्या अध्यक्षपदाची सचिवपदाची धुरा समर्थपणे पेलणारे सर्व आजी व माजी अधिकारी व सर्वतोपरी राज्यमंडळाच्या यशाचे वाटेकरी असलेले सर्व कर्मचारी यांच्या कर्तृत्वाचा सहभाग महत्त्वाचा ठरलेला आहे.

महाराष्ट्रातील नऊ विभागीय मंडळाचा संपूर्ण कारभार राज्यमंडळाच्या अधिपत्याखाली चालतो. अर्थात सर्व विभागीय मंडळाचे अध्यक्ष, सचिव व त्यांचे सहकारी ह्यांचे मनस्वी सहकार्य हेच यशाचे गमक आहे. विभागीय मंडळाचे

हितचिंतक, शुभेच्छुक, राज्यमंडळाच्या कार्यप्रणालीत सहभागी होणारे सर्व निमंत्रित मान्यवर यांचे सक्रीय सहकार्य व सर्व उपक्रमांची यशस्वीता ही आमची बलस्थाने आहेत. शिक्षण संक्रमण अंकाच्या माध्यमातून राज्यमंडळाच्या कार्यक्षेत्राचा आढावा आपल्यासमोर जाणीवपूर्वक मांडत आहे. त्यातून आपणास राज्यमंडळाच्या कार्याची व्यापकता ज्ञात व्हावी हाच हेतू आहे. राज्यमंडळ नावीन्याच्या स्वीकाराबाबत नेहमीच पुरोगामी आहे. राज्यमंडळ नवनवे प्रयोग करून पाहणे, राबवणे, याबाबत नावीन्यपूर्ण कल्पक योजनांची प्रयोगशाळा आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

केवळ परीक्षा घेणे व निकाल जाहीर करणे एवढेच नव्हे तर त्या अनुषंगाने पाठ्यपुस्तके तयार करणे, शिक्षकांना प्रशिक्षण देणे शिक्षण पद्धतीतील बदल शिक्षकांपर्यंत पोहोचवणे या सर्व जबाबदाऱ्या राज्यमंडळाने स्वत:च्या मानल्या आहेत आणि त्यासाठी एकूण ५३ अभ्यासमंडळे नियुक्त केलेली आहेत आणि इ. ९ वी ते १२ वी साठी एकूण ८ माध्यमांतून १७४ विषयांसाठी तब्बल ३१७ पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली आहे. हा आकडा राज्यमंडळाच्या व्यापक कार्याच्या जाणीवेसाठी खूप बोलका आहे.

इतर राज्यांमध्ये ही जबाबदारी वेगवेगळ्या संस्थांकडे विभागली जाते. राज्यमंडळाने मात्र संपूर्ण शैक्षणिक जबाबदारी बरोबरच तांत्रिक विषयांचे विकसनही केले आहे. इ. १० वी व १२ वी च्या शिक्षणाचा सर्वंकष दृष्टिकोन विकसित केला आहे. देशाला सक्षम असे डॉक्टर, इंजिनिअर, देश घडविणारे शिक्षक दिले आहेत. म्हणूनच राज्यमंडळाच्या परीक्षा व पाठ्यपुस्तके NCERT, CBSE, ICSE यांच्या अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांशी स्पर्धा करतात.

एवढ्या वैविध्यपूर्णतेने काम करणारे दुसरे मंडळ देशात कदाचित नसेल. महाराष्ट्राच्या राज्यमंडळातर्फे ८ माध्यमांतून पाठ्यपुस्तके तयार होतात व तेवढ्याच माध्यमातून परीक्षाही घेतली जाते. ही खास वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. म्हणूनच इतर राज्यातील विद्यार्थी इथे परीक्षार्थी म्हणून येण्यास उत्सुक असतात. आपल्या मातृभाषेचा प्रदेश सोडून येताना त्यांना इथे माध्यमांची अडचण येत नाही उलट सहज उपलब्धता आहे.

राज्यमंडळ एकात्मतेचे चालते बोलते विद्यापीठ बनले आहे आणि ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक उपलब्धीमध्ये राज्य मंडळाचा वाटा निश्चितच मोठा आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी सतत सुधारणेच्या शोधासाठी योजनांचा दृष्टिकोन आवश्यक असतो आणि याबाबत राज्यमंडळाचा दृष्टिकोन गेल्या ५० वर्षात आणि आजमितीसही अत्यंत प्रगल्भ व कृतिप्रवण राहिला आहे. आगामी वर्ष तर अनेक कृतिकार्यक्रमांनी सजलेले असेलच.

सदर अंकात सर्वश्री डॉ. जयंत नारळीकर, डॉ. न. म. जोशी, श्री. विजय कुवळेकर, श्री. सुरेश साळगावकर, श्री. लक्ष्मीकांत पांडे व डॉ. नीला सत्यनारायण यांच्या अभ्यासपूर्व व प्रतिभा संपन्न लेखांचा समावेश आहे. सदर अंकासाठी व संपूर्ण सुवर्णमहोत्सवी वर्षासाठीच अनेक सन्माननीय मान्यवरांचे अभ्यासपूर्व लेख, नावीन्यपूर्ण सूचना आमच्यापर्यंत आल्या आहेत. सूचना अमलात आणण्याचा मानस आहे. आपले लेखही आम्ही यथावकाश वर्षभरात प्रकाशित करू म्हणजे त्याचा लाभ वाचक शिक्षकांना मिळेल. पुढील शताब्दी वर्षाकडे जाणारी वाट हे अशाच यशस्वीतेची व राज्याच्या शैक्षणिक विकासाकडे जाणारी असेल हा आमचा निर्धार आहे.

नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**(गंगाधर म्हमाणे)**
**अध्यक्ष,**
**राज्यमंडळ, पुणे.**

# परीक्षा पद्धती
## काही विचार

गेल्या शतकात केंब्रिज विद्यापीठात गणिताची सर्वोच्च परीक्षा - ट्रायपॉस - ही अत्यंत प्रतिष्ठेची समजली जाई. त्या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्यांना रँग्लर (म्हणजे त्या विषयावर वाद घालू शकणारे) म्हणत आणि त्यांपैकी सर्वोच्च मार्क मिळवणाऱ्याला सीनियर रँग्लर म्हणत. १८९९ मध्ये हा किताब मिळवणारे आप्पासाहेब परांजपे हे पहिले भारतीय सीनियर रँग्लर.

सीनियर रँग्लरला पुष्कळ मानसन्मान मिळत. विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात प्रथम त्यालाच पदवी मिळे. पुढेही कॉलेजची फेलोशिप त्याला बहाल केली जाई आणि विद्यापीठात व बाहेरच्या जगातदेखील त्याला प्रतिष्ठा मिळे.

म्हणून सीनियर रँग्लर बनण्यासाठी हुशार विद्यार्थ्यात चढाओढ असे. कॉलेज लेक्चर्स खेरीज कोचिंग क्लासेसना आश्रय मिळे. अर्थात कधी कधी स्वत: वर चढता चढता दुसऱ्याला खाली ओढण्याचे प्रयत्नही होत असत. ही एक चिंतेची बाब होती. पण अधिक चिंतेची बाब - जिच्यावर विद्यापीठातल्या प्राध्यापक मंडळींनी पुष्कळ चर्चा केली - ती म्हणजे सीनियर रँग्लरपद हे खरोखर गणिती प्रतिभेचे लक्षण असू शकत नाही याची जाणीव.

कारण सीनियर रँग्लर पुढे गणिती म्हणून चमकले असे हमखास विधान करता येत नाही. उलट अशी बरीच उदाहरणे सापडतात जिथे प्रथम स्थान पटकावणारी व्यक्ती पुढे संशोधनक्षेत्रात काही ठसा उमटवू शकली नाही तर तिच्या पाठोपाठचे .... दुसरे, तिसरे, चौथे रँग्लर हेच अधिक प्रतिभाशाली ठरले. सीनिअर रँग्लरसाठी पुष्कळ कोचिंग करून परीक्षाक्षेत्रात उतरलेले विद्यार्थी परीक्षेपुरते चमकले. पण संशोधनक्षेत्रात लागणाऱ्या उपजत चौकसबुद्धची कमतरता त्यांना पुढे जाणवायची. अखेर १९०९ साली सीनिअर रँग्लर आणि इतर रँग्लरांचे मानांकन बंद करण्यात आले.

आजही गणिताची ट्रायपॉस परीक्षा अवघड आणि प्रतिष्ठेची मानली जाते. पण रँग्लरांची यादी अकारविल्हे प्रसिद्ध होते. त्यांचे नंबर लावले जात नाहीत. परीक्षकांना सर्वोच्च मार्क मिळवणाऱ्याचे नाव माहीत असते तरी ते, ते नाव कसोशीने गुप्त ठेवतात.

केंब्रिजच्या उदाहरणातून आपल्याला बोध घेता येईल का? दहावी आणि बारावी ह्या विद्यार्थ्यांच्या जीवनातल्या महत्त्वाच्या परीक्षा. त्यात पहिले क्रमांक मिळवणारे पुष्कळजण अभिनंदन - बक्षीसे - प्रसिद्धीच्या माऱ्यात सापडत असत. इथे फरक एकेका मार्कावरून होत असे. पण त्यामुळे 'मेरीट लिस्ट' ला अवास्तव महत्त्व प्राप्त होत असे - जसे केंब्रिजच्या वरील उदाहरणातून दिसते.




**डॉ. जयंत नारळीकर**
जगद्विख्यात शास्त्रज्ञ,
लेखक व विचारवंत


**'आजच्या संगणकाच्या जमान्यात माहितीचा प्रचंड साठा संगणकात भरला जातो. ती संपूर्ण माहिती मानवाने डोक्यात ठेवावी अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. आणि जो विद्यार्थी अशी माहिती आपल्या डोक्यात जास्तीत जास्त साठवतो तो प्रतिभावंत असा ग्रह करून घेणे त्याहूनही मूर्खपणाचे आहे. पण माहिती कोणत्या प्रकारची असू शकते, तिचा उपयोग काय, ती कशी मिळवावी ह्याची शिकवण आज अधिक मोलाची आहे.'**

## ताण
## तणाव
## दबाव
## टेन्शन
## ग्लानी
## स्पर्धा
## 'यावर उपाय काय?'

अधिक मार्क कमावणारे विद्यार्थी अग्रक्रमाने वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी क्षेत्राकडे वळतात. त्या क्षेत्रात त्यापैकी पुष्कळांना व्यावसायिक यश पुढे मिळतेही. पण त्या क्षेत्रात त्यांच्या 'मेरिट'ची चमक दिसल्याचे मात्र ऐकू येत नाही. वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत आहे. नव्या संशोधनांचा, नव्या उपकरणांचा, नव्या औषधांचा फायदा रोग्यांना अनुभवायला मिळतो. पण ह्या घडामोडीत आपल्या परीक्षेतील मार्कांचे शिक्कामोर्तब झालेल्यांनी कितपत हातभार लावला आहे? मला तरी अशी उदाहरणे ठाऊक नाहीत.

अभियांत्रिकी क्षेत्रात हाच अनुभव दिसून येतो. तंत्रज्ञानातील संशोधनाला जगात पुष्कळ वाव आहे. जागतिक स्तरावर वेगवेगळी पेटंटस् घेतली जातात, राबवली जातात. पण आपल्याकडे व्यावसायिक यशाचे प्रतीक काय ? तर आहे त्या क्षेत्रात जास्तीत जास्त धंदा करून जास्तीत जास्त सुबत्ता मिळवणे. मग तुम्ही पूल बांधा. जनरेटर - डायनॅमो उभारा किंवा वीस-वीस मजली इमारती.



याचा अर्थ असा की आपल्या परीक्षा ज्या तऱ्हेने घेतल्या जातात, त्यात गुणवत्तेचे जे निकष लावले जातात. त्यातून पुढील आयुष्यात संशोधन क्षेत्रात ठसा उमटवेल असा प्रतिभावंत विद्यार्थी आपल्याला शोधून काढता येत नाही. अर्थात असे प्रतिभावंत लाखातून पाचसहाच असतील... पण ते आपल्या मार्कलिस्टमध्ये सापडत नाहीत.

याचे एक कारण म्हणजे आपल्या परीक्षांमध्ये ठरावीक प्रश्न विचारून त्यांची ठरावीक उत्तरे मागितली जातात आणि ती कोण सर्वात उत्तम प्रकारे देईल त्याला मार्क जास्त. तेव्हा उत्तरे कशी द्यावीत म्हणजे मार्क जास्त मिळतील हे सांगणाऱ्या शिक्षणाला आपोआप महत्त्व मिळते. आज सगळीकडे पसरलेल्या 'क्लासेस'च्या लोकप्रियतेचे रहस्य हेच आहे. जे शंभर ते दीडशे वर्षांपूर्वी केंब्रिज विद्यापीठातील कोचिंग क्लासेसना गवसले होते. केंब्रिजने परीक्षा पद्धती बदलली, सीनियर रँग्लरची प्रथा बंद केली आणि ते कोचिंग क्लासेस संपुष्टात आले.

मला वाटते, १०वी आणि १२वी च्या परीक्षांबाबत पुनर्विचाराची पुष्कळ गरज आहे. मार्कामार्कांसाठी चढाओढ, विद्यार्थ्यांना वाटणारे 'टेन्शन' आणि अपेक्षेनुसार यश लाभले नाही तर येणारी 'ग्लानी' ... हे आपल्या परीक्षापद्धती सदोष असल्याचे सुचवीत नाहीत का?

यावर उपाय काय? १०वी - १२वी च्या संदर्भात ह्या सूचना आहेत.

प्रथम, मला वाटते मार्कांचे महत्त्व कमी करावे. अमेरिकेत सदृश परीक्षांत अमुक मार्कांखाली किती टक्के विद्यार्थी आहेत हे सांगितले जाते. तसे करून पहावे. म्हणजे मार्कांचे जे 'इन्फ्लेशन' (याला मार्कस्फीती म्हणावे का?) चालू आहे त्याला आळा बसेल.



परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न ठरावीक साच्याचे नसावेत. निदान त्यांची उत्तरे अमुक तऱ्हेनेच लिहिली पाहिजेत अशी अपेक्षा नसावी. 'मल्टिपल चॉईस' तऱ्हेची उत्तरे असली तर चुकीच्या उत्तरांना ऋणात्मक मार्क दिले जावेत. बोर्डातर्फे परीक्षा घेण्यामागे उद्देश असतो की समान निकष लावून उत्तरांचे मूल्यमापन व्हावे. परंतु प्रत्यक्षात तसे होते का? अपेक्षेपेक्षा कमी मार्क मिळणे, मार्कांची अफरातफर होणे वगैरे प्रकार ऐकू येतात ते बोर्डाचा आकार बेसुमार वाढल्यामुळे तर नव्हे ? अशा स्थितीत प्रत्येक जिल्ह्यात एका बोर्डाने परीक्षा घेतली तर ? अमुक बोर्ड जास्त मार्क देतो असे आरोप वर प्रथम सुचवलेल्या उपायाने टाळता येतील.

माझा आणखी एक आक्षेप NTS, STS परीक्षांवर आहे. ह्या परीक्षांचे उद्दिष्ट T ह्या अक्षरात आहे याचा आता पूर्ण विसर पडलेला दिसतो. नाहीतर social studies सारख्या विषयाला यात महत्त्वाचे स्थान का मिळाले ? ज्या विषयात मार्क मिळवायला घोकंपट्टी हाच एक राजमार्ग असतो असे विषय, असे प्रश्न घालून परीक्षकांना पाठांतराची प्रतिभा शोधायची आहे का ?

वास्तविक अशा परीक्षांत विचार करायची - स्वतंत्र विचार करायची प्रवृत्ती शोधायची असते. गणित, विज्ञानातील कोडी (येथेही रटण्याजोगा/घोकण्याजोगा तपशील टाळून) किंवा भाषेचा - मग ती इंग्रजी - हिंदी वा मातृभाषा असो - प्रभावीपणे वापर इत्यादीवर भर असावा.

आजच्या संगणकाच्या जमान्यात माहितीचा प्रचंड साठा संगणकात भरला जातो. ती संपूर्ण माहिती मानवाने डोक्यात ठेवावी अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. आणि जो विद्यार्थी अशी माहिती जास्तीत जास्त आपल्या डोक्यात साठवतो तो प्रतिभावंत असा ग्रह करून घेणे त्याहूनही मूर्खपणाचे आहे. पण माहिती कोणत्या प्रकारची असू शकते, तिचा उपयोग काय, ती कशी मिळवावी ह्याची शिकवण आज अधिक मोलाची आहे.

एक गोष्ट सांगून हा लेख आटोपता घेतो. एका राजाकडे तीन पंडीत होते. पहिला कुठलीही गोष्ट एकदा ऐकून स्मरणात ठेवून पुन्हा उद्धृत करू शके. दुसरा दोनदा ऐकून तर तिसरा तीनदा ऐकून तसेच करू शके. कुठलाही बाहेरचा कवी दरबारात येऊन स्वत: केलेली कविता म्हणून दाखवून पुरस्कार मागे तेव्हा राजा त्या तीन पंडितांना क्रमाने तीच कविता म्हणायला सांगे. त्यांनी ते काम केल्यावर तो त्या कवीला म्हणे, ''पहा तुझ्या कविता नव्या नाहीत. त्या गावच्या एक, दोन नव्हे तर तीन पंडितांना माहीत आहेत. तेव्हा तुला नव्या निर्मितीबद्दल पुरस्कार कसा द्यायचा ?'' तो सृजनशील कवी निराश होऊन जाई.

आजच्या परीक्षा अशा सृजनशील प्रतिभेला पुरस्कृत करीत नाहीत तर घोकंपट्टी - पंडितांना प्रोत्साहन देतात.

❖❖❖

**परीक्षा म्हणजे नव्हे केवळ घोकंपट्टी तर ती आहे तुमच्या विचारांचा आविष्कार**

# आई-बाबांची 'शाळा'



डॉ. नीला सत्यनारायण
माजी अध्यक्ष - निवडणूक आयोग
(निवृत्त भा.प्र.से.) मुंबई

'मुलांचे हे हट्ट पुरवता पुरवता, त्यांना कुठलीच शिस्त न लावता, प्रेमाने मुलांना समजून घेऊन मोठे करताना अनेक अप्रिय गोष्टी आपल्या कौटुंबिक जीवनात विनासायास उतरल्या आहेत.'

हल्लीच्या काळात आपल्या समाजात बहुसंख्य प्रमाणात न्यूक्लिअर फॅमिलीज म्हणजे सुटी सुटी कुटुंबे दिसून येतात. पूर्वीची एकत्र कुटुंब पद्धती जवळ-जवळ कालबाह्य होत चालली आहे. पूर्वीची जीवन जगण्याची पद्धत, मुले वाढवण्याची पद्धत यामध्येही बदलत्या काळानुसार आश्चर्यजनक बदल झालेले आहेत. पूर्वीच्या काळी आईवडील म्हणजे मुलांना वेदवाक्य असायचे. मुलांचे शिक्षण, त्यांची लग्ने, सगळे आई-वडिलांच्या मर्जीने होई. आता मुले केंद्रस्थानी आहेत. मुले स्वत:चे निर्णय स्वत:च घेतात. मोठे झाल्यावरच घेतात असे नाही. अगदी दीड-दोन वर्षांच्या मुलांपासून प्रत्येकाला आपले मत असते आणि प्रत्येकाला मतस्वातंत्र्यही आहे. अगोदर फार दडपले गेल्यामुळे आताचे आईवडील मुलांना मोकळे सोडतात. त्यांच्या इच्छा-आकांक्षांना महत्त्व देतात.

आपल्या देशात इतक्या वर्षात बरीच समृद्धी आल्यामुळे पूर्वी ज्या गोष्टी मुलांना कष्ट करून मिळवायला लागत होत्या त्या हल्लीच्या मुलांना सहज मिळतात. काही मागायच्या आतच सगळी सुखे हात जोडून त्यांच्यासमोर उभी असतात. ज्या वस्तू मुले मागतील त्या गोष्टी पालकही तत्परतेने त्यांना पुरवीत राहतात. काही वेळा मुलांबद्दलच्या प्रेमापोटी आणि बरेचदा इतर मुलांजवळ या वस्तू आहेत हे पाहून आपल्या मुलामध्ये वैगुण्य येऊ नये यासाठी पालक आपल्या मुलांच्या मागण्या पूर्ण करत राहतात. इतर मुलांजवळ जे आहे ते मला मिळाले पाहिजे यासाठी हल्लीची मुले आग्रही असतात, आई-वडिलांना ती गॅजेट्स घेणे परवडतील अथवा नाही याचा विचार नसतो. मोबाईल, आयपॅड, प्ले स्टेशन यासारख्या नव्या नव्या गोष्टी मुलांना सातत्याने हव्या असतात. प्रत्येक वेळी नवीन मोबाईल बाजारात आला की नवीन मॉडिलचा मोबाईल त्यांना हवा असतो. त्याच्या जोडीला मोटरसायकल, कार याही गोष्टी हळूहळू त्या यादीत सामावू लागतात. मुलांचे हे हट्ट पुरवता पुरवता, त्यांना कुठलीच शिस्त न लावता, प्रेमाने मुलांना समजून घेऊन मोठे करताना अनेक अप्रिय गोष्टी आपल्या कौटुंबिक जीवनात विनासायास उतरल्या आहेत.

मुलांना सगळे स्वातंत्र्य देऊन आपण त्यांना मानसिकदृष्ट्या सुदृढ बनविणार आहोत असे आईवडिलांना वाटते. पूर्वीच्या आईवडिलांचा धाक मुलांना आता राहिलेला नाही. अनेक मुले आपल्या वडिलांना एकेरी नावाने हाक मारतात. 'ए बाबा' असे वडिलांना म्हणता म्हणता दोघांमधली आदराची रेषा कधी पुसली जाते कळत नाही. जेव्हा मुले बाबालाच आव्हान द्यायला लागतो तेव्हा बाबाच्या लक्षात येते की, हा मुलगा आपल्याला मित्रासारखे वागवित आहे, वडिलांसारखे नाही. परंतु तोपर्यंत फार उशीर झालेला असतो. आई-वडील आणि मुले एका सीमित मर्यादेपर्यंतच मित्रत्वाच्या नात्याने

राहू शकतात. परंतु वयाचा, अनुभवाचा मान मुलांनी सर्वच ज्येष्ठांबद्दल बाळगला पाहिजे. अन्यथा मुले मोठी झाल्यावर कोणाचेच ऐकेनाशी होतात.

बऱ्याच घरातून आई-वडील नोकरी करतात. त्यामुळे मुलांकडे पूर्णवेळ लक्ष द्यायला त्यांना वेळ नसतो. विशेषत: आईच्या मनात याबद्दलची अपराधी भावना फार तीव्र असते. त्याची भरपाई म्हणून असे आईवडील मुलांना सतत काहीतरी भेटवस्तू देत राहतात. त्यांचे हट्ट पुरवीत राहतात. मुलांच्या भावनिक गरजा ते ओळखू शकत नाहीत. आपण मुलांबरोबर वेळ घालवायला हवा, त्यांच्याशी संवाद साधायला हवा, या सगळ्या गोष्टी हळूहळू दुय्यम होऊ लागतात. ऑफिसमधून दमून घरी आल्यावर मुलांनी काही प्रश्न विचारले तर "तू टीव्ही लावून बघत बस, मी फार दमलो आहे किंवा दमले आहे, मला स्वयंपाकाचे बघायचे आहे. तुझे तूच मन का रमवू शकत नाहीस?" अशी अनेक वाक्ये आपण मुलांवर फेकत राहतो. अशाने आपल्यातील दुरावा वाढत जातो. असा दुरावा जेव्हा एक अक्राळविक्राळ रूप घेतो त्यावेळेला आपल्याला जाग येते की काहीतरी बिनसले आहे. काही मुले नैराश्याने ग्रासली जातात, काही मुलांच्या मनावर खोलवर परिणाम होतो तर काही मुले बेफिकीरपणे वागू लागतात. त्यांचे अभ्यासातले लक्षही उडते. ते कधी छानछोकीच्या मागे लागतात तर कधी वाईट सवयींच्या आहारी जातात.

समस्या वाढू लागल्या की आपण मनाशी विचार करू लागतो की मी तर इतकी चांगली आई आहे मग माझ्याच मुलांच्या बाबतीत असे का घडावे ? आपण याचा कधीच विचार करीत नाही की त्यांच्या संगोपनात पालक म्हणून आपलेही काही चुकले आहे. आपल्या संगोपनातच काही त्रुटी राहून गेल्यामुळेच हे प्रश्न निर्माण होतात. काही पालक सगळा दोष मुलांवर टाकतात. काहींना वाटते आपला मुलगा वाईट संगतीने बिघडला तर काही पालकांना वाटते की ही शिक्षकांची जबाबदारी आहे. थोडक्यात काय, तर स्वत:च्या जबाबदारीची जाणीव पालकांना सुरुवातीला होतच नाही. पालक जेव्हा मानसोपचार तज्ज्ञांचा आधार घेतात तेव्हा मानसोपचार तज्ज्ञ त्यांना त्यांच्या जीवनाचा आरसा दाखवतात. आज आपल्या समाजात अनेक मुलांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. समाजामध्ये गंभीर विकार निर्माण झालेले आहेत. मुलांच्यातील विकृती पदोपदी आपल्याला जाणवत आहेत. त्याचे मूळ नेहमीच पालकांमध्ये असते. कधी जाणतेपणाने तर कधी अजाणतेपणाने आपण जे संस्कार मुलांवर करतो त्यातूनच मुलांची व्यक्तिमत्त्वे घडतात. आपण एकांगी संस्कार दिले तर मुलगा तसा तयार होतो. आपण संतुलित विचार दिले तर मुलगा मनाने सुदृढ निपजतो. पण मुळात आपले काही चुकते आहे हेच मुळी आईवडिलांना पटत नाही आणि सांगायचा प्रयत्न केला तर ते हे सत्य स्वीकारतही नाहीत.



अशा आईबाबांची संख्या घरोघरी वाढतच चालली आहे. या सामाजिक संकटाची जाणीव करून देण्यासाठी आई-बाबांची शाळा या पुस्तकरूपाने मी पालकांशी संवाद साधण्याचा एक छोटेखानी प्रयोग केला आहे. कल्पना अशी आहे की आई-बाबांनी पुन्हा एकदा या शाळेत यावे आणि आपण मुलांचे जे संगोपन करतो आहोत ते योग्य दिशेने आहे किंवा नाही याचा डोळसपणे आढावा घ्यावा. यातून बरेचदा अनेक सत्ये बाहेर येतात जी आपल्याला दिशा दाखवू शकतात आणि आपल्यामुळे आपल्या मुलांनाही. समाज जर सुधारायचा असेल आणि निकोप मनाचा बनवायचा असेल तर आपल्याला चारित्र्यवान मुले घडवावी लागतील. या शाळेत प्रवेश घेणे आणि या शाळेत शिकणे म्हणूनच पालकांना अगत्याचे आहे.

माझ्या पाहण्यात अशी अनेक कुटुंबे आली जी बाहेरून दिसायला अगदी नॉर्मल आणि छान वाटतात. परंतु त्यांच्या अंतर्गत अडचणी आणि समस्या भयावह आहेत. त्यांच्या खाजगी आयुष्यात डोकावल्यास आपलेही मन अस्वस्थ होऊन जाते. आपल्या समाजात मुलांनी केलेले गुन्हे, त्यांच्यात निर्माण झालेल्या विकृती, स्त्रियांवरील अत्याचार या गोष्टी आता इतक्या थराला जायला लागल्या आहेत की समाजापुढे हाच एक सर्वात मोठा चिंतेचा विषय झाला आहे. कुठल्याही प्रश्नाचे उत्तर सोडवण्यासाठी सुरुवात नेहमी शून्यापासून करतात. कुठल्याही समस्येची उकल करण्यासाठी सुरुवात नेहमी स्वत:पासून करतात आणि समाजाला सावरायचे असल तर त्याची सुरुवात कुटुंबापासून करायला हवी. कुटुंबातील सर्वात महत्त्वाचे घटक आईबाबा असतात आणि म्हणून आई-बाबांची अभिनव शाळा सुरू करण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न.

*कधी जाणतेपणाने तर कधी अजाणतेपणाने आपण जे संस्कार मुलांवर करतो त्यातूनच मुलांची व्यक्तिमत्त्वे घडतात.*

मुलांना जेव्हा आपली गरज असते त्यावेळेला आपण त्यांना दुसऱ्या करवी मदत पोहोचवली तर त्यांचे काम होते. मात्र आपल्या सहवासात त्यांना वाटणारा विश्वास दुसरा कोणीही देऊ शकत नाही. आपण एकदा दिलेला आधार मुलांना जन्मभर साथ करीत राहतो. त्यांना संकटांशी मुकाबला करायला धीर देत राहतो. प्रेमाच्या या अदृश्य आधाराचे सामर्थ्य आपण ओळखले पाहिजे. एकमेकांबरोबरचे क्षण निसटून जाता कामा नयेत याची दक्षता आपण घ्यायला हवी.

जेव्हा मी घराघरातून आईबाबा आणि त्यांच्या मुलांमधील संघर्ष पाहते, त्यांच्यातील विसंवाद ऐकते, तेव्हा लक्षात येते की समाज म्हणून आपण एका भलत्याच विनाशाकडे वाटचाल करीत आहोत. आपली कुटुंबव्यवस्था ढासळायला लागली आहे. ती कधी कोसळेल आणि आपण सगळे कधी विखुरले जाऊ याचा नेम नाही.

एकदा एक छोटा मुलगा आपल्या आईबरोबर नदी पार करायला काठावर उभा असतो. नदीला खूप पाणी आलेले असते. मुलगा आईला म्हणतो, "तू माझा हात धर," आई म्हणते, "तू माझा हात धर." दोघेही एकमेकांना बराच वेळ तू माझा हात धर असे म्हणत राहतात. शेवटी आईला उत्सुकता वाटते आणि ती मुलाला विचारते, "दोन्हीमध्ये काय फरक आहे ?" मुलगा म्हणतो, "मी तुझा हाता धरला आणि नदी ओलांडताना पाण्याचा प्रवाह जोरात माझ्या अंगावर आला तरी मी घाबरून तुझा हात सोडून देईन. पण तू माझा हात धरलास आणि कितीही जोराचा प्रवाह आला तरी तू माझा हात मुळीच सोडणार नाहीस याची मला खात्री आहे." आई काय समजायचे ते समजली. मुलाचा हात घट्ट धरून तिने नदी ओलांडली. प्रत्येक आई-बाबांनी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि आपल्या मुलांचा हात धरूनच नदी ओलांडली पाहिजे.

***विद्यार्थी घडवण्यासाठी शाळा असतात. पण खरे पालकत्त्व कसे असावे? काय करावे व काय करू नये हे कोणत्या शाळेत शिकणार? हा खरा प्रश्न आहे.***

आपल्या संस्कृतीचे सामर्थ्य कुटुंबव्यवस्थेत आहे. आई-बाबांच्या आणि मुलांच्या घट्ट नातेसंबंधात आहे. मरणापर्यंतच नाही तर मरणानंतरही उरतात अशी ही नाती आहेत. ती तोडायला नकोत, आपले हात सुटायला नकोत. शेवटी माणूस जन्मभर आनंद शोधीत असतो, सुख शोधीत असतो. लवकरच आपल्याला कळते की तो आनंद, ते सुख काही मर्यादेपर्यंतच पैशाअडक्यात आहे, ऐष आरामात आहे. खरे सुख आणि आनंद आपल्याला मिळालेल्या माणसांमध्ये आहे. आपण जोडलेल्या नात्यांमध्ये आहे.

❖❖❖

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची सुवर्णमहोत्सवी वाटचाल



डॉ. ज्योती गायकवाड
निमंत्रक, अभ्यास मंडळ
(चिटणिसाची कार्यपद्धती)
मराठवाडा मित्रमंडळ कनिष्ठ
महाविद्यालय, पुणे
संपर्क : ९९२२४४१८१०

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्यभर माध्यमिक शिक्षणाचा समान दर्जा राखणे तसेच शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरण व राज्याचे धोरण यामध्ये समन्वय ठेवणे या प्रमुख उद्देशाने महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ अन्वये दि. १ जानेवारी, १९६६ रोजी महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना झाली. १०+२+३ या आकृतिबंधाचा स्वीकार केल्यानंतर उच्च माध्यमिक स्तर अस्तित्वात आला. माध्यमिक शिक्षणाशी संलग्न असा हा महत्त्वाचा स्तर असल्याने उच्च माध्यमिक स्तराची ही शैक्षणिक बाजू सांभाळण्याची जबाबदारी मंडळाकडे सोपविण्यात आली. तद्‌वत १९७६ पासून मंडळाचे 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ असे नामाभिधान करण्यात आले.' विद्यार्थी, पालक, सर्वसामान्य जनता यामध्ये मंडळाचा उल्लेख 'एस.एस.सी. बोर्ड' असा होताना ऐकतो.

मंडळाच्या पन्नास वर्षांच्या वाटचालीत असंख्य विद्यार्थी, पालक, शिक्षण तज्ज्ञ शिक्षक, शिक्षणसंस्था असे अनेकजण मंडळाशी व मंडळाच्या कामाशी जोडले गेले. या कालावधीत मंडळाचे शैक्षणिक, प्रशासकीय कामकाज कसे बदलले, शैक्षणिक वातावरणात होणाऱ्या बदलांचा स्वीकार कसा केला गेला आणि स्वत:चा ब्रॅन्ड निर्माण करण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न कसा केला गेला याचा धांडोळा घेतल्यास मंडळाची देदिप्यमान वाटचाल समोर येते.

> परीक्षांचे आयोजन हे मंडळाचे प्रमुख कार्य असले तरी हे परीक्षा मंडळ नसून शिक्षण मंडळ आहे व तद्‌नुसार राज्यमंडळ विविध कार्ये पार पाडते.

### विभागीय विस्तार :

राज्यभरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची शैक्षणिक बाजू हे मंडळ सांभाळते. राज्य मंडळाची स्थापना पुणे, नागपूर, औरंगाबाद अशा तीन विभागीय मंडळांसह झाली. मंडळाशी संलग्न माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची वाढती संख्या व त्या अनुषंगाने वाढणारी विद्यार्थी संख्या विचारात घेता विभागीय मंडळांच्या संख्येत वाढ होणे क्रमप्राप्तच होते. प्रशासकीय कामांची विभागणी करून विद्यार्थ्यांना चांगली सेवा देण्याच्या उद्देशाने विविध विभागीय मंडळे अस्तित्वात आली. १९८५ मध्ये मुंबई, १९९१ मध्ये अमरावती व कोल्हापूर, १९९३ मध्ये नाशिक, १९९७ मध्ये लातूर आणि २०११ मध्ये कोकण अशी एकूण नऊ विभागीय मंडळे सध्या कार्यरत आहेत. प्रत्येक विभागीय मंडळास काही जिल्हे संलग्न असल्याने संबंधित शाळा व विद्यार्थ्यांना विभागीय मंडळाशी संपर्क साधणे सोयीचे झाले आहे.

## संख्यात्मक वृद्धी :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रमुख कार्य हे दहावी व बारावी परीक्षांचे आयोजन, संचलन याच्याशी संबंधित आहे. संलग्न माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या प्रतिवर्षी वाढते आहे. आणि त्यामुळे विद्यार्थी काही लाखात आहेत. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांची संख्या २०,७३१ एवढी असून कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या ७,६८२ एवढी आहे. खालील तक्त्यावरून मंडळाच्या संख्यात्मक वाढीची कल्पना येते.

### संख्यात्मक वृद्धी

| वर्ष | प्रविष्ट झालेले नियमित विद्यार्थी इयत्ता १०वी | वर्ष | प्रविष्ट झालेले नियमित विद्यार्थी इयत्ता १२वी |
|---|---|---|---|
| १९७४ | २,४४,०८२ | १९७७ | ८५,८५७ (वर्ष १९७७) |
| १९८४ | ६,४७,५३९ | १९८४ | २,८४,५२५ |
| १९९४ | ११,८९,६७१ | १९९४ | ६,५२,७४१ |
| २००४ | १४,२४,४८६ | २००४ | ९,५७,७४६ |
| २०१४ | १५,४९,७८४ | २०१४ | ११,९८,८७९ |

इतक्या मोठ्या संख्येने प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित कामकाज नेटकेपणाने होण्यासाठी मंडळाने नेहमीच योग्य कार्यप्रणाली आणि कार्यपद्धतींचा अवलंब केला आहे.

## उद्दिष्टांप्रती बांधिलकी

महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळाची स्थापना ही विशिष्ट उद्दिष्टे समोर ठेवून करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने -

- राज्य शासनाला माध्य. व उच्च माध्य. शिक्षणाशी संबंधित धोरणविषयक बाबींवर सल्ला देणे.
- माध्यमिक शाळांमध्ये व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षणाचा समान दर्जा राखणे.
- माध्य. व उच्च माध्य. शिक्षणात राष्ट्रीय धोरणे व राज्याची धोरणे यामध्ये समन्वय ठेवणे.
- माध्य. व उच्च माध्य. शिक्षण, विद्यापीठातील शिक्षण आणि प्राथमिक शिक्षण यामध्ये समन्वय ठेवणे.

या उद्दिष्टांचा समावेश आहे व या अनुषंगाने माध्य. व उच्च माध्य. शिक्षणाच्या सर्व इयत्तांसाठी अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्धारण, पाठ्यपुस्तके विहित करणे, परीक्षांचे आयोजन करणे, शिष्यवृत्त्या, विद्यावेतन, पारितोषिके सुरू करणे व त्यासाठी शर्ती विहित करणे, शैक्षणिक उपक्रमांमध्ये संशोधनकार्यास प्रोत्साहन देणे इ. कर्तव्ये राज्यमंडळ विभागीय मंडळांशी समन्वय साधत पार पाडते. राज्य मंडळाचे हे कामकाज अभ्यास मंडळे, परीक्षा समिती, वित्त समिती, विद्वत परिषद व कार्यकारी परिषद अशा विविध समित्यांमार्फत चालते.

परीक्षांचे आयोजन हे मंडळाचे प्रमुख कार्य असले तरी हे परीक्षा मंडळ नसून शिक्षण मंडळ आहे व तद्नुसार राज्यमंडळ विविध कार्ये पार पाडते.

## राज्यमंडळाची काही महत्त्वाची कार्ये व कार्यपद्धतीविषयी

माध्य. व उच्च माध्य. परीक्षांचे वर्षातून दोन वेळा आयोजन केले जाते. विद्यार्थी संख्या विचारात घेऊन विभागवार परीक्षा केंद्र, केंद्रसंचालक, पर्यवेक्षक, परिरक्षक यांच्या नियुक्त्या केल्या जातात. उत्तरपत्रिका तपासणीसाठी परीक्षक, नियामक, मुख्य नियामक अशी त्रिस्तरीय रचना कार्यरत असते.

अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करण्यासाठी मंडळाची विविध विषयांची एकूण ५३ अभ्यासमंडळे आहेत. अभ्यासक्रम आराखडा तयार करताना विषयाचे महत्त्व, उद्दिष्टे समोर ठेवून व्याप्ती व मर्यादा निश्चित केल्या जातात. अभ्यासक्रम आराखडा तयार झाल्यानंतर तो शिक्षक, पालक, सर्वसामान्य जनतेसाठी खुला ठेवला जातो. त्यांच्याकडून येणाऱ्या सूचनांचा विचार करून विविध समित्यांच्या मान्यतेनंतर अभ्यासक्रमाचे निर्धारण केले जाते.

पाठ्यपुस्तके तयार करण्याची प्रत्यक्ष कार्यवाही अभ्यास मंडळाकडून होते. या प्रक्रियेतही तज्ज्ञ शिक्षकांकडून परीक्षण, विषय तज्ज्ञाकडून परीक्षण, तज्ज्ञ भाषांतरकार अशा अनेकांचा समावेश असतो. पाठ्यपुस्तकासंबंधी आलेल्या सूचना/त्रुटी याचाही विचार मंडळाने नेहमीच केला आहे व सुधारित आवृत्तीत त्या दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. मंडळाचे संशोधन व मूल्यमापन अधिकारी या प्रक्रियेत समन्वयकाची भूमिका पार पाडतात.

- अभ्यासक्रम अपेक्षित पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत नेणारा महत्त्वाचा घटक म्हणजे 'शिक्षक'. राज्यमंडळाने माध्य. व उच्च माध्य.शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षणांचे सातत्याने आयोजन केले आहे. या व्यतिरिक्त नवीन अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापनपद्धती, मूल्यमापन इत्यादींचा समावेश असणारे उद्बोधन वर्ग शिक्षकांसाठी राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावर आयोजित केले आहेत.
- राज्य मंडळाची स्वत:ची प्रकाशने असून 'शिक्षण संक्रमण' या मासिकाचा उल्लेख आवर्जून करावयास हवा. शिक्षकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न मंडळ या माध्यमातून करते. शिक्षणक्षेत्राशी व त्यामध्ये समाविष्ट विविध घटकांशी संबंधित लेखांचा समावेश यामध्ये असतो. शिक्षक, पालक, शालेय, प्रशासन या सर्वांसाठी उपयुक्त असे हे मासिक.
- मंडळाने 'थेट विद्यार्थी परीक्षा योजना' सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मूलभूत सहा विषयांचे मार्गदर्शन करणारी पुस्तिका ही मंडळाने तयार केली आहे.
- उच्च माध्य. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणित पुस्तके असावीत म्हणून मंडळाने भाषेतर विषयांची पुस्तके प्रकाशित केली. भाषा व भाषेतर विषयांची विविध माध्यमांची मिळून ३१७ पुस्तके मंडळाने प्रकाशित केली आहेत. शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका, प्रात्यक्षिक पुस्तिकांचे प्रकाशनही मंडळ करते.
- मंडळ शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा, नवोपक्रम स्पर्धांचे आयोजन करते.

मंडळाच्या कार्यपद्धतीची माहिती असल्याने समाजातील विविध व्यक्ती व संस्थांनी अनेक पारितोषिके गुणवंत विद्यार्थ्यांसाठी जाहीर केली आहेत. समाजाचा हा सहभाग मंडळाच्या कार्यपद्धतीस एक प्रकारे दाद देतो.

**गुणवत्ता सुधार कालसुसंगत निर्णय व बदलांचा स्वीकार हे मंडळाच्या यशस्वीतेचे गमक आहे.**

## गुणवत्ता सुधारणेच्या दृष्टीने

गुणवत्ता सुधार (Quality improvement) ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत कालसुसंगत निर्णय घेणे व बदलांचा स्वीकार करणे हे महत्त्वाचे असते. मंडळाच्या कामकाजात प्रशासनाने याचा विचार नेहमीच केल्याचे जाणवते. परीक्षेसंबंधी व मंडळाच्या कामकाजाशी निगडित घेतलेले अनेक महत्त्वाचे निर्णय दर्जा टिकविणे व वाढविणे याबाबतची मंडळाची कटिबद्धता अधोरेखित करतात. काही निर्णयांचा उल्लेख करावयाचा झाल्यास...

## कालानुरूप विषय योजनेत बदल

कालानुरूप विविध विषयांचा समावेश मंडळाने विषय योजनेत केला. इ. ९वी, १०वी साठी वैकल्पिक विषयांसह ४० विषय आणि इ. ११वी, १२वी साठी ४७ विषय उपलब्ध आहेत. काळाची गरज लक्षात घेऊन माहिती तंत्रज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास, कार्यशिक्षण, पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम असे विविध विषय विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) हा विषय मार्च २०१४ पासून इ.१०वी साठी अनिवार्य केला आहे. जर्मन, फ्रेंच, रशियन, जॅपनीज अशा परकीय भाषा विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत.

शालेय स्तरावर इयत्ता १०वीसाठी मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना इंग्रजी प्रथम भाषा म्हणून आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मराठी प्रथम भाषा म्हणून अभ्यासण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## उत्तरपत्रिकांवर बारकोड पद्धती

उत्तरपत्रिकांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन व्हावे या दृष्टीने बारकोड पद्धत सुरू करण्यात आली. विद्यार्थ्यांचा बैठक

क्रमांक, केंद्र क्रमांक, विद्यार्थ्याने व पर्यवेक्षकाने केलेली स्वाक्षरी आदी तपशील स्टिकरच्या साहाय्याने झाकून उत्तरपत्रिकांना सांकेतिक क्रमांक देऊन सर्व प्रक्रिया पार पाडली जाते.

### बहुसंची प्रश्नपत्रिका

परीक्षा कक्षामध्ये गैरप्रकार होऊ नयेत म्हणून बहुसंची प्रश्नपत्रिका पद्धत सुरू करण्यात आली. प्रत्येक परीक्षा कक्षामध्ये अे, बी, सी, आणि डी हे चार संच वापरण्यात येऊन पुढे, मागे व शेजारी समान संचाची प्रश्नपत्रिका न देण्याबाबत दक्षता घेण्यात येते.

### परीक्षा बैठक क्रमांकासाठी सुधारित निकष

विद्यार्थ्यांच्या आडनावाच्या आद्याक्षराच्या क्रमाने बैठक क्रमांक दिल्यास विशिष्ट केंद्रावर एकाच आडनावाचे अनेक विद्यार्थी एका पाठोपाठ येत असत. यामुळे बैठक व्यवस्थेबाबतची निश्चित कल्पना परीक्षेपूर्वी येऊ शकत असल्यामुळे गैरमार्गाचा अवलंब होऊ शकत होता. यात बदल करून सुधारित निकष तयार करण्यात आला.

### गैरमार्गाशी लढा

परीक्षा केंद्रावर बाहेरून होणारा उपद्रव थांबविण्यासाठी परीक्षा केंद्राच्या परिसराचे अचानक व्हिडिओ शुटिंग करण्याची पद्धत सुरू करण्यात आली आहे.

परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथके निर्माण करण्यात आली असून परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देऊन गैरप्रकार रोखण्यासाठी ही पथके कार्यरत आहेत. परीक्षा संचालन योग्य रीतीने होण्यासाठी बैठी पथके निर्माण करण्यात आलेली आहेत. तसेच परीक्षा कालावधीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समित्याही कार्यरत असतात.

'गैरमार्गाशी लढा' या अभियानाचा एक नियोजनबद्ध व सर्व घटक समावेशक कृती कार्यक्रम संपूर्ण राज्यभर मंडळाने राबविला.

### ऑनलाईन परीक्षा

इ. १२वी माहिती तंत्रज्ञान विषयाची मार्च २००४ पासून ऑनलाईन परीक्षा अंमलबजावणी यशस्वी झाली असून अशी परीक्षा घेणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

### सुरक्षित गुणपत्रिका व प्रमाणपत्र

इ.१०वी व १२वी च्या गुणपत्रिका तसेच प्रमाणपत्रांमध्ये कोणताही फेरफार करणे शक्य होऊ नये. यासाठी अनेक सुरक्षाबाबी अंतर्भूत केलेल्या लॅमिनेटेड गुणपत्रिका व प्रमाणपत्रे मंडळ देते.

### श्रेणीसुधार/गुणसुधार योजना

या योजनेअंतर्गत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी पुनश्च परीक्षेस प्रविष्ट होण्याची संधी विद्यार्थ्याला दिली जाते.

### अभ्यासक्रम आराखडा

मंडळाने 'महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०' स्वतंत्रपणे तयार केला आहे.

### अभ्यासक्रम पुनर्रचना

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ व राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० तसेच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली. राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमाशी समानता आणण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल होते. अभ्यासक्रम बदलाचा कालावधीही मंडळाने कमी केला आहे. तसेच इ. ९वी ते इ. १२वी ची भाषा व भाषेतर सर्व विषयांची पाठ्यपुस्तके राज्य मंडळामार्फत तयार करण्यात आली. माध्यमिक स्तरावर गणित विषयाला सामान्य गणित हा पर्याय विषय देण्यात आला. गणित विषयासाठी बिजगणित व भूमिती ही दोन स्वतंत्र पाठ्यपुस्तके तयार करण्यात येतच होती. त्याचबरोबर सामान्य गणितासाठी सुद्धा भाग एक व भाग दोन अशी दोन पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली.

## मूल्यमापन योजनेत बदल

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ लेखी परीक्षेच्या माध्यमातून न करता त्याच बरोबरीने भाषा विषयांसाठी तोंडी परीक्षा, कला व वाणिज्य शाखेच्या विषयांसाठी प्रकल्प कार्य असा बदल करण्यात आला. संवाद कौशल्य अभ्यासण्यासाठी तोंडी परीक्षा तर माहिती प्राप्ती कौशल्य, माहितीचे विश्लेषण, सादरीकरण यांच्या वृद्धीसाठी प्रकल्प कार्य महत्त्वाचे ठरत आहे.

## ऑनलाईन निकाल

माध्य. व उच्च माध्य. प्रमाणपत्र परीक्षेचे निकाल ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतात.

## उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती

विद्यार्थ्यांना मागणीनुसार उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती उपलब्ध करून दिल्या जातात. छायाप्रत मिळाल्यानंतर विद्यार्थी निकालाबाबत समाधानी नसल्यास उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

## ऑनलाईन पद्धतीने आवेदनपत्र स्वीकारणे.

इ.१०वी व १२वी विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतात. यामुळे विद्यार्थ्यांबाबतची अचूक माहिती, पडताळणी केलेली माहिती मंडळास प्राप्त होते व पुढील काम अधिक बिनचूक आणि सुटसुटीत होण्यास मदत होते.

## शिक्षक प्रशिक्षणाचे बदलते स्वरूप

मंडळाने शिक्षक प्रशिक्षणाच्या स्वरूपातही कालापुरूप बदल केला आहे. पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन, रिसर्च पेपर, सादरीकरण कौशल्य यावर भर देण्यात आला आहे.

## लेखी परीक्षेत किमान गुण अनिवार्य

अंतर्गत मूल्यमापन गुणांमुळे निकालाच्या टक्केवारीत वाढ झाली असे होऊ नये यासाठी इ. ९वी ते १२वी च्या सर्व विषयाच्या मूल्यमापनामध्ये उत्तीर्णतेसाठी लेखी परीक्षेत किमान २० टक्के गुण अनिवार्य करण्यातही मंडळाने पुढाकार घेतला आहे.

अभ्यासक्रम बदल, परीक्षा संचालन, मूल्यमापन, शिक्षक प्रशिक्षण अशा अनेकविध बाबींचा मंडळ सातत्याने विचार करते व कार्यपद्धतीत बदल करते हे वरील काही निर्णयांच्या उल्लेखातून स्पष्ट होते. आधुनिकता व तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता व पर्यायाने विश्वासार्हता वाढविण्याचेच हे प्रयत्न.

## भविष्यातील आव्हानांकडे पाहताना....

मंडळाने आत्तापर्यंतच्या आपल्या वाटचालीत कामकाजातील पारदर्शकतेतून शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये विश्वासार्हता निर्माण केली आहे. जनमानसात संस्था म्हणून चांगली प्रतिमा निर्माण करताना अनेकांचं योगदान व सहकार्य त्यामध्ये असतं. राज्यमंडळ व विभागीय मंडळांचे सर्व अध्यक्ष, सचिव, इतर पदाधिकारी व कर्मचारी, शिक्षक वर्ग, शिक्षण तज्ज्ञ अशा अनेकांच्या सहयोगातून मंडळाने गुणवत्तेचा ध्यास धरत ही वाटचाल केली.

यापुढील काळातील आव्हानं ही शिक्षणक्षेत्रात राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर होणारे बदल, प्रवेश परीक्षांचे बदलते स्वरूप, विद्यार्थी-पालक यांच्या अपेक्षा, कौशल्य विकसनाची निकड, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे मूल्यांकन, शिक्षकांचे मूल्याकन, तंत्रज्ञान इत्यादींशी निगडित असतील. या आव्हानांना सामोरे जाताना स्वयंमूल्यांकन करणं, राष्ट्रीय स्तरावर तज्ज्ञांकडून मूल्यांकन होणं आवश्यक आहे.



बदलांचा वेध घेत, सूचनांचा खुलेपणाने स्वीकार करत मंडळ आपली देदिप्यमान वाटचाल सुरू ठेवलेच. 'तमसो मा ज्योतिर्गमय' या आपल्या ब्रीदवाक्याशी एकनिष्ठ राहात मंडळाशी संबंधित प्रत्येक घटकाच्या शैक्षणिक विकासाची ज्योत अखंड तेवत राहील.

❖❖❖

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यशिक्षणाची गरज



**श्री. सुरेश साळगावकर**
माजी शिक्षण संचालक, पुणे
संपर्क : ०२०-२५२८३४१६

**मूल्य शिक्षण व संस्काराच्या शिक्षणातून भावनिक विकास साधता येतो.**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजे व्यक्तिमत्त्वाच्या बुद्धी, कौशल्ये आणि मन किंवा भावना या तिन्ही अंगांचा विकास. या लेखाचा केन्द्रबिंदू भावनिक विकास हा आहे व त्याचे माध्यम मूल्यशिक्षण किंवा संस्कारांचे शिक्षण हे आहे. शिक्षणविषयी आपले विचार व्यक्त करताना गांधीजीनी शिक्षण म्हणजे मस्तक; शरीर आणि हृदय या तिन्ही शरीराच्या अंगाना समर्थ बनवते ते शिक्षण अशी शिक्षणाची सोपी व्याख्या केली आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत मुलाच्या बौद्धिक, शारीरिक व भावनिक विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. मुलांच्या अंगी असणाऱ्या मूलभूत क्षमता व भावनांना जे योग्य वळण लावते व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा संतुलित विकास साधते ते शिक्षण आपल्याला अपेक्षित आहे.

आजची आपली शिक्षणपद्धती ज्ञानकेंद्रित आहे. प्राथमिक शिक्षणोत्तर माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर अभ्यासक्रमात वैकल्पिक विषयांच्या अंतर्गत कौशल्याधिष्टित शिक्षण देण्याचेही प्रयत्न सुरु झाले आहेत. परंतु मुलांच्या आवडी, कल, अभिरूची लक्षात घेऊन त्यांनुसार त्या-त्या कला कौशल्यांच्या वृद्धीसाठी उपलब्ध असणाऱ्या सुविधा व संधी शालेय जीवनात अभावानेच आढळतात. व्यक्तिमत्त्व विकासाच्या तिसऱ्या अंगाकडे मात्र फारसे लक्ष दिल्याचे दिसत नाही. भावना, जीवनमूल्ये, चारित्र्य संवर्धन, श्रद्धा ही आपल्या शालेय जीवनातून हरवली जात आहेत. परिपाठ, प्रार्थना, योगसाधना, सांस्कृतिक कार्यक्रम स्नेहसंम्मेलन ही औपचारिक किंवा मनोरंजनाधिष्ठित आली आहेत. शालेय जीवनातून समाजजीवनात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे बोलणे, भाषा, वर्तन, सवयी यामध्ये शिक्षणातून घेतलेल्या संस्कारांचे प्रतिबिंब पहावयास मिळत नाही. अल्पवयीन मुलांकडून घडणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. सार्वजनिक कार्यक्रमांमधेही तरुण- तरुंणांच्या वागण्यामधून त्यांच्या अनिर्बंध वर्तनाचे दर्शन घडते. शालेय शिक्षण पूर्ण करून बाहेरील ताणतणावांच्या जगात वावरणाऱ्या मुलांमधेही मूल्यधिष्ठित शिक्षणाचा प्रभाव जाणवत नाही. हे आपल्या शिक्षणव्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रशासनाने वेळोवेळी गठित केलेल्या आयोगाच्या व समित्यांच्या अहवालांमधेही अहवालांमध्येही मूल्यशिक्षणाकडे लक्ष देण्यात आले आहे. राधाकृष्णन समितीच्या अहवालात शिक्षणाच्या विविध स्तरांवर सदगुणांची जोपासना करणारे भावनिक विकास साधणारे. मनोबल वाढविणारे नैतिक व आध्यात्मिक शिक्षण द्यावे असे म्हटले आहे. मुदलियार आयोग, श्रीप्रकाशसमिती, संपूर्णानंद समिती यांनीही मूल्यशिक्षणाची गरज असल्याचे म्हटले आहे. कोठारी शिक्षण आयोगाने शिक्षण पद्धतीमध्ये थोर धर्मवेत्त्यांच्या शिकवणुकीचा अभ्यास, थोरांची चरित्रे, सण उत्सव, प्रार्थना या नीतिशिक्षणाच्या माध्यमांचा आवर्जून उल्लेख केला आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय सुधारित शालेय अभ्यासक्रमांमध्येही याचे प्रतिबिंब पहावयास मिळते.



नैतिक शिक्षण हा विषय म्हणून न शिकवता विविध शालेय उपक्रम, परिपाठ, प्रार्थना या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये रुजवावीत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांमध्ये व विषयनिहाय उद्दिष्टांमध्ये नीती शिक्षणाची मूल्ये मांडली आहेत. शाळांमधून शिक्षकांची शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला चर्चासत्रे आयोजित करून या मूल्यांचे उद्दिष्टानुवर्ती मार्गदर्शन त्यांनी करावयास हवे. वर्षभर त्यानुसार अध्यापन होते आहे का याचा पाठपुरावा मात्र व्हावयास हवा. बहुसंख्य शिक्षक मित्रांचा पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक पुस्तके हाच अध्यापनाचा आधार असतो त्यामुळे मूल्यशिक्षणाचा आधारच अध्यापनाला राहत नाही.

मानवी व नैतिक मूल्यांची जोपासना, अहिंसा, सत्याधिष्ठित आचरण, समता, संवर्धन, समभाव, स्त्री-पुरुष समानता, राष्ट्रीय एकात्मता देशाभिमान मानवी जीवन व माणसाचा परिसर यांचा सहसंबंध, निसर्गाचे संगोपन आणि संवर्धन, संसाधनांचा काटकसरीने वापर, सहिष्णुता, सहकार्य, भारतीय परंपरा व संस्कृतिविषयी अभिमान, सामाजिक हक्कांबरोबरच येणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव देशाच्या सामाजिक, भौगोलिक व सांस्कृतिक विविधतेची जाणीव व सामाजिक ऐक्याची जाणीव ही सारी जीवनमूल्ये मानवी जीवन समृद्ध करणारी आहेत. त्यांचे संस्कार शालेय जीवनापासून घडवले जाणे अपेक्षित आहे.

जॉन लॉक या तत्त्वज्ञाने म्हटले की प्रत्येक सज्जनाला आपल्या मुलाला सद्‌गुण, सद्‌बुद्धी, सुसंगोपन आणि उत्तम शिक्षण मिळायला हवे असे वाटते. जीवन चांगल्या प्रकारे जगण्यास जे समर्थ करते ते शिक्षण. शिक्षणाच्या संस्कारांमधून माणसाला मानवता प्राप्त होते आणि म्हणूनच शिक्षण हे समाजाचा आधार आहे. समाजात सतत बदलणाऱ्या गरजा पूर्ण करण्यास व नव्या आव्हानांना सामोरे जाण्यास जे सक्षम करते ते शिक्षण. शिक्षण म्हणजे अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके आणि अध्यापन यांच्या साहाय्याने शालेय परीक्षा उत्तीर्ण होणे नव्हे. शिक्षणाला जीवनाचा सहजस्पर्श सातत्याने होत रहायला हवा. त्याचे प्रतिबिंब आपल्या विचारात आचरणात व जीवनपद्धतीत पडायला हवे. विनोबाजी म्हणत जगण्याची शिक्षण म्हणून जेव्हा एक स्वतंत्र क्रिया बनते त्यावेळी विजातीय द्रव्य शरीरात शिरले असता त्याचा जसा शरीरावर परिणाम होतो तसा अशा शिक्षणाचा मनावर परिणाम होतो. शिक्षण हे जीवनाशी संलग्न व्हावे. माणसाच्या बोलण्यात, विचारात, वर्तणुकीत त्याचे परिणाम दृश्य स्वरूपात अनुभवास यावेत. शिक्षणातून मिळालेले ज्ञान, कौशल्ये आणि संस्कार यांचा विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात वापर करता यावा व त्यामुळे त्यांचे जीवन समृद्ध व्हावे.

**उपक्रम, चर्चासत्रे, शालेय परिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम यातून भावनिक विकास सहजशक्य.**

पालक ज्यावेळी आपल्या मुलाला शाळेत दाखल करतो त्यावेळी त्याच्या शाळेकडून काही अपेक्षा असतात. आपल्या मुलाला उपयुक्त जीवनाशी सुसंगत असे ज्ञान मिळावे. त्याची कार्यक्षमता व उत्पादनशक्ती वाढवणारी कौशल्ये त्याने शिकावीत त्याच्यावर चांगले संस्कार व्हावेत असे त्याला वाटत असते. १० वर्षांचे कालावधीत आपणास त्याच्या या अपेक्षा पूर्ण करायला हव्यात. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्याच्या अखेर त्याने कोणत्या क्षमता प्राप्त करणे अपेक्षित आहे. याचे दिशानिदेशन अभ्यासक्रमात केले आहे. टप्प्याच्या अखेरीस त्याच्या संपादणुकीचे मूल्यमापन करण्याची व वेळोवेळी आपली वाटचाल योग्य दिशेने होत आहे हे आजमावणारी साधनेही आपण वापरता. व्यवहारातील

शिक्षक हा विद्यार्थ्याचा आदर्श असतो. तो चूक असूच शकत नाही अशी त्यांची श्रद्धा आहे. त्याला तडा जाऊ देऊ नये.

उदाहरण द्यायचे झाले तर शाळा ही एक पतपेढी आहे. आपली ठेव १० वर्षासाठी तिथे सुरक्षित आहे. तीमध्ये प्रतिवर्षी वाढ होत आहे व मुदतीअंती ती आपणास सव्याज परत केली जाणार आहे याचा पालकांना विश्वास वाटायला हवा. मुलाच्या ज्ञानात, कौशल्यात, बोलण्यात, वागण्यात होत असलेले सुखद बदल तो वेळोवेळी अनुभवत असतो. शाळा सोडताना विद्यार्थी जेंव्हा बौद्धिक, शारीरिक व भावनिकदृष्ट्या परिपक्व होऊन एक सुबुद्ध, सुदृढ सुसंस्कारित तरुण बनून बाहेरच्या जगात प्रवेश करतो त्यावेळी पालकाला शाळेविषयीचे ऋण व कृतज्ञता व्यक्त करण्यास शब्दही अपुरे पडतात असे सुयोग्य बदल विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणण्यासाठी आपणास कटिबद्ध व्हायचे आहे.

नीतिशिक्षणाचे व जीवनमूल्यांचे पाठ देण्यासाठी पाठ्यपुस्तक, मार्गदर्शिका, स्वतंत्र तासिका यांची गरज मला वाटत नाही. शिक्षकाचे विद्यार्थ्यांविषयीचे प्रेम, आत्मीयता. आपली ध्येयासक्ती, समर्पणवृत्ती, आपले आदर्श, आपला आत्मविश्वास, अध्यापनाची पूर्वतयारी व विषयज्ञानावरील पकड, आपला वक्तशीरपणा, नियमितपणा आणि आपले बोलणे, वर्तन व आचरण हाच अध्यापनाचा पाया आहे. या समर्थ पायावर आपण आपली ध्येये गाठू शकता. मुले बऱ्याच गोष्टी निरीक्षणातून, अनुकरणातून, अनुभवातून शिकत असतात. शिक्षक त्यांचा आदर्श असतो. तो चूक असूच शकत नाही अशी त्यांची श्रद्धा असते. तिला तडा जाऊ देता नये. आपले अध्यापन हसतमुखाने, प्रसन्न चेहेऱ्याने व आत्मविश्वासाने व्हायला हवे. मुलांनी आपल्या तासिकेत एवढे गुंगून जावे की त्यांना तासिका संपल्याचा टोलही ऐकू येऊ नये. एवढी एकाग्रता निर्माण करण्यासाठी करावी लागणारी साधना आपण करणार आहात का ? विद्यार्थी सलग ४ दिवस अनुपस्थित राहिल्यामुळे बेचैन होऊन त्याच्या घरी विचारपूस करणारा शिक्षक मी पाहिला आहे. पालकांशी सतत संपर्क ठेवून त्यांच्या वर्तनबद्दलची पालकांकडून माहिती घेणारा शिक्षकही माझ्या माहितीत आहे. त्यामुळे आपल्यासाठी कोणतेही काम हसतमुखाने करणारा विद्यार्थी आपण घडवू शकता व त्यांचा विधायक कार्यात सहभाग घेऊ शकता.

नीतिशिक्षण या विषयावर आपले बौद्धिक घेण्याचा माझा हेतू नाही. केवळ विचारांचे व अनुभवांचे आदानप्रदान करणे या मर्यादित उद्देशाने केलेल्या या चिंतनामध्ये मी माझ्या स्वानुभवाची भर घालून हा लेख संपवतो.

२५ वर्षाच्या शैक्षणिक प्रशासनातील सेवेतून मी शिक्षण संचालक या पदावरून व शिक्षण क्षेत्राच्या व्यवस्थेचा प्रमुख या भूमिकेतून निवृत्त झालो. सेवाकाळात शिक्षक म्हणून कार्य करण्याची संधी मला मिळाली नाही. आयुष्यात आपल्याला समाजाने भरपूर दिले. समाजाच्या या ऋणातून काही अंशी मुक्त व्हावे या हेतूने मी घरीच जवळच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या व म्युनिसिपालटीच्या शाळेतून चौथी उत्तीर्ण झालेल्या मुलामुलींसाठी गृहसंस्कारवर्ग सुरू केला. सुरुवातीला १५ मुले या वर्गात येऊ लागली. शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्ट्या व दिवाळीची सुटी या काळात हा वर्ग चालत असे. सर्व मुलांच्या घरी जाऊन पालकांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक परिस्थितीची माहिती घेतली. काही पालकांना मुलांच्या संपादणुकीची चिंता होती. त्यासाठी काही तास कठीण वाटणाऱ्या विषयांच्या अध्यापनासाठी व उर्वरित कालावधी भाषावृद्धी, संभाषण कौशल्य, सृजनशीलता कौशल्यात वाढ, वृत्तिबदल, लेखन वाचन यामध्ये सुधारणा यासाठी ठेवला. स्वच्छता, नियमितता, वक्तशीरपणा, वर्गशिस्त, सहकारी वृत्ती, नम्रपणा, याकडे कटाक्षाने लक्ष दिल्यामुळे वर्षअखेर सर्व मुलांच्या संपादणुकीत व वर्तनात लक्षणीय बदल आढळले. त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांना व शिक्षकांना तसेच

समाजात सतत बदलणाऱ्या गरजा पूर्ण करण्यास व नव्या आव्हानांना सामोरे जाण्यास जे सक्षम करते ते **शिक्षण.**



ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या सदस्यांना निमंत्रित करून मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, भेटकार्डांचे प्रदर्शन, समूहगीते, वक्तृत्वस्पर्धा या सारखे गुणदर्शनाचे कार्यक्रम आयेजित केले. दोन तुकड्यांची २४ मुले या कार्यक्रमात सहभागी झाली होती. पालकांनांही निमंत्रित केले होते. स्वागतापासून आभार प्रदर्शन व पसायदान हे सारे मुलांनीच केले. पालकांनीही मनोगतापासून कृतज्ञता व्यक्त केली. वर्षअखेर मुलांची पुणे शहरात एक दिवसाची सहल नेली. ऐतिहासिक स्थळे, संग्रहालये, सार्वजनिक बागा, मंदिर मुलांनी पाहिली. बहुसंख्य मुलांनी ही स्थानिक ठिकाणे यापूर्वी पाहिली नव्हती.

सलग ५ वर्षे हा उपक्रम कार्यान्वित केला. आज पहिल्या तुकडीतील मुले पदवीपरीक्षेच्या शेवटच्या वर्षाला आहेत. सर्व मुले नोकरी करून विद्यार्जन करीत आहेत. आजही गुरुपोर्णिमा, शिक्षकदिन, दसरा, दिवाळी, गणेशोत्सव या दिवशी गटागटांनी घरी येतात. संस्कारवर्गातील कालावधीतले फोटो पहात जुन्या आठवणी जागवतात परस्परांना एकत्र भेटतात व आमचे आशीर्वाद घेऊन परत जातात. कृतज्ञताबुद्‌धी व आपुलकीचे संस्कार बोलण्यातून, वागण्यातून जाणवतात.

आपण स्वत: अनुभवल्याशिवाय इतरांना उपदेश करू नये. अनुभव परस्पांमध्ये वाटून घ्यावेत. शिक्षण संक्रमण, जीवन शिक्षण या माध्यमांमधून हे आदानप्रदान घडू शकते. आपण अध्यापनाचे व्रत स्वीकारले आहे. आपण अनेक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला हातभार लावला आहे. त्यामधील माझा हा खारीचा वाटा असे मी समजतो. आपण सारे मिळून आपल्या देशाचे सुजाण, सृजनशील कृतिशील व शीलवान नागरिक बनवण्यामधील आपला वाटा उचलूया.

❖❖❖

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

*माहे **जानेवारी २०१५** अखेर मंडळ सेवेतील खालील अधिकारी/कर्मचारी नियत वयोमानानुसार/स्वेच्छेने सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या प्रदीर्घ अशा सेवाकालाचा लाभ मंडळाच्या कामकाजामध्ये झाला आहे. त्यांचे अनुभव व कार्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन लाभलेले आहे. या सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आयुरारोग्य आणि संपन्न जीवन लाभो अशी मंडळाकडून शुभकामना !*

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | पद | मंडळ | निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| *नियत वयोमानानुसार -* | | | | |
| १) | श्री. एस. के. पवार | उपव्यवस्थापक | राज्यमंडळ | ३१/०१/२०१५ |
| २) | श्रीमती एन. ए. गायकवाड | वरिष्ठ अधिक्षक | पुणे | ३१/०१/२०१५ |

# भविष्यवेधी शिक्षण




**डॉ. न. म. जोशी**
निमंत्रक, मराठी
(उच्च माध्य.) भाषा विषय
अभ्यास मंडळ
संपर्क : ९२२६५७५२९०


'यू कॅन कनेक्ट एनी वन्, ॲट एनीव्हेअर इन द वर्ल्ड, ॲट एनी पॉईंट ऑफ टाइम'

''कोणत्याही राष्ट्राच्या, मानवसमूहाच्या, समाजाच्या आशा-आकांक्षा, विकासाबाबतची स्वप्ने आणि योजना अमलात आणावयाची असतील तर ती शिक्षणप्रक्रियेद्‌वारेच आणता येतात. अर्थातच शिक्षण हे भविष्यवेधी असले पाहिजे.'' असे विख्यात भारतीय शिक्षणतज्ज्ञ कै. जे. पी. नाईक यांनी भारतीय शिक्षण संस्थेच्या स्थापनाप्रसंगी म्हटले होते. डॉ. जे. पी. नाईक हे एक कर्मयोगी शिक्षणतज्ज्ञ होते. स्वातंत्र्योत्तर भारताच्या शैक्षणिक वाटचालीच्या नियोजनात जे. पी. यांचा वाटा सिंहाचा होता. जे. पी. यांनी अर्धशतकापूर्वी जे विचार व्यक्त केले ते आजही ताजेच आहेत आणि त्यांच्या विचारांचा मागोवा घेणे हे आजही अत्यावश्यक आहे.

### भविष्यवेधी शिक्षण : संकल्पना

भविष्यवेधी शिक्षण या संज्ञेचा नेमका अर्थ काय ? यामध्ये कोणती संकल्पना अभिप्रेत आहे ? अगदी थोडक्यात सांगायचे तर भविष्याचा वेध घेणारे शिक्षण ते भविष्यवेधी शिक्षण ! भविष्याचा वेध म्हणजे ज्योतिषशास्त्रातील भविष्याचा वेध नव्हे. तर भविष्यकाळातील आव्हानांचा वेध घेऊन शिक्षण प्रक्रियेची आखणी करणे. ही संकल्पना योग्य तऱ्हेने समजण्यासाठी थोडेसे इतिहासात डोकावणे आवश्यक आहे.

प्राचीन काळापासूनचा अश्मयुगीन - मानवसमूहाचा इतिहास लक्षात घेतला तर असे दिसते की माणूस त्याकाळी केवळ जगण्यासाठी धडपडत होता. पोटाची भूक शमविणे, अन्नप्राप्तीसाठी प्रयत्न करणे, स्वसंरक्षण करणे आणि जगणे एवढ्याच त्याच्या आकांक्षा होत्या. शेतीचा शोध लागला. माणूस घरे बांधू लागला. आणि मग त्याच्या जीवनाला स्थिरता आली. या स्थिरतेच्या प्रक्रियेतूनच मग माणूस स्वत:चे जीवनमान उंचावण्यासाठी सुखसुविधांच्या निर्मितीसाठी प्रयत्न करू लागला. विजेचा शोध, छपाई यंत्राचा (मुद्रणकलेचा) शोध अशा अनेक शोधांनी त्याचे जीवन समृद्ध होत गेले. आजचे एकविसावे शतक हे संगणक युग आहे. आणि माहितीच्या महाजालाने जगाला खूप जवळ आणले आहे. अशावेळीच भविष्यवेधी शिक्षणाचा विचार अधिक आवश्यक ठरतो.

### स्पर्धेचे युग

आजचे युग हे सूचनाक्रांतीचे युग आहे. या युगातला समाज 'ट्रिपल ए' सोसायटी म्हणून ओळखला जातो.

'यू कॅन कनेक्ट एनी वन्, ॲट एनीव्हेअर इन न वर्ल्ड, ॲट एनी पॉईंट ऑफ टाइम' (प्रा. के. एम. भांडारकर, गोंदिया) अर्थातच आपण जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात कोणत्याही व्यक्तीबरोबर कोणत्याही क्षणी संपर्क साधू शकतो.

तंत्रज्ञानाचा एवढा प्रभाव आहे की माणूसही आता यंत्रमानव होईल की काय असे वाटत आहे. रोबो आणि माणूस यांच्यामध्ये आत 'मन आणि बुद्धी' हे दोन घटक सोडले तर फरक राहणार नाही. या स्पर्धेच्या युगात मानवासमोर अनेक आव्हाने आहेत.



## सर्वात मोठे आव्हान

वेग आणि तंत्र ही या युगाची वैशिष्ट्ये आहेत. या वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धेच्या युगात मानवासमोर जी अनेकविध आव्हाने उभी ठाकत आहेत त्यातील सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे -

"मनुष्याचे मनुष्यत्व कायम ठेवणे".

माणूस माणसातील माणूसपण विसरत चाललेला आहे. तंत्रज्ञानाच्या खुंटीला मानवता टांगलेली आहे. आणि माणसाचा मेंदू संगणकाच्या साथीने चालू लागून माणसाचे आत्मभान सुटत चाललेले आहे की काय असे वाटत आहे. शिक्षणापुढील हेच एक मोठे आव्हान आहे.

## भूत, वर्तमान आपले भविष्य

कोणत्याही राष्ट्राला आता भूतकाळातील घटकांच्या संदर्भात वर्तमानाचा विचार करून त्याचवेळी भविष्याचा वेध घ्यावा लागेल आणि उद्याच्या काळासाठी वर्तमानातच आखणी करावी लागेल. आपल्या भारताचा विचार करता भारत देशाला तर भविष्यवेधी अशा शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. याचे कारण भारताची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती. भारताचा इतिहास लक्षात घेतला तर इंग्रजी अमलाच्यावेळीच भारतावर एकछत्री अंमल सुरू झाला. त्यापूर्वी भारतात सुमारे ६०० लहान लहान राज्ये होती. ही राज्ये स्वायत्त होती. त्यांचे स्वरूप संस्थानांसारखे होते. त्याचे स्वरूप काही वेळा सारखे दिसत असले तरी बऱ्याच बाबतीत त्यांच्यामध्ये भिन्नता होती. या भिन्नतेलाच एक चांगले नाव, विविधता देऊन आपण तिचे उदात्तीकरण केले आहे. आचार-विचार, चालीरिती, संस्कृती, भाषा, लोकव्यवहार, जीवनमान अशा अनेक बाबतीतील भिन्नता ही त्यांची वैशिष्ट्येच होती. भाषेच्या बाबत तर ही भिन्नता जाणवणारी होती.

भारत हा जागतिक पातळीवर एक जगावेगळा देश आहे असे आपण सहज म्हणू शकतो. पण तो जगावेगळा आहे कसा?

भारतात सुमारे चार हजार बोलीभाषा आहेत. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम, बौद्ध असे अनेक धर्मांचे व त्यांच्या शेकडो पंथोपंथांचे लोक या देशात आहेत. असंख्य जाती-जमाती आहेत. भारताची नैसर्गिक विविधताही जगातील इतर देशांच्या तुलनेने लक्षणीय आहे. इथं राजस्थानी वाळवंटं आहेत, सागरी किनारे आहेत, सातपुडा, विंध्य यांच्या पर्वतरांगा आहेत. हिमालयासारखा खडेखांब पर्वतराज आहे. गंगा-यमुनासारख्या नद्या आहेत. तर पंजाबसारखा सुपीक प्रदेश आहे. इथं खडकाळ माळरानं आहेत, तर व्हॅली ऑफ फ्लॉवर्ससारख्या नंदनवन फुलबागाही आहेत. ही विविधताही देशाच्या उन्नती-अधोगतीला त्या त्या वेळच्या परिस्थितीनुरूप कारणीभूत होत असते.

## शिक्षणाचे नियोजन

एकूणच शिक्षणप्रणालीची आखणी देशाच्या भविष्याचा वेध घेऊन करणे आवश्यक आहे. 'विद्यायाऽमृतमश्नुते' (विद्या ही अमृतासमान असते) असा संदेश प्राचीन भारतीय तत्त्वज्ञांनी, ऋषिमुनींनी दिला. पण आता या अमृताचा उपयोग देशाचा विकास आणि देशाची प्रगती यासाठी करून घ्यायचा असेल तर तो कसा घ्यायचा याचेही नियोजन करावे लागेल. भारताची लोकसंख्या आता १२५ कोटीवर पोचली आहे. देशातील विविध समस्या, प्रश्न यांचा विचार करून या १२५ कोटी लोकसंख्येला विकासाच्या वाटेवर कसे न्यायचे याचा योजनाबद्ध विचार करून अभ्यासक्रम, शिक्षणप्रणाली, शिक्षणव्यवस्था यांचे नियोजन करावे लागेल.




### ज्ञानाधारित अर्थव्यवस्था

उज्ज्वल इतिहासाचा फारसा आधार नसतानाही अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्राने आपला विकास करून घेतला तो ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेच्या माध्यमातूनच होय. आता आपणाला संपूर्णपणे आपली समाजरचना Learning Society या स्वरूपात करावी लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात ज्ञानाधारित समाजरचना निर्माण करण्यासाठी आपण अनेक योजना अंमलात आणल्या. त्या काळी नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी पारतंत्र्यातही 'प्राथमिक शिक्षणाचे बिल' पास करून घेतले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही पहिले शिक्षणमंत्री मौ. अब्दुल कलाम आझाद यांच्या नेतृत्वाखाली देशातील शिक्षणतज्ज्ञांनी एकत्र येऊन शिक्षणात क्रांती घडवून आणण्याचे प्रयत्न केले आणि अनेक शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्याचे कसून प्रयत्न केले. परंतु या सर्व योजनांना म्हणावे तसे यश लाभले नाही. शिक्षणासाठी जे आर्थिक नियोजन केले ते करताना भविष्याची चाहूल घेऊन वर्तमानात त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. पण तसे घडले का ? नाही घडले. यासाठी आपल्या शिक्षणाची फलिते कोणती ? याची काही बोलकी उदाहरणे घेऊया.

टाईम्सच्या सर्वेक्षणानुसार जगातील २०० उत्कृष्ट विद्यापीठांमध्ये भारतातील एकाही विद्यापीठाचा समावेश नाही.

जागतिक स्तरावर महत्त्वाचा ठरेल असा एक शोध भारतात लागलेला नाही.

जागतिक दर्जाचे संशोधक, तंत्रज्ञ, वैज्ञानिक, वैचारिक आपण निर्माण करू शकलो नाही ही सत्य स्थिती आहे.

अनेक राष्ट्रांनी Futurology of Education या शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या शाखेचा विकास केला. भारतात ही प्रक्रिया अगदी अलीकडे येत आहे. एकविसाव्या शतकात भारताने जागतिक स्पर्धेच्या पातळीवर सर्व क्षेत्रात यश मिळवून आपली मान उंचावण्याचे उद्‌दिष्ट साध्य करावयाचे असेल तर भविष्यवेधी शिक्षणाबाबतच्या खालील मुद्द्यांचा अग्रक्रमाने विचार करायला हवा. हे मुद्‌दे असे -

### उद्‌दिष्टे :

आपल्या शैक्षणिक उद्‌दिष्टांमध्ये मुळापासून फेरबदल करायला हवा. 'मास एज्युकेशन' च्या नावाखाली आपण प्रचंड प्रमाणावर शिक्षणाचा जो विस्तार केला तो केवळ पुस्तकी पद्धतीच्या शिक्षणप्रणालीचा. शिक्षणाची उद्‌दिष्टे आपण ठरवली. राधाकृष्णन् कमिशन असो नाहीतर राममूर्ती कमिशन असो. कोठारी कमिशन असो नाहीतर जे.पी. नाईक यांची समिती असो, त्यांनी उद्‌दिष्टे ठरवली. पण या बहुतेक सर्व समित्यांनी शिक्षणाची आदर्शवादी आणि अमूर्त उद्‌दिष्टे ठरविली. स्थूल उद्‌दिष्टे आदर्शवादी पद्धतीने मांडली, निश्चित अशी उपउद्‌दिष्टे वस्तुनिष्ठ होती. उपक्रमवर्ती होती. पण त्यांनी योग्य तऱ्हेने अंमलबजावणी झाली नाही. आता शिक्षणाची उद्‌दिष्टे ठरवावयाची असतील तर ती अधिक मूर्त, वस्तुनिष्ठ आणि खरोखरीच साध्य करता येतील अशीच उद्‌दिष्टे ठरवावयास हवीत.

मन आणि शरीर हे दोन घटक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर आहेत. त्यांचे कार्य या प्रणालीनुसार चालते. मनाचा थांग लागत नाही आणि मनावर नियंत्रण आणणे अवघड असते. शिक्षणाने हेच कार्य करावयाचे आहे.

### अभ्यासक्रम

पुस्तकी अभ्यासक्रमाला उपक्रमशील अभ्यासक्रमाची जोड देऊन अभ्यासक्रम अधिक निर्मितीप्रवण करायला हवा.

विद्यार्थ्यांमधील विचारक्षमता, अभिक्षमता, सर्जनशीलता, योग्य कौशल्याधारित विकास होणं आवश्यक आहे. अभ्यासक्रमही तसाच हवा. बदललेली जीवनशैली, जीवनाच्या अनेक अंगांमध्ये निरनिराळ्या वेळी उभी ठाकणारी आव्हाने या सर्वांचा विचार अभ्यासक्रमात केला जाणं आवश्यक आहे. नवीन जागतिक धोरणानुसार आपलं जीवनमान आता 'खाउजा' या धोरणांना बेतलेले असणार आहे. 'खाउजा' म्हणजे काय ?

खा-खाजगीकरण उ-उदारीकरण जा-जागतिकीकरण या आर्थिक व राजकीय धोरणांमुळे एकूणच माणसाचे जीवनमान पूर्वीपेक्षा अगदी वेगळ्या पद्धतीचे होणार आहे. त्यासाठी वेगळ्या कौशल्यविकसनाची नितांत गरज आहे. ही कौशल्ये कोणती ?

## कौशल्य विकसन

**ही सारी जीवनकौशल्ये आहेत.**

- सर्जनशील व विमर्षात्मक विचारक्षमता कौशल्य
- ताणतणावापासून मुक्त राहण्याचे कौशल्य
- संप्रेषणकौशल्य
- स्वयंशिक्षणकौशल्य
- आकलनकौशल्य
- सकारात्मक विचार कौशल्य
- हस्तकौशल्य

आपण कौशल्य म्हणतो तेव्हा त्याचा मूळ शब्द कुशल असा आहे. शिक्षणाद्वारा निरनिराळ्या प्रकारची कुशलता व्यक्तीच्या अंगी येणे आवश्यक आहे. एकेकाळची हस्तोद्योगाची कुशलता आता पुरेशी नाही. कौशल्यांचं वर्तुळ आता खूप मोठं झालं आहे. ही कौशल्यं थोडक्यात अशी मांडता येतील.

असे कौशल्यांचे अनेक प्रकार आता शिक्षणप्रणालीच्या क्षेत्रात अंतर्भूत करावे लागतील. नव्या काळात ही सर्व जीवनकौशल्ये यशस्वी व सुखी जीवनासाठी आवश्यकच आहेत. शिक्षणाचे उपयोगितामूळच वाढवायचे असेल तर ही जीवनकौशल्ये आवश्यक आहेत.

## मूल्यमापन

अभ्यासक्रम व शिक्षणप्रणाली यांचे यशापयश हे मूल्यमापनावरून ठरले. आता मूल्यमापनाच्या पद्धती व त्याचे प्रारूप यामध्येही बदल करणे आवश्यक आहे. 'सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन' हा विचार आता महत्त्वाचा ठरणारा आहे. शालेय स्तरापासून विद्यापीठीय स्तरांपर्यंत अजूनही परीक्षांचा आधार 'स्मृती' हाच आहे. त्यामुळे ज्यांची घोकंपट्टी चांगली, स्मृती चांगली त्यांना परीक्षेस यश चांगले मिळते. पण ज्यांनी घोकंपट्टी केली नाही किंवा ज्यांची स्मृती तुलनेने कमी आहे त्यांना ज्ञान असूनही परीक्षेत हवे तसे यश मिळत नाही. ही गोष्ट अशैक्षणिक आहे. म्हणून सातत्यपूर्ण व समग्र मूल्यमापनाचा पाठपुरावा करून सर्व स्तरावरील मूल्यमापनात उचित बदल करावाच लागेल.



## मनाची मशागत

आधुनिक संगणकीय भाषेत सांगायचे झाले तर मन आणि शरीर हे दोन घटक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर आहेत. त्यांचे कार्य या प्रणालीनुसार चालते. मनाचा थांग लागत नाही आणि मनावर नियंत्रण आणणे अवघड असते. शिक्षणाने हेच कार्य करावयाचे आहे. आधुनिक काळातील व्यवस्थापन कौशल्याची सर्व तंत्रे मनाच्या मशागतीसाठी वापरून मनाचे व्यवस्थापन उत्तम होईल हे पाहणे आवश्यक आहे. मनाची सर्जनशीलता, प्रतिसादात्मकता, संवेदनशीलता, सहनशक्ती, आणि स्वीकारात्मकता यांचे समायोजन होऊन बुद्धीच्या साहाय्याने आपले जीवनविषयक निर्णय घेणे व वाटचाल करणे यासाठी आता शिक्षण हवे आहे. असे असेल ते भविष्यवेधी शिक्षण !

Futurology of Education या विचारशाखेचा शिक्षणप्रणालीत अंतर्भाव करून योजना आखणे म्हणजे भविष्याची तयारी करणे होय.

❖❖❖

# शिक्षण आणि चारित्र्य



श्री. विजय कुवळेकर
ज्येष्ठ संपादक, विचारवंत
संपर्क : ९९६०१०२२५५

**भारतीय समाजाच्या सर्व दुखण्यांवरचा रामबाण उपाय म्हणजे 'शिक्षण'**

गेल्या काही वर्षांत भारतात आणि महाराष्ट्रातही शिक्षणाचा प्रसार वेगाने होतो आहे. याच काळात सर्व पातळ्यांवरील भ्रष्टाचार वाढला आहे. गुन्हेगारीचे प्रमाण - त्यातही बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. स्त्रियांवरचे अत्याचार चिंताजनक प्रमाणात वाढले आहेत. सामाजिक, आर्थिक विषमता आणि त्यातून उद्‌भवणारे ताण-तणाव, अन्याय - अत्याचार वाढले आहेत... आणि या साऱ्यात नुसत्या शिकल्या-सवरलेल्यांचाच नव्हे, तर उच्चशिक्षित, उच्चपदस्थ स्त्री-पुरुषांचा सहभाग अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयांमध्ये सिद्ध झाला आहे. जनमानस त्याच्या अनुभवाने चिंतित झालेले आहे.

## या दोन्हीची सांगड कशी घालायची ?

'शिक्षणाने माणसाला माणूस बनवले पाहिजे', अशी तत्त्वज्ञ राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची अपेक्षा होती. 'भारतीय समाजाच्या सर्व दुखण्यांवरचा रामबाण उपाय म्हणजे शिक्षण', असे स्वामी विवेकानंद म्हणत. 'प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असले पाहिजे', असा म. फुले यांचा आग्रह होता. स्त्रियांच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले प्रखर सामाजिक विरोधाचा सामना करीत उभ्या ठाकल्या होत्या. 'स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्वात प्रथम तुम्ही कोणते काम कराल?' असे एका ब्रिटिश अधिकाऱ्याने लो. टिळकांना विचारले, तेव्हा त्यांनी सांगितले, 'सगळ्यात पहिल्यांदा प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करू.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, 'एक पुरुष शिकला, तर एक व्यक्ती शिकते, पण स्त्री शिकली, तर सगळे कुटुंब शिकते.'

शिक्षणाचे त्यातही प्राथमिक शिक्षणाचे आणि स्त्री-शिक्षणाचे महत्त्व आवर्जून समाजाला सांगणारी अशी थोरांची आणखीही उदाहरणे देता येतील. हे शिक्षणमहात्म्य पटल्यामुळेच शिक्षणाचा प्रसार सरकारी, सामाजिक आणि खाजगी अशा विविध पातळ्यांवरून होत आला आहे. 'शिक्षण हा मुलांचा हक्क' आहे, हे सूत्र सरकारने आता धोरण म्हणून स्वीकारले आहे. पण वर उल्लेख केलेल्या आणि त्याच तळमळीने कार्य करणाऱ्या महान व्यक्तींना अपेक्षित होता तो शिक्षणाचा गाभा उच्च मानवी मूल्यांचा होता.. चारित्र्यनिर्मितीचा होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांबरोबरच स्त्रीप्रतिष्ठा, श्रमप्रतिष्ठा, सदाचार, माणुसकी, सहिष्णुता, उदारमतवाद ही मूल्येही शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या मनात रुजली पाहिजेत.. जीवनात उतरली पाहिजेत, अशी त्यामागची अपेक्षा होती. संख्यात्मक वाढीत हा गुणात्मकतेचा गाभा दुर्लक्षित होत गेला.. हरवल्यासारखा झाला. नोकरी-व्यवसाय प्रधानतेमुळे भाषा, समाजशास्त्रे, मानव्य यांच्या शिक्षणाला दुय्यमत्व आले, असे आजचे चित्र आहे. माणसांची मने घडविण्याच्या, मनाची मशागत करण्याच्या संस्काराचा गाभा हरवल्यामुळे मूल्यहीनता वाढत गेली. मार्गांचा विधिनिषेध बाळगण्याची गरज वाटेनाशी झाली. ज्ञानापेक्षा धनाला, त्यागापेक्षा भोगाला आणि मनापेक्षा तनाला अधिक महत्त्व समाजजीवनात आणि व्यक्तिगत आयुष्यातही येत गेले. समाजातील विचारी आणि विवेकी व्यक्ती-शक्तींनी याची दखल जितकी आणि जितक्या गांभीर्याने घ्यायला हवी होती तेवढी घेतली नाही. त्यातूनच अनाचार वाढत गेला.

एक पुरुष शिकला, तर एक व्यक्ती शिकते, पण स्त्री शिकली, तर सगळे कुटुंब शिकते.'

सत्ता-संपत्ती हेच प्रतिष्ठेचे साधन होत गेले. आज तेच राजमान्य आणि समाजमान्यही झाल्याचे आपण पाहतो. अनुभवतो आहोत. समाजाच्या जडणघडणीत मूलभूत महत्त्वाचे स्थान असलेल्या शिक्षण क्षेत्रातही शिक्षणापेक्षा पैसा, राजकारण आदी शिक्षणबाह्य विचार आणि घटक प्रभावी झाल्याचे दृश्य ही त्याचीच परिणती आहे. ही वाटचाल धोक्याची आहे. समाजाच्या आणि राष्ट्राच्या ती हिताची नाही. या संकटावर मात करण्यासाठी शिक्षणातील चारित्र्यनिर्मितीचा, संस्कारांचा गाभा पुनर्प्रस्थापित करावा लागेल आणि त्याची सुरुवात प्राथमिक शिक्षणापासून करावी लागेल.

अनेक कायदेकानू आणि योजना होऊनही आजही मुलांमधला एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे. गरिबीपासून सुविधांच्या अभावापर्यंत त्याची अनेक कारणे आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि पुरोगामी म्हटले जाणाऱ्या राज्यातही जवळजवळ तेहतीस टक्के मुले शाळेतच जात नाहीत. म्हणजे अत्याधुनिक प्रगतीच्या एकविसाव्या शतकात आपण भावी पिढीचा एकतृतियांश वर्ग शिक्षणापासून दूर ठेवत आहोत. परिणामी; शिक्षणापासून होणाऱ्या सर्व लाभांना हा एवढा मोठा समाज मुकणार. असे झाले, तर राष्ट्र प्रगत कसे होणार ? म्हणून, एकही मूल शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, याची काळजी घेणे हे आपले-सरकारचे आणि समाजाचेही ते धोरण पहिले कर्तव्य असले पाहिजे. मुलांचा शिक्षणाचा अधिकार हा केवळ कागदोपत्री योजनांमध्ये राहता कामा नये, तर प्रत्यक्षात उतरले पाहिजे. दुसरा भाग अधिक व्यापक आणि महत्त्वाचा, पण जटिल आहे. तो म्हणजे प्राथमिक शिक्षणाची मूल्यनिष्ठ गुणवत्ता वाढवण्याचा. सहा ते सोळा हे मुलांचे व्यक्तिमत्त्व घडण्याचे वय मानले जाते. कुटुंबातील संस्कारांबरोबरच या वयात शिक्षणातून होणारे संस्कार भावी पिढी घडविण्यासाठी फार महत्त्वाचे आहेत. उत्तम शैक्षणिक सोयी-सुविधा तर हव्यातच, पण उत्तम शिक्षक हा त्याचा प्राण आहे. या स्तरावरचा शिक्षक हा चारित्र्यवान, ज्ञानी, मुलांवर प्रेम करणारा आणि त्यांच्या आयुष्याला आकार देण्यात आपला वाटा मोठा, मोलाचा आहे, याची जाणीव असणारा, तळमळीने त्यासाठी झटणारा हवा. अशा शिक्षक-शिक्षिकांचा मुलांच्या मनावर होणारा परिणाम दीर्घकाळ टिकणारा असतो. कुठेच अन्य काही नोकरी-धंदा मिळत नाही, म्हणून शिक्षकी 'पेशा' पत्करणाऱ्यांना त्यात स्थान नाही. मनापासून आवडीने आणि आंतरिक तळमळीने हे राष्ट्रकार्य करण्यासाठी पुढे येणाऱ्या ज्ञानवंतांची मांदियाळी पुढे आली पाहिजे. असे तरुण-तरुणी जाणीवपूर्वक निवडले पाहिजेत.

या संदर्भात नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ सर सी.व्ही. रामन यांच्या जीवनातला एक प्रसंग मार्गदर्शक आहे. सर सी. व्ही. रामन् यांना आपल्या वैज्ञानिक संस्थेसाठी काही लोक नेमायचे होते. मुलाखतीला आलेल्यातल्या एका उमेदवाराची मुलाखत झाल्यावर रामन यांनी त्याला नाकारले. आपल्या पात्रतेच्या कसोटीला तो उतरत नसल्यामुळे त्याची निवड केलेली नाही, हे रामन यांनी त्याला सांगितले. तो हिरमुसला होऊन बाहेर पडला. बऱ्याच वेळाने, सर्व मुलाखती संपल्यावर रामन बाहेर पडले, तेव्हा तो उमेदवार कारकुनापाशी थांबलेला त्यांना दिसला. रामन रागावले, ''तुम्ही आमच्या निकषांना पात्र ठरलेला नाहीत, तुमची निवड झालेली नाही, हे तुम्हाला सांगितलेसुद्धा. तरीही तुम्ही का थांबला आहात?'' असे त्यांनी त्याला कडक शब्दात सुनावले. विनम्रपणे त्याने सांगितले, ''माझी निवड झालेली नाही, हे मला माहीत आहे. पण प्रवासखर्चाची म्हणून यांनी (कारकुनाने) दिलेली रक्कम माझ्या झालेल्या खर्चापेक्षा जास्त आहे. ती परत देण्यासाठी यांच्याकडची गर्दी संपण्याची वाट बघत मी थांबलो आहे.'' रामन हे ऐकून क्षणभर थबकले. त्यांनी त्याला पुन्हा आपल्या खोलीत यायला सांगितले. आता आणखी काय होणार, म्हणून घाबरत तो गेला. रामननी त्याला विचारले, ''कामावर कधीपासून रुजू होऊ शकता?'' तो गोंधळलाच. हा बदल कसा झाला, हे त्याला कळेना. त्याने विचारल्यावर रामननी त्याला सांगितले, ''मघाशी मी तुला नाकारले, ते ज्ञानातल्या उणिवेमुळे, आणि आता तुला घेतो आहे ते चारित्र्यातल्या जमेमुळे. कारण ज्ञानातली उणीव भरून काढता येते, चारित्र्यातली उणीव भरून काढता येत नाही.'' शिक्षणाविषयी, भावी पिढ्यांच्या भल्याविषयी आणि राष्ट्रहिताविषयी आस्था, तळमळ असणाऱ्यांनीच नव्हे, तर एकूणच सर्व समाजाने यातून खूप शिकण्यासारखे आहे.

❖❖❖



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्रांतीचे तत्त्वज्ञान

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक क्रांतीचे तत्त्वज्ञान समजून घेताना त्यांच्या शिक्षणविषयक सर्वांगीण मतांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिक्षणविषयक धारणा अशी होती की, व्यक्तीच्या विकासासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. शिक्षणामुळेच मागासवर्गीयांची प्रगती होऊ शकेल त्यांना शासन, प्रशासनात काम करण्याची संधी मिळू शकेल. त्याचबरोबर त्यांना शिक्षणामुळे शासनात काम करण्याची संधी मिळाली तर शासनाचे धोरणात्मक निर्णय प्रभावित करण्यासही बळ मिळेल व यामुळे मागासवर्गीयांच्या विकासाला चालना मिळू शकेल. यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण सर्वांना मिळावे, असा आग्रह नेहमीच धरलेला होता. शिक्षणाच्या निमित्ताने जेव्हा ते परदेशामध्ये गेले तेव्हा त्यांनी तेथील शासन, प्रशासन व्यवस्था व बौद्धिक जीवन जवळून पाहिले. उद्या जेव्हा आपला देश स्वतंत्र होईल तेव्हा आमच्यासह जे मागास आहेत त्या सर्वांचे मानवी हक्क केवळ शिक्षणानेच शाबूत राहतील असे त्यांना वाटत असे.

शिक्षणातील आपल्या बांधवाच्या दुर्लक्षितपणाची जाणीव त्यांना नेहमी होत होती, त्यामुळे आपल्या लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी शक्य त्या प्रत्येक साधनाचा उपयोग केला. १९२४ मध्ये त्यांनी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. ही संस्था स्थापन करण्याचा त्यांना एवढाच उद्देश होता की, या मार्फत वसतिगृह उघडून दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रचार, प्रसार करणे, वाचनालय, समाजकेंद्रे किंवा अभ्यास मंडळं सुरू दलित समाजात संस्कृतीच्या प्रचाराचे प्रचालन करणे. या संस्थेमार्फतही बाबासाहेबांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. शिक्षण ही आजची मोठी गरज आहे. वेळ आली तर उपाशी राहा पण मुलाबाळांना शिकवा. 'शिकेल तोच टिकेल' असे त्यांना नेहमी वाटत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली संपूर्ण हयात अस्पृश्यता, जातीयता निर्मूलन याच्या संघर्षासाठी घालवली. वर्ग-जात आणि व्यक्तित्व यांच्यासंदर्भात सर्व हितसंबंधांना भेद देऊन ते बहुसंख्यांच्या कल्याणासाठी जीवनभर झिजले. येथील वंचित, शोषित पीडित, दलित समाजाचे शिक्षण झाले पाहिजे. हा त्याचा आग्रह यासाठीच होता. त्यांनी 'शिका, संघटित व्हा संघर्ष करा' या तीन तत्त्वांचा कायम पुरस्कार केला. त्यांच्या या तत्त्वातच शिक्षणाचे सार सामावलेले आहे. त्यांच्या दृष्टीने शिका म्हणजे शिक्षण ही शोषणमुक्तीची पायवाट होती. संघटित होणं म्हणजे एक विशिष्ट ध्येयासाठी संघटन बांधणं आणि संघर्ष

*केवळ शिक्षण हे या देशातील दलित आदिवासी, वंचित, उपेक्षित घटकांतील लोकांच्या प्रगतीचे माध्यम आहे, शिक्षण ही आजची मोठी गरज आहे. वेळ आली तर उपाशी राहा पण मुलाबाळांना शिकवा.*



डॉ. बबन जोगदंड
संशोधन अधिकारी यशदा, पुणे
संपर्क : ९८२३३३८२६६

म्हणजे क्रियाशील होणं होतं. भारतातील दलित, पददलितांच्या दैन्यावस्थेवर उपाय म्हणजे शिक्षण हे 'रामबाण' उपाय होय अशी त्यांची खात्री होती. जेव्हा बाबासाहेब अमेरिकेत शिक्षणासाठी होते. तेव्हा त्यांनी वडील रामजी सुभेदार यांच्या मित्राला पत्र लिहिले होते. त्यातही त्यांनी दीन-दलिताचं दैन्य संपवणारा एकमेव मार्ग म्हणजे त्यांचं शिक्षण होय, असे म्हटले होते. कार्यकर्त्यांनी शिक्षणासाठी झटले पाहिजे असाही त्यांचा आग्रह होता. शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम आहे, असेही ते म्हणत. त्यांनी शिक्षण हे मूल्याधिष्ठित म्हणजेच उच्चतम नैतिक आचरण निर्माण करणारे असावे याबाबत असे म्हटले होते की, जो आपल्या पत्नी आणि अपत्यांपेक्षाही शिक्षणावर अधिक प्रेम करतो तो खरा शिक्षणप्रेमी होय. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे, असे त्यांना नेहमीच वाटत असे आणि म्हणूनच या लोकशाही देशात झपाट्याने शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाला.

'शिकेल तोच टिकेल'

त्यांच्या स्वत:च्या विद्‌वतेबद्‌दल तर सांगायलाच नको. त्यांनी कधी उपाशी राहून तर कधी पावाच्या तुकड्यावर अहोरात्र या दुबळ्या समाजाच्या कल्याणासाठी अभ्यास केला. एम.ए. या पदवीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेत उच्चशिक्षणासाठी गेले होते. ते केवळ पदव्या मिळवण्यासाठीच नाही तर अर्थशास्त्र, राजकारण मानववंशशास्त्र, नीतिशास्त्र, व्यापार, समाजशास्त्र या विषयांवर त्यांना प्रभुत्व मिळवायचे होते. या विषयांचा सखोल अभ्यास करून कोलंबिया विद्यापीठाला दि. १५ मे १९१५ रोजी 'ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी' हा प्रबंध सादर केला. दि. २ जून १९१५ रोजी या प्रबंधाच्या आधारावर त्यांना एम.ए. ची पदवी मिळाली. दरम्यानच्या काळात कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालयात पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्याशी त्यांची ओळख झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयात सर्वांच्या अगोदर हजर असत आणि सर्वांत शेवटी बाहेर पडत असत, असा विद्यार्थी कोण याची उत्सुकता लाला लजपतराय यांना होती. त्या अनुषंगाने ही ओळख झाली होती. लाला लजपतराय हे लंडनहून न्यूयॉर्कला आलेले होते. असेच एकदा या दोन भारतीय विद्यार्थ्यांचा संवाद सुरू असताना प्राध्यापक सेलिग्मन तिथे आले. प्रा. सेलिग्मन यांचे सूपर्ण नाव एडविन रॉबर्ट अँडरसन सेलिग्मन होय. त्यांनी सुद्धा या दोघांच्या संवादात भाग घेतला. प्राध्यापक एडविन सेलिग्मन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यशास्त्र आणि समाजशास्त्राचं सखोल ज्ञान ऐकून होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्‌दल गौरवपर उद्‌गार काढले. ते म्हणाले, भीमराव आंबेडकर हिंदी विद्यार्थ्यांमध्येच केवळ श्रेष्ठ आहेत असं नाही, तर अमेरिकन विद्यार्थ्यांमध्येसुद्धा ते श्रेष्ठ आहेत. अशी जागतिक स्तरावर बाबासाहेबांची छाप होती. पुढे त्यांना ९ मे १९१६ रोजी कोलंबिया युनिव्हर्सिटीमध्ये समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. ए. ए. गोल्डनवायझर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित झालेल्या मानववंशशास्त्र या विषयावर चर्चासत्रात आपला शोधलेख वाचण्याची संधी मिळाली. त्यानुसार भारतातील जाती, त्यांची रचना, उत्पत्ती आणि वृद्धी हा शोधनिबंध वाचून समाजशास्त्राच्या साऱ्याच विद्वानांचे लक्ष त्यांनी वेधले होते. या समाजशास्त्राच्या नियतकालिकामध्ये डॉ. आंबेडकरांच्या जातीवरील प्रबंधाचा निवडक भाग त्या महिन्यातील जगातील उत्कृष्ट वाङ्मय या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. या सन्मानार्थ कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसरांनी आणि विद्यार्थ्यांनी एक मेजवानीही डॉ. आंबेडकरांना दिली. असे अनेक प्रसंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विदेश शिक्षणाच्या वेळी घडले व या साऱ्या प्रसंगातून त्यांची विद्‌वत्ता जागतिक स्तरावर सिद्‌ध झाली.

डॉ. बाबासाहेबांनी आयुष्यभर शिक्षणासाठी आपले आयुष्य झिजविल्याने ते या देशातील सर्वोच्च विद्‌वान ठरले आणि म्हणूनच त्यांना या देशाची राज्यघटना लिहिण्याची संधी प्राप्त झाली आणि एका मागास जातीत जन्मलेल्या या हिऱ्याने या देशाचे सर्व कायदे-कानू घटनेच्या माध्यमातून तयार करून आपल्या सर्वांच्या आयुष्याला एक नवी दिशा दिली. त्यांनी लिहिलेल्या घटनेमुळेच आपणास मुक्त शिक्षणाची संधी प्राप्त झाली. या शिक्षणातून अनेक जण मोठ्या

**‘शिका, संघटित व्हा, संघर्ष करा’**

हुद्द्यांवर पोहचले. त्यांच्यात आत्मभान आले आणि समाजात एक वेगळा दर्जा प्राप्त झाला.

युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जातीयतेचे चटके सहन करीत उच्च विद्या संपादन केली. त्यांना या विद्येच्या जोरावरच या देशाचे ‘संविधान’ लिहिण्याची संधी प्राप्त झाली. त्यांनी लिहिलेले भारतीय संविधान हे जगश्रेष्ठ ठरले. केवळ शिक्षण हे या देशातील दलित आदिवासी, वंचित, उपेक्षित घटकांतील लोकांच्या प्रगतीचे माध्यम आहे, हे ओळखून डॉ. आंबेडकरांनी प्रचंड शिक्षण घेतले. एम.ए., पी.एच.डी., डी. लिट. बार ॲट लॉ अशा कितीतरी पदव्या त्यांनी त्या काळी संपादन केल्या. अठरा-अठरा तास अभ्यास करून त्यांनी या देशातील वंचिताचे दु:ख, दैना समजून घेऊन त्यावर उपाय सुचविले व राज्यघटनेच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले.

खरे तर बाबासाहेब आंबेडकरांचे वडील रामजी सुभेदार यांचे बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक क्रांतीला अधिक योगदान आहे. त्यांचे वडील रामजी सुभेदार हे १४ वर्ष सैन्यात शिक्षक म्हणून नोकरीस होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधिक जाणले होते. त्यांनी लहान असतानाच बाबासाहेबांवर पाच महत्त्वाचे संस्कार केले होते. त्यामध्ये शिक्षण, स्वावलंबन, स्वाभिमान, शिस्त, कठोर परिश्रम यांचा समावेश होता. त्यामध्ये त्यांनी शिक्षणास सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यानुसार डॉ. बाबासाहेबांची वाटचाल सुरू झाली आणि त्यांनी शिक्षणातून एवढे ज्ञान संपादन केले की, त्या ज्ञानाच्या जोरावर या देशातील सर्व अस्पृश्य समाजाचे जीवनच बदलून टाकले. त्यांच्या शिक्षणाच्या प्रेरणेनेच आज या देशामध्ये दलित, आदिवासी समाजाचे अनेक लोक मोठमोठ्या हुद्द्यांवर स्वाभिमानाने काम करीत आहेत. या समाजात शिक्षणातून एवढे परिवर्तन झाले आहे की ते इतर कोणत्याच समाजाचे झाले नाही. एवढी शिक्षणाची ताकद आहे. डॉ. आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जावे लागले, २१ जुलै १९१३ रोजी डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला होता. त्या घटनेला गतवर्षीच १०० वर्षे पूर्ण झालीत. या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व लक्षात घेऊन कोलंबिया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृती पुतळा विद्यापीठात बसविला व त्यांच्या नावाने विद्यापीठात एक अध्यासन केंद्रही स्थापन केलं. अशा या कर्तबगार शिक्षणवीराची अमेरिकेसारख्या देशाने दखल घेऊन बाबासाहेबांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा सन्मान केला ही बाब भारतासाठी गौरवशाली आहे. या त्यांच्या शैक्षणिक कार्यातूनच आपणास शैक्षणिक क्रांतीचे तत्त्वज्ञान समजून येईल.

❖❖❖

एक व्यक्ती आपल्या अखंड जीवनामध्ये संपूर्ण समाजाचा कायापालट, परिवर्तन करू शकते, हे स्वत: डॉ. आंबेडकरांनी विद्वत्तेच्या, ज्ञानाच्या जोरावर संपूर्ण जगाला दाखवून दिलेले आहे. ज्ञान ही महान शक्ती आहे. या शक्तीचा अधिकार डॉ. बाबासाहेबांच्या शरीराच्या प्रत्येक रोमारोमांत अवतरलेला होता. याप्रमाणे ‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते दूध जो कोणी प्राशन करील तो एक दिवस डरकाळ्या फोडल्याशिवाय राहणार नाही.’ एवढी जबरदस्त ताकद शिक्षणामध्ये सामावलेली आहे. हे स्वत: डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाच्या जोरावर संपूर्ण जगाला सिद्ध करून दाखविले आहे.

# आदर्श शाळा संकल्पना




**डॉ. उमेश दे. प्रधान**
माजी प्राचार्य,
निमंत्रक, इंग्रजी विषय
अभ्यास मंडळ व
संपादन सहाय्यक सदस्य
शिक्षण संक्रमण
संपर्क : ९४२२०३६०७०


आदर्श शाळेच्या संकल्पना अनेक पद्धतीने मांडल्या जातात.

*शाळा हेच आमुचे आनंदनिधान । अर्पू तन मन, शाळेसाठी ।।*
*शालामंदिरात, विद्यार्थीच देव । झिजवू आमचा जीव त्यांच्यासाठी ।।*

किंवा शाळा ही विद्यामंदिर आहे. जेथे विद्यार्थी हे दैवत आहे आणि शिक्षक त्यांचे पुजारी आहेत. आणखीन काहीजण म्हणतात की शिक्षक हा कुंभार आहे आणि विद्यार्थी रूपी कच्च्या गोळ्याला प्रेमाने थोपटत हाताने तो आकार देत असतो, घडवत असतो. शिक्षकाने विद्यार्थ्यांना मन लावून या हृदयीचे त्या हृदयी घातले. याला म्हणायचे आदर्श शिक्षण. यासारख्या भावनात्मक, शब्दच्छल करणाऱ्या कृतीशून्य विचार मांडण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून आदर्शता कशी आणता येईल, गुणवत्ता कशी जोपासता येईल, त्याचा विचार करूया. कर्मवीर भाऊराव अण्णांच्या शब्दात मांडायचे झाले तर केवळ विचार मांडून जनतेत बदल होणार नाही त्यासाठी शिक्षणात सुधारणा करणे आवश्यक आहे.

'आदर्श शाळा' ही संकल्पना केवळ utopian किंवा केवळ कल्पना नाही, स्वप्न किंवा अपेक्षा नाही. तर ते एक वास्तव आहे, प्रत्यक्ष अनुभव आहे. आदर्शत्व हे व्यक्तीसापेक्ष असले तरीही अशी काही जी शाश्वत तत्त्वे आहेत. ती सर्वच ठिकाणी सर्वांना आवश्यक वाटत असतात. अशा तत्त्वांच्या आचरणाने शाळा आदर्श बनू शकते. आदर्श या शब्दाबरोबर अलीकडे एक संकल्पना पुन: पुन्हा पुढे येते आहे. ती म्हणजे 'गुणवत्ता'. NAAC च्या धर्तीवर SAAC येऊ घातले आहे. निरीक्षणातील सर्वांगीण गुणवत्ता व्यवस्थापन या विषयांतर्गत मर्मर मुखोपाध्याय NIPA, New Delhi यांनी हा विषय सखोलपणे मांडला आहे.

प्रथमत: शाळेची परिणामकारकता आणि क्षमता ही गुणवत्तेची लक्षणे मानली जातात. दुसऱ्या एका मुद्द्यात गुणवत्ता जबाबदारीच्या संदर्भात मांडली आहे. ज्या शाळा मर्यादा आखून त्या पाळतात, लक्ष्य साधण्यास कठोर पावले उचलतात आणि ज्यांचे निकाल चांगले असतात अशा शाळा गुणवत्तापूर्ण असतात.

> आदर्श
> गुणवत्ता
> *Quality*
> *Standard*
> दर्जा
> शाळांनी
> गाठावयाचा
> कसा ?

यात गुणवत्तेची व्याख्या ही वेगवेगळ्या व्यक्तींच्या नजरेतून मांडल्याचे दिसते. उपभोक्त्याच्या दृष्टीने, प्रक्रिया आणि निष्पत्ती यावर आधारित, अलौकिक अथवा असाधारण, सातत्य किंवा परिपूर्णता. खरतर गुणवत्ता ही संकल्पनाच व्यवसाय क्षेत्रातून आली आहे. Total Quality Management म्हणूनच inter disciplinary बाबींचा विचार करूनच गुणवत्तेचा विचार करावा लागेल. गुणवत्ता शोध ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. म्हणूनच शाळांनी गुणवत्तेची त्यांची संकल्पना निश्चित करून त्या अनुषंगाने जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. शालेय स्तरावरील गुणवत्तेची विविध अंगे Total Quality Management मध्ये विचारात ध्यानी लागतात. यात विविध नियोजने, व्यवस्थापन, उपलब्धता, उद्दिष्टे, ती साध्य करण्याकरिताची प्रक्रिया यासारख्या विविध घटकांचा समावेश होतो.

SAAC साठीचा पायाभूत अभ्यास हा राज्य शिक्षण मंडळातर्फे विकसित करण्यात आलेल्या प्रतवारी पुस्तिकेत झाल्याचे दिसते. प्रत्येक शाळेने आपण इतरांच्या तुलनेमध्ये आणि स्वत:च्या तुलनेत कोठे आहोत हे या स्वयंमूल्यमापन (self assessment) प्रक्रियेतून ठरवता येणार आहे. प्रत्येक शाळाप्रमुखाने ही प्रतवारी पुस्तिका दरवर्षी भरणे आणि स्वत:च्या शाळेचा दर्जा ठरविणे बंधनकारक आहे. पण लक्षात कोण घेतो !

या प्रतवारी पुस्तिकेच्या संदर्भात गुणवत्तेची केलेली व्याख्या 'ध्येयाकडे किंवा उद्दिष्टांकडे पोचण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान भौतिक, प्रशासकीय, शैक्षणिक सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून मिळविलेले यश म्हणजेच शैक्षणिक गुणवत्ता' यानुसार शाळांची प्रतवारी ठरवितात. पुढील मुद्दे विचारात घेता येतील.

- प्रत्येक शाळेने स्वत:ची अशी उद्दिष्टे निश्चित करावी.
- विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधणे.
- शाळेतील वातावरण आनंददायी आणि प्रेरणात्मक ठेवणे.
- विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणे.
- शिक्षकांच्या मध्ये व्यवसाय-संस्कृती निर्माण करणे.
- शालेय कामकाजातील पालकांचा सहभाग.
- शाळा हे समाजातील सांस्कृतिक केंद्र बनविणे.
- शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद ठेवणे.

***'Quality is not something to be achieved but it is ceaseless endeavour to achieve something unachieved ?***

तसेच शाळेची प्रतवारी निश्चित करण्यासाठी ५ घटकांचा विचार केला आहे. १. शालेय भौतिक सुविधा व परिसर शालेय व्यवस्थापन ३. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास (शैक्षणिक, भावनिक, क्रियात्मक) ४. पर्यवेक्षण ५. शाळा आणि समाज.

शाळा कितपत आदर्श आहे हे ठरवण्यासाठी समाजातील विविध घटकांच्या प्रतिक्रिया अजमावणे आवश्यक आहे. उदा. विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या, शिक्षणाधिकाऱ्यांच्या, शाळा परिसरातील समाजघटकाच्या, माजी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया या निश्चितच मार्गदर्शक ठरू शकतील. शाळेला त्यांच्या त्रुटी, उणिवा समजतील व त्यातूनच ते प्रगती साधू शकतील असे या प्रतवारी पुस्तिकेचे स्वरूप आहे.

## Good Schools - A Secondary School Enquiry

***A school will be as good as the quality of its staff and the quality of their team work. The staff spend a considerable amount of time in planning and discussing their courses and teaching.***

***The staff of the school pools their ideas and aims, method, content and regularly evaluate their success in achieving objectives.***

***Good preparation, variety of approaches regular and constructive correction of pupil's work and consistent encouragement are the hallmarks of successful teaching seen.***

***The successful school encourages individual pupils to attain the highest standard of which they are capable by providing an appropriate challenge.***

अशाच शाळा आदर्श ठरू शकतात. ज्या नियोजनाला योग्य ते महत्त्व देतात, कर्मचाऱ्यांमधील कार्यक्षमता - सहसंबंध यावर ते अवलंबून आहे.

शिक्षणातील गुणवत्तावाद, दर्जेदार शिक्षण, आदर्श शाळा, अ दर्जाची शाळा असे शब्दप्रयोग वापरले जातात.

परंतु या शब्दांच्या किंवा आदर्शाची व्याख्या केल्याचे जाणवत नाही. असे निकष निश्चित करून गुणवत्ता व शैक्षणिक दर्जा ठरविण्यासाठीच्या पुढील बाबींचा विचार समजून घेणे आवश्यक आहे.

१. पटनोंदणी
२. विद्यार्थ्यांची उपस्थिती व टिकून राहण्याचे प्रमाण
३. विद्यार्थ्यांची संपादणूक
४. शिक्षकांची उपस्थिती व वर्तणूक
५. शिक्षकांचे अध्यापन कार्य - नियोजन, पूर्वतयारी, प्रयोगशीलता, उपक्रमशीलता, साहित्यनिर्मिती
६. शिक्षकाच्या सामाजिक कार्यातील सहभाग, पालकांशी संपर्क
७. शालेय इमारत, भौतिक सुविधा, शैक्षणिक साहित्य उपलब्धता
८. विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचे सर्वेक्षण
९. सहशालेय उपक्रम
१०. शालेय प्रतवारी



दिवसेंदिवस अशा गुणवत्तेची गरज वाढत जाणार कारण LPG - Liberalisation, Privatisation and Globalisation चा होणारा परिणाम - विविध परकीय शाळांनी रोवलेले पाय, CBSE affiliation कडे वाढत चाललेला कल, भरमसाठ फी आकारणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा या समाजाची गुणवत्तेची भूक, अपेक्षाच दर्शवितात. आपण हे आवाहन कसे पेलणार आहोत ? या गुणवत्तेबाबत conscious सजग आहोत का ? काही जाणीवपूर्वक प्रयत्न करतो आहोत का? हे पहाणे गरजेचे आहे.

एकंदरीत शाळा-शाळांमधून गुणवत्तेची जाणीव काय आहे? हा मोठा प्रश्न आहे.

'Quality is not something to be achieved but it is ceaseless endeavour to achieve something unachieved ?

*अर्थात गुणवत्ता संपादन करणे हे साध्य नसून ती एक सातत्यपूर्व प्रक्रिया आहे.*

**एखाद्या कार्यगटाची प्रगती, गुणवत्ता ही ती संस्था इतर कार्यगटातून काय घेते किंवा शिकते यावर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.**

म्हणूनच शाळामधून गुणवत्तावाढीसाठी जाणिवपूर्वक प्रयत्न होणे, शिक्षकांच्या, पालकांच्या सातत्याने सभा होणे व गुणवत्ता हा ध्यास होणे गरजेचे आहे. म्हणूनच आदर्श शाळेची स्वप्ने साकार करण्यासाठी मला काही प्रयोग सुचवावेसे वाटतात.

मुख्याध्यापकांसाठी आणि शिक्षकांसाठी शाळा भेटी योजना. विविध शाळांमधून जे चांगले आहे किंवा इतर शाळांपेक्षा आपल्या शाळेत काम चांगले आहे हे तपासून पाहण्याची ती एक संधी असेल. इतरांच्या तुलनेत आपण कोठे आहोत हे यातून समजणार आहे. पुण्यात आल्यावर काय पहाल ? प्रेक्षणीय स्थळे जरूर बघा. पण एक शिक्षक म्हणून डोळसपणाने विविध शाळांची अंतरंगे पहा. चांगलेच आढळेल असे नाही. पण अपेक्षांची जाणीव तरी होईल. निरीक्षणातून नेमकेपणा वाढण्यास मदत होईल.

शाळांमधून प्रत्येक व्यक्तीची आणि शाळेमध्ये घडणाऱ्या विविध कृतींमधील accountability तपासून पाहणे, आवश्यक ते बदल करणे, फेरविचार करणे, सुधारणा करणे यातून शक्य होणार आहे. म्हणूनच financial auditing च्या बरोबर educational auditing सातत्याने होणे गरजेचे

आहे. ज्यामधून अनेक समस्यांवर उपाय शोधता येणे शक्य होणार आहे. साधारणपणे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काय ठरवले होते आणि वर्षाच्या शेवटी त्याचे काय झाले याचे प्रत्याभरण होणे गरजेचे आहे. कारण प्रत्येक शैक्षणिक संस्थाही विद्यार्थ्यांना, पालकांना, समाजाला answerable आहे याची जाणीव शाळेमधील प्रत्येक घटकाने ठेवणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाबरोबरच, शिक्षकांचे, मुख्याध्यापकांचे, संस्थासंचालकांचे मूल्यमापन होणेपण गरजेचे आहे. हे मूल्यमापन - स्वयंमूल्यमापन, सहकाऱ्याने करावयाचे (Peer) मूल्यमापन, अधिकाऱ्याने करावयाचे मूल्यमापन अशा विविध स्वरूपाचे असणे गरजेचे आहे. अशा मूल्यमापनाचे निकष, संदर्भ मुद्दे ठरवावे लागतील, त्याची नियोजन आणि कार्यवाही निश्चित करावी लागेल. शाळांची गुणवत्ता आणताना, वाढवताना किंवा टिकवताना आपल्याला सर्वगुणसंपन्न व्यक्ती आयती मिळणार नाहीए तर अशी व्यक्ती आपल्याला तयार करावी लागणार आहे. त्या व्यक्तींमध्ये आपल्याला सुधारणा घडवून आणून, त्यांना सक्षम करून आपला हेतू साध्य करावा लागणार आहे.

**शाळांची गुणवत्ता हे अंतिम ध्येय नाही. एकदा संपादन करावयाची ही बाब नाही.**

सुधारणा, दर्जा, प्रत वाढवत असताना कृती संशोधनाचे महत्त्व ओळखावयास हवे. शाळांमधील समस्या निराकरणास कृती संशोधन हा एक उत्तम उपाय आहे. परंतु परत एकदा हा विषय केवळ B.Ed./M.Ed. अभ्यासापुरताच मर्यादित राहिल्याचे दिसते. शाळाप्रमुखांनी आपल्या शाळेमधील समस्या, प्रश्न, गरजा निश्चित करून शिक्षकांना किंवा शिक्षकांच्या गटांना असे विषय निवडून देऊन त्याविषयी कृती संशोधन राबवण्यास, समस्या उकल करण्यास उद्युक्त करता येईल आणि समस्यामुक्त वातावरण अनुभवता येईल. यासाठी गरज आहे ती शालेय स्तरावरील कार्यसंस्कृतीची, सर्वांनी सतत कार्यरत राहण्याची.

गुणवत्तेसाठी आणि प्रगतीसाठी आवश्यक आहे SWOT analysis. शाळांनी काय किंवा कोणत्याही working place मध्ये आपली शक्तीस्थाने बळकट करणे, याची जाणीव असणे, येणाऱ्या, सभोवताली असणाऱ्या संधीची जाणीव करून घेणे, आपल्यातील त्रुटी, उणिवा, समजावून घेणे आणि आपल्यात आवश्यक ते बदल घडवून आणणे गरजेचे आहे. त्याच बरोबरीने सभोवताली असणारे धोकेपण जाणून घेणे गरजेचे आहे. स्वत:च्या अस्तित्वासाठी आणि प्रगतीसाठी याची फार मोठी आवश्यकता आहे.

एखाद्या कार्यगटाची प्रगती, गुणवत्ता ही ती संस्था इतर कार्यगटातून काय घेते किंवा शिकते यावर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. Inter disciplinery approach या दृष्टीने महत्त्वाचा आहे. शिक्षणसंस्था ही उद्योग व्यवसायातून, निर्मितीक्षेत्रापासून, हॉटेल व्यवसाय, डॉक्टरी व्यवसाय, अभियांत्रिकी यासारख्या विविध क्षेत्रामधून काय संपादन करते यावर बरेच काही अवलंबून आहे. डॉक्टरी व्यवसायातून आपण नैदानिक चाचण्या व उपचारात्मक पद्धती घेतली, निर्मिती क्षेत्रामधून (Industries, factories) नियोजन घेतले यातूनच आपण चांगले काहीतरी घडवू शकतो. एखाद्या हॉटेलची प्रगती किंवा तिथे मिळणारे रुचकर पदार्थ हे अनेक गोष्टीवर अवलंबून असतात, तो एक अभ्यास असतो, त्यातून शिक्षण व्यवस्थेला काहीतरी शिकता येणे सहज शक्य आहे. विविध क्षेत्रातील चांगले ते आत्मसात करून शिक्षणक्षेत्राला आयती प्रगती गाठता येणे शक्य होणार आहे.

शाळांची गुणवत्ता हे अंतिम ध्येय नाही. एकदा संपादन करावयाची ही बाब नाही. तर Product महत्त्वाचे नसून Process महत्त्वाची आहे. गुणवत्ता संपादनासाठी सातत्याने काय प्रयत्न करण्यात आले ते प्रयत्न महत्त्वाचे आहेत. म्हणूनच शाळेतील नियोजनात बारकाव्यांना महत्त्व देणे गरजेचे आहे. जितके नियोजनातील बारकावे ध्यानात घेतले जातील तितके कार्यक्रम यशस्वीपणे राबविता येणे शक्य होईल. हे बारकावे निश्चित करणे त्या दृष्टीने आवश्यक आहे.

शाळेची गुणवत्ताही बऱ्याच प्रमाणात तेथील अध्यापन-अध्ययन पद्धतीवरपण अवलंबून असते. मनापासून, हृदयापासून, प्रेमाने, आपुलकीने शिक्षकाने शिकवावे असे गृहित धरले जाते. शिक्षकाला गुरुपद बहाल करून देवत्व अर्पण केले जाते. कधी शिक्षकाने विद्यार्थ्यांचे पालक होणे अपेक्षित धरले जाते, एक पालक म्हणून शिक्षक विद्यार्थ्यांची काळजी घेतो, त्याच्या गरजा भागवतो. परिणामत: विद्यार्थी परावलंबी बनतो.

कदाचित शिक्षक Priest बनून काय करावे आणि काय करू नये याविषयी उपदेश द्यायला लागतो. खरंतर शिक्षकाने Technician म्हणून राहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना विषय शिकवत असताना त्या विषयातील जास्तीचे ज्ञान कसे मिळवायचे यांचे तंत्रज्ञान, कौशल्य देणे हेच शिक्षकाचे खरे शिकवणे राहणार आहे. प्रत्येक विषयातील व्याप्ती, सखोलता, विषयसंख्या वाढते आहे. ज्ञानाचे विस्फोट दिवसेंदिवस वाढतच आहेत, आजचे ज्ञान उद्या जुने होते आहे, नवीन गोष्टींची भर पडते आहे मग आपले शिकवणे हे जर केवळ ठरावीकच आशयाभोवतीच घुटमळत राहिले तर ते कुचकामी ठरणार आहे. म्हणूनच आशयापेक्षा अध्यापन आणि खरंतर अध्ययन पद्धतीला महत्त्व आले आहे. शिकायचे कसे, ज्ञान, माहिती मिळवायची कशी यांचे तंत्रज्ञान शिक्षकाने देणे गरजेचे आहे.

आपले अध्यापन प्रभावी व्हावे यासाठी शिक्षकांना, मुख्याध्यापकांना, शाळा प्रमुखांना बदलावे लागेल. जुनेच आदर्शवाद कवटाळून चालणार नाही. नावीन्याची, बदलाची कास धरावी लागेल. नव्या वाटा शोधाव्या लागतील. संगणकाशी दोस्ती करावी लागेल. नव्या तंत्रज्ञानाचा शिकवताना वापर करावा लागेल. जास्तीत जास्त माहिती कमीत कमी वेळात मांडता येण्याचे तंत्रज्ञान शिकावे लागेल, वापरावे लागेल. OHP, LCD Presentations आपले आणि विद्यार्थ्यांचे काम सहज करणार आहे. शिक्षकाने Video Conferencing Programme मध्ये सहभाग घेतला पाहिजे. CAL (Computer Aided Learning) चा वापर अध्यापनात करून शिकणे ही प्रक्रिया जास्त परिणामकारक करणे आवश्यक आहे. यासाठी वर्ग सुसज्ज हवेत. प्रत्येकाने Computer literate होणे यासाठी गरजेचे आहे. पाठ्यपुस्तकातील अपुरेपणा, कमतरता दूर होण्यास यामुळे मदत होणार आहे.

Teacher Education, Teacher Training, Teacher Development and Personality Development या शिक्षकाला अद्ययावत ठेवण्यास मदत करणाऱ्या बाबी आहेत. शिक्षक प्रशिक्षणात व्यावसायिक शिक्षण अपेक्षित आहे. ज्यात मूळ पदवीचे विषय येतात. B.Ed. D.Ed. मध्ये किंवा संस्थांनी, शाळांनी आयोजित केलेले उद्‌दिष्टांवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम असतात. Teacher Development हे शिक्षकाला वाटते म्हणून त्याने स्वत:हून स्वत:करिता घेतलेले असते. आपली गरज लक्षात घेऊन तसे शिक्षण त्याने स्वत:हून मिळवणे यात महत्त्वाचे आहे. Personality Development मध्ये स्वत:ची वैयक्तिक काळजी कशी महत्त्वाची आहे ते जाणून घेणे आणि त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. स्वत:ची तब्येत, आरोग्य यांचा परिणाम अध्यापनावर पर्यायाने विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणार आहे. शिक्षकाने याकरिता या चारही स्वरूपाच्या training and development कडे लक्ष देणे गरजेचे आहे. शिक्षकाने स्वत:चे प्रयत्न म्हणजे विविध sources चा वापर करणे आवश्यक आहे. Use of a dictionary म्हणजे केवळ अवघड शब्दांचे अर्थ पहायला नाही तर एरवी सुद्धा वापरण्यास आपण वर्षोनुवर्षे करत असणाऱ्या चुका आपल्याला समजतील. Encyclopedia - Wikepedia - Web-sites browsing करणे आवश्यक आहे. आपआपल्या विषयांशी निगडित अशा असंख्य Websites आपल्याला अभ्यासाला मिळतील.

आदर्श शाळांमधून नियोजनास भरपूर महत्त्व दिले पाहिजे. नियोजनातला बारकावा वाढविणे महत्त्वाचे आहे. हे केवळ 'आदर्श' म्हणजे पाठ्यपुस्तकात बंद करून कपाटात ठेवून प्रेक्षणीय म्हणून मांडण्याची गोष्ट नाही.

वरील विचारांमधूनच आदर्श शाळांची निर्मिती शक्य होईल. अर्थात यासाठी सातत्यपूर्णपणे नियोजन व कार्यवाहीची पण अपेक्षा आहे.

❖❖❖

# शैक्षणिक नेतृत्वाचे मानसशास्त्र व शालेय गुणवत्ता



श्री. लक्ष्मीकांत पांडे
विभागीय अध्यक्ष
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई
संपर्क : ९०४९१४९२२७

**नेतृत्व करण्याची क्षमता असणारे मुख्याध्यापक हे सकारात्मक भावना प्रबळ असणाऱ्या शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचा समूह तयार करतात.**

शाळेचे यश मुख्याध्यापकाच्या नेतृत्व करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. मुख्याध्यापकाच्या तांत्रिक ज्ञानाच्या आधारावर काही शाळा चटकन प्रगती करतात. परंतु अनेकदा तिथेच त्यांची प्रगती थांबल्याचे आपण पाहतो, कारण त्यांनी स्वत:ला बहुगुणीत (Multiply) करण्याची कला शिकलेली नसते. पर्यायाने असे मुख्याध्यापक साहजिकच शाळेसाठी मोठे यश मिळवू शकत नाहीत. जे इतरांना प्रेरित करण्यात यशस्वी होतात तेच हुशार मुख्याध्यापकापेक्षा शाळेला जास्त अगोदर यशस्वी करतात.

नेतृत्व करण्याची क्षमता असणारे मुख्याध्यापक हे सकारात्मक भावना प्रबळ असणाऱ्या शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचा समूह तयार करतात. सिद्धांत असा आहे की, उत्साहाचे संक्रमण होत असते. जेव्हा आम्ही दुसऱ्या व्यक्तीला प्रेरित व्यक्तीच्या संपर्कात ठेवतो तेव्हा ती व्यक्तीही प्रेरित होत असते. जेव्हा आशावाद पुरेशा प्रमाणात वाढतो तो अंतिमत: सकारात्मकतेचा अग्नी प्रज्वलित करूनच, म्हणूनच चांगला मुख्याध्यापक आपल्या सर्वश्रेष्ठ यशस्वी सहकाऱ्यांना दुसऱ्यांच्या संपर्कात ठेवतात. ही स्थिती जळत्या कोळशासारखी असते. एक उत्साही व्यक्तीच दुसऱ्या व्यक्तीत हा अग्नी प्रज्वलित करू शकतो.

काही शाळा, चांगल्या व वाईट दोन्ही दिवसात यशस्वी होताना दिसतात. कारण त्यांनी त्यांच्या शाळेत एक 'समूह संस्कृती' विकसित केलेली असते. याच पद्धतीने नवीन शिक्षक आपोआपच हे शिकतो की, आमच्या शाळेत काम करण्याची एक वेगळीच संस्कृती आहे. मुख्याध्यापकाचे नेतृत्व योग्य असेल तर अशी संस्कृती तयार होऊ शकते. नेतृत्वविषयक काही प्रसंग मला समोर ठेवावेसे वाटतात.

'मी आज खुश होऊन तो प्रसंग आठवतो आहे की, जेव्हा मी धान्याने भरलेले पोते उचलताना आपल्या वडीलांच्या शक्तीची बरोबरी करू लागलो होतो. यानंतर त्याहीपेक्षा अधिक वजनदार पोते उचलण्याचा प्रयत्न करू लागलो होतो, हे पाहून वडिलांना स्वत:चा पराभव होतो आहे हे वाटलेच नाही. त्यांनी विरोध करणे तर सोडूनच द्या पण त्यांना माझा अभिमान वाटू लागला होता. सायंकाळी जेवण करताना समाधानाने हसत माझ्या आईला हा प्रसंग सांगून हे सांगितले की, आपल्या मुलात किती शक्ती आली आहे.'

मला आज हे नेतृत्वाचे सर्वश्रेष्ठ उदाहरण वाटते. अशा उदाहरणाने माणसे अधिक प्रयत्न करण्यासाठी उद्युक्त होतात व अधिकाधिक उंची गाठण्याचा प्रयत्न करतात.

नेतृत्वविषयक दुसरा प्रसंग असा - माझा मित्र सांगत होता की, मी औरंगाबाद येथे शाळेत शिकत होतो व क्रिकेट टिमचा सदस्य होतो. मी काही टिमचा सर्वश्रेष्ठ सदस्य नव्हतो. एक दिवस मुख्य मॅचचा सराव सामना खेळावयाचा होता. आमचे शिक्षक / कोच मैदानावर आमच्यासोबत होते. त्यादिवशी मी उत्कृष्ट खेळ केला. मी विचार करत होतो की, माझा हा खेळ आमच्या शिक्षकांनी / कोचनी पाहिला किंवा नाही ? आम्ही जेव्हा एकत्र झालो तेव्हा इतर खेळाडूंना आमच्या शिक्षकांनी फैलावर घेतले होते व माझीच स्तुती करीत होते. की हा आमचा सर्वोत्कृष्ट खेळाडू नाही. परंतु तो आज किती जबरदस्त खेळला आहे.

मला आजही सुमारे ३६ वर्षांनंतर सुद्धा तो माझी विशेष स्तुती झालेला प्रसंग आठवतो आहे. त्या स्तुतीमुळेच मी मुख्य सामन्यात चांगला खेळू शकलो होतो व सर्वांच्या नजरेत येऊ शकलो होतो.

**लोकांना जेवढ्या क्षमतेचे श्रेय दिले जाते त्यांच्यात त्यापेक्षा अधिक क्षमता असतात**

तिसरा प्रसंग - चिठ्ठीमध्ये जादूची शक्ती असते. खास करून ती स्वहस्ते कुणीतरी लिहिली असेल तर ! तुम्ही त्या चिठ्ठी लिहिणाऱ्या व्यक्तीसमोर महत्त्वपूर्ण असता. विशेष म्हणजे आपल्या मुख्याध्यापकांनी अथवा संस्थाप्रमुखांनी ही चिठ्ठी लिहिली असल्यास हा प्रभाव दुप्पट होतो.

मी सेंट मेरीज, जालना येथे शिक्षकाची नोकरी करीत होतो. शिक्षकांची मिटींग आमचे प्राचार्य घेत होते. या दिवसाच्या एकच दिवस अगोदर आमच्या शाळेची टीम जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिंकली होती आणि त्या टिमला संपूर्ण मार्गदर्शन मी केले होते. मिटींग सुरू होतानाच आमच्या प्राचार्यांनी एक छोटी चिठ्ठी माझेकडे सरकविली, त्यात लिहिले होते 'You are not Pande, you are Pandit' व खाली स्वत:ची स्वाक्षरी नाव लिहून केली होती. मिटींगमध्ये माझी स्तुती व अभिनंदन केले, परंतु ती चिठ्ठी मी पुढे अनेक वर्षे जपून ठेवली होती .... !

नेतृत्व करणाऱ्यांनी वरील उदाहरणातील मानसशास्त्राचा जरूर विचार करावा. या उदाहरणातच प्रेरणा लपलेल्या आहेत.

### मानवी मन

पाश्चात्य तत्वज्ञ डग्लस मॅकग्रेगर यांनी जुना परंपरावादी सिद्धांत जो संस्थाचालक / मुख्याध्यापक अथवा कार्यालयातील प्रशासक ज्यांच्या हाती सत्ता आहे ते असे मानतात की, आमचे कर्मचारी आळशी व मंदबुद्धीचे आहेत, ज्यांना काम करावयाचे आहे हे सातत्याने सांगावे लागते. यावर हल्ला केला व स्वत:चा सिद्धांत मांडला जो 'लोकांना जेवढ्या क्षमतेचे श्रेय दिले जाते त्यांच्यात त्यापेक्षा अधिक क्षमता असतात' असा आहे. ते म्हणतात जेव्हा एखादा दर्जाहीन, आळशी कर्मचारी/व्यक्ती आपण पाहतो तेव्हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा तो फक्त एक हिस्सा असतो, जो एखाद्या विशिष्ट परिस्थितीत नजरेसमोर आलेला असतो. सबब अनुत्साहित अथवा आळशी व्यक्ती असूच शकत नाही. ज्या व्यक्तीला आपण आळशी समजतो त्या व्यक्तीला सहलीला जायचे झाल्यास आपण पहाटे उठून तयारी करताना पाहतो. शाळा सुटण्याची घंटा होताच विद्यार्थी व शिक्षक उत्साहाने बाहेर पडताना दिसतात. त्यांचा हा उत्साह पाहून यातील कुणी आळशी असतील हा विचारच आमच्या मनातून निघून जातो. सायंकाळच्या नियोजित उपक्रमासाठी ते आधीर झालेले असतात आणि मजेची बाब अशी आहे की, हे त्यांनी आखलेले वैयक्तिक खाजगी उपक्रम कित्येकदा नियमित कामापेक्षाही जास्त थकविणारे असतात. मग यांना अनुत्साहित, आळशी कसे म्हणणार ?

मुळातच विद्यार्थी व शिक्षक आळस व कंटाळा याला पसंतच करीत नाहीत. ते अशा मुख्याध्यापकाचे स्वागत करतात जे त्यांना कामामध्ये आनंद घेण्याची कला शिकवू शकतील. कर्मचाऱ्यांमधील अशा शक्तीचा शोध घेतील की

ज्याकडे इतरांनी दुर्लक्ष केले आहे. चांगले मुख्याध्यापक आपल्या कर्मचाऱ्यामधील जी प्रतिमा आहे त्यास प्रोत्साहित कसे करता येईल याचे उपाय शोधत असतात.

## नेतृत्वासाठी महत्त्वाच्या सूचना

१. जेव्हा अनेक व्यक्तींबरोबर आपणास तोंड द्यावे लागते. तेव्हा एक व्यक्ती सहसा हार पत्करते. परंतु एकाच्या ऐवजी दोन व्यक्ती असतील तेव्हा ही कहाणी वेगळी होते. आपण अशा व्यक्तीचा शोध घ्या की जो तुमच्यासोबत प्रत्येक सकारात्मक कार्यासाठी खांद्याला खांदा लावून तयार असतो. अशावेळी तुमची शक्ती नुसती दुप्पटच होत नाही तर बहुगुणित होते.

२. जेव्हा आम्ही विद्यार्थ्यांचे सुयश इच्छितो, जेव्हा आम्ही सेवा करावयास लावण्याऐवजी सेवा करतो तेव्हाच आम्ही सर्वश्रेष्ठ नेतृत्व करीत असतो. स्वत:च्या मुलाच्या प्रती आई-वडिलांची निष्ठा, पक्षाची आपल्या पिलाविषयी निष्ठा - एकाच वेळी सुरक्षा देणे व पिलू उडणे शिकावे म्हणून घरट्यातून धक्का देणे यांचे मिश्रण हेच नेतृत्वाचे सर्वश्रेष्ठ उदाहरण आहे.

३. फक्त १०% अतिरिक्त प्रदर्शन करण्याचे आव्हान देण्याची गरज आहे. जर आम्ही पुढे होऊन विद्यार्थी/शिक्षक/कर्मचारी यांच्यात लपलेल्या शक्तीला कार्यास लावू शकलो तर हे अतिरिक्त १०% असे अंतर सिद्‌ध होते की, ज्यामुळे तुम्ही मॅच जिंकू शकता.

४. खेळाडू हे ओळखून असतो की, जेव्हा त्याचा मुकाबला दुसऱ्या कुणाबरोबर असतो तेव्हाच तो सर्वश्रेष्ठ प्रदर्शन करू शकतो. दुसऱ्या बरोबरची तुलना, विजयाची अपेक्षा आणि उत्कृष्टता या बाबीच त्याला सर्वश्रेष्ठ प्रदर्शनासाठी प्रेरित करतात. म्हणून विद्यार्थ्यांच्या स्तरनिहाय सकारात्मक स्पर्धा लावाव्यात व सर्वांचीच प्रगती मोजण्यासाठी प्रयत्न करावेत.

५. छत्रपती शिवाजी महाराज किल्लेदारास विचारतात, ''तुम्ही हा किल्ला आपणाकडे राखणार काय ? '' किल्लेदार उत्तरतो ''मी प्रयत्न करेन !'' समाधान न झाल्याने महाराज पुन्हा विचारतात, ''तुम्ही हा किल्ला राखणार काय?'' मी पूर्ण शिकस्त करेन ! ''तुम्ही हा किल्ला राखणार काय ?'' ''मी पूर्ण शक्ती पणाला लावेन !'' ''तुम्ही हा किल्ला राखणार काय ?'' ''होय मी हा किल्ला नक्कीच राखणारच ! ...... आता महाराजांचे समाधान होते.

या ठिकाणी 'पाहिजे' 'शक्यतो' या शब्दापासून स्वत:ला वाचविण्याची गरज समजण्यासाठी हे उदाहरण दिले आहे. त्याऐवजी 'मी करणारच' हा विश्वास महत्त्वाचा आहे.

६. आपणास ससा व कासव यांची कथा माहीत आहे. ससा का हरला ? तर उर्जा कमी पडली म्हणून तो हरला. आणि कासव का जिंकले तर उर्जा शेवटपर्यंत टिकली म्हणून ते जिंकले. कासवाची उर्जा जर सशाने प्राप्त केली तर कासव कदाचित जिंकूच शकणार नाही. म्हणून म्हणता येईल की, जो सशाची गती व कासवाची उर्जा प्राप्त करता तोच विजयी होऊ शकतो. मात्र यासाठी प्रत्येक क्षण कारणी लागावा हे महत्त्वाचे आहे.

७. कित्येकदा कर्मचारी/शिक्षक यांना आपल्या मुख्याध्यापकाविषयी अथवा प्रशासकाविषयी तक्रार नसते, परंतु स्वत:च्याच दुसऱ्या सहकाऱ्याविषयी मात्र असते. हे कर्मचारी आपसात अनेकवेळा भांडताना आपण पाहतो. ते मुख्याध्यापकाकडे कित्येकदा निर्णयासाठी सुद्‌धा येतात व स्वत:चीच बाजू खरी आहे हेही मांडतात.

लहानपणी आम्ही बहिणभाऊ आपापसात भांडत होतो व निर्णयासाठी आईवडिलांकडे जात होतो. आई-वडील समजूतदारपणे योग्य वेळी हस्तक्षेप करून समस्या सोडवित होते व काहीवेळा ही समस्या ते हस्तक्षेप न करता

आमच्याच पातळीवर सोडविण्यासाठी सोडत होते.

हे सुद्‌धा नेतृत्वाचेच एक उदाहरण आहे. मात्र मुख्याध्यापकाचा समजूतदारपणा आई-वडिलांसारखा असावा. समूहातील भांडण दीर्घकाळ चालू देणे हे संपूर्णत: अयोग्य आहे. यामुळे आपण समस्यांनाच निमंत्रण देत असतो. मुख्याध्यापकाने परस्पर सामंजस्याचा स्तर तयार करावा व या ठिकाणी स्वत:चे पूर्ण वजन वापरावे.

शैक्षणिक नेतृत्वाच्या मानसशास्त्रावर चर्चा केल्यानंतर आपण उत्कृष्ट मुख्याध्यापकांनी शालेय गुणवत्ता परियोजना कशा रीतीने आखावी याविषयी चर्चा करूया.

## शालेय गुणवत्ता परियोजना

१. विद्यार्थी/शिक्षक संदर्भातील महत्त्वाच्या बाबी :
   अ. त्यांच्या गरजा काय आहेत ?
   ब. त्यांच्या इच्छा काय आहेत ?
   क. त्याचं समाधान कितपत होत आहे ?
२. तक्रारीकडे शिकण्याची संधी म्हणून आपण पाहतो काय ?
३. समस्या निर्माण न होण्यावर भर देतो काय ? शून्य दोष संकल्पना राबवितो काय ?
४. सुधारणेच्या प्रक्रियेत शाळेतील सर्व घटकांचा सहभाग घेतो काय ?
५. सहभाग घेतलेल्या सर्व घटकांची भूमिका व जबाबदारी कोणती आहे याबाबत स्पष्ट भूमिका आहे काय ?
६. एक सुस्पष्ट व्रत म्हणून कार्य करतो काय ?
७. 'गुणवत्ता' ही आपल्या शाळेची संस्कृती झाली आहे काय?
८. कुणाच्याही नवीन सृजनात्मक योजनेला प्रोत्साहन दिले जाते काय ?
९. शाळेची / संस्थेची
   अ. शक्तीस्थाने माहीत आहेत काय ?
   ब. त्रुटी कोणत्या आहेत त्या माहीत आहेत काय ?
   क. शाळेसमोरील संधी कोणत्या आहेत त्या शोधून काढल्या आहेत काय ?
   ड. 'धोके' याबाबत आपण गंभीर आहोत काय ? आपणास शाळे/संस्थेसमोरील धोके माहीत आहेत काय?
१०. 'तात्काळ मूल्यमापन व निर्दोष उपचार' यांची अंमलबजावणी होते काय ?
११. प्रोत्साहन, बक्षीस, पुरस्कार यांचा योग्य वापर होतो काय ?

ही यादी आपणही तयार करू शकता. मग विलंब का ? आजच कामाला लागून शालेय गुणवत्तेला मानसशास्त्रीय बैठक देऊया !

❖❖❖

# एकविसाव्या शतकातील भाषा शिक्षणाचे महत्त्व

**स्वभाषेचे ज्ञानच जर तुटपुंजे असेल तर अशा व्यक्तीचे परभाषेचे आकलन आणि त्यामुळेच अध्ययनही परिपूर्ण होऊ शकणार नाही.**




**सौ. संजीवनी कुवळेकर**
निमंत्रक, जर्मन, फ्रेंच, रशियन, जपानी भाषा विषय अभ्यास मंडळ, पुणे
संपर्क : ९९६०१०२२४४


आजच्या आपल्या शिक्षणव्यवस्थेमध्ये भाषा शिक्षणाकडे कमालीचे दुर्लक्ष होत आहे. पालक, शिक्षक आणि त्यामुळे विद्यार्थीही करियरच्या मागे धावताना भाषेवर प्रभुत्व मिळविण्याच्या बाबतीत उदासीन झालेले दिसतात. वास्तविक पाहता मुलांच्या सर्वांगीण वाढीसाठी भाषा अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

**प्राथमिक स्तर**

बालवाडी ते चौथी या प्राथमिक स्तरांमध्ये जगातील सर्व शिक्षणतज्ज्ञांनी संशोधनाद्वारे सिद्ध केल्यानुसार मातृभाषेतून शिक्षण घेतले पाहिजे. जी भाषा घरात बोलली जाते त्या माध्यमातूनच शिक्षण घेतल्यामुळे मुलांना शिक्षण कंटाळवाणे न वाटता उलटपक्षी आनंददायी होऊ शकते. मुलांच्या भावविश्वाला योग्य असलेल्या वाङ्मयाच्या वाचनामुळे त्यांची बौद्धिक व मानसिक वाढ योग्य प्रकारे तर होतेच. शिवाय गणित, शास्त्र, परिसर अभ्यास, इतिहास यासारखे विषयही कळायला सोपे जातात.

**माध्यमिक स्तर**

आपल्या देशातील बहुभाषिकपणा, जगाच्या पाठीवर कामानिमित्त शहरे बदलणारे पालक, त्याचबरोबर विद्यार्थ्यांचीही भविष्यामध्ये रोजगारानिमित्त परगावी, परराज्यात अथवा परदेशी जाण्याची शक्यता, हे लक्षात घेऊन आपल्या मंडळाने भाषाविषयक उदार धोरण स्वीकारले आहे. मराठी बरोबर इंग्रजी, संस्कृत, हिंदी व जर्मन फ्रेंचसारख्या परकीय भाषा शिक्षणाची देखील सोय उपलब्ध करून दिली आहे. पण सर्वसाधारणपणे या स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भाषाविषयक जाणिवा अथवा ज्ञान बघता असे दिसते की त्यांच्या प्रथम भाषेचे मग ती मराठी असो वा इंग्रजी अतिशय तुटपुंजे आहे. त्यांची भाषेची वाचणे, ऐकणे, लिहिणे व बोलणे ही चारही अंगे विकसित झालेली नाहीत. माध्यमिक स्तरावर भाषा शिकविताना विद्यार्थ्यांना इंग्रजी तर सोडाच पण मराठीमध्येही नीट वाक्यरचना करता येत नाहीत. स्वत:चे विचार सुसूत्रपणे शब्दबद्ध करता येत नाहीत. वाचताना मुले अडखळत वाचतात. शब्दोच्चार नीट असत नाहीत. अर्थात यामध्ये विद्यार्थ्यांना दोष देऊन चालणार नाही. कारण एकंदरित भाषा शिक्षण कमी महत्त्वाचे मानले जाते. कुसुमाग्रजांसारखे दिग्गज साहित्यिक कितीही मराठी ही ज्ञानभाषा, व्यवहारभाषा झाली पाहिजे म्हणून आग्रही असले तरी प्रत्यक्षात मात्र ते उपयोगात आणलेले दिसत नाही.

आज इ. १०वी व १२ वी च्या परीक्षांना जवळपास ३० लाख विद्यार्थी राज्यातून प्रविष्ट होतात. म्हणजेच महाराष्ट्राच्या उन्नतीचा, प्रगतीचा सर्व स्रोत या विद्यार्थ्यांच्या रूपाने कच्च्या भांडवल्याच्या स्वरूपात प्रतिवर्षी कार्यरत आहे. देशाच्या विकासाचे गमक या विद्यार्थ्यांच्या हातात आहे. हे विद्यार्थी म्हणजेच एका अर्थाने महाराष्ट्राचे कच्चे भांडवल असून जे कोणत्याही उद्योगापेक्षा मोठे असून भविष्यात ते उन्नत भांडवली सत्तेत परिवर्तन होणार आहे. अशा या कच्च्या भांडवलास मूर्त स्वरूप देणे हे आपल्या सर्वांच्या, शासन व्यवस्थेच्या हातात असून ते समाजहिताचे आहे. इ. १०वी व १२ वी च्या परीक्षांचे मागील दोन ते तीन वर्षातील निकालांचे अवलोकन केले असता ते सरासरी ८०% असल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच २०% विद्यार्थी नापास होतात. नापास होणाऱ्या २०% मधील सरासरी पुन्हा ५% विद्यार्थी कसेतरी पुढील एक-दोन वर्षात पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात येतात. म्हणजेच प्रतिवर्षी इ. १० वी व १२ वी नंतर शाळा सोडण्याचे किंवा बंद करण्याचे प्रमाण हे सरासरी १५% इतके आहे. म्हणजेच महाराष्ट्र राज्यातील जवळ जवळ ४ ते ५ लाख विद्यार्थी इ. १०वी व १२ वी नंतर आपले शिक्षण बंद

करतात. हा शिक्षण क्षेत्रासमोर फार मोठा चिंतनाचा विषय होऊ शकतो. याद्दष्टीने शिक्षणक्षेत्रामध्ये या विषयावर विचारविनिमय झाला असल्याचे किंवा झालाच असेल तर त्याची गंभीरपणे नोंद झालेले निदर्शनास येत नाही. परीक्षा म्हटले की काही पास होणार काही नापास होणार हे जरी सत्य असले तरी नापास होणारे २०% विद्यार्थी का नापास होतात याचा शोध घेणे आता येथून पुढील काळात अत्यंत आवश्यक ठरेल. कारण इ. १० वी व १२वी पर्यंत शिकवून आपला मुलगा नापास झाला हे त्या पालकास सध्याच्या महागाईच्या काळात परवडणारे नाही. कारण बालवाडी ते मंडळाच्या परीक्षेस प्रविष्ट करणे या १० ते १२ वर्षाच्या काळात पालकांनी, सरकारी यंत्रणेमार्फत केलेल्या दरडोई खर्चाचा विचार करता त्या खर्चाची गणना, हिशेब लावणे कदाचित शक्य होणार नाही. विद्यार्थी पास झाला तर खर्चाचे सार्थक होते. अन्यथा गुंतवलेल्या भांडवलाचा ऱ्हास असेच म्हणावे लागणार आहे. सरकारही प्रत्येक विद्यार्थ्याच्या मागे इ. १ली पासूनच सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्रचंड प्रमाणावर खर्च करीत असते हे विचारात घेता नापासामुळे या खर्चाचे प्रगती मूल्य शून्य ठरते व सरकारच्या योजनेचा खर्चही वाया जातो ही बाबही सरकारी स्तरावर आगामी काळात विचारात घेण्यासारखी आहे.

सर्वसाधारणपणे प्रत्येक पालकास तो सुशिक्षित असो वा नसो, गरीब असो वा नसो आपला पाल्य इ. १० वी व १२ वी च्या परीक्षेत पास व्हावा अशीच इच्छा असते. परीक्षेस प्रविष्ट होणारी मुलेही त्यांच्या परीने परिस्थितीनुरूप अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत असतात हेही खरे असून ते सकारात्मक आहे. त्यांनाही पास होण्याची इच्छा असतेच. जाणीवपूर्वक नापास व्हावे असे मानसशास्त्रीयदृष्ट्या कोणासही वाटत नाही. कारण जाणीवपूर्वक नापास व्हावे असे वाटत असल्यास अशी मुले एकतर परीक्षेला बसलीच नसती किंवा त्यांनी उत्तरपत्रिका कशाही असेनात लिहिण्याची तसदी घेतली नसती. असे असूनही, पास होण्याची सुप्त इच्छा असूनही मुले नापास का होतात ? हे कोणतीही शास्त्रीय, तांत्रिक कसोटी न लावता, वस्तुस्थितीदर्शक, सर्वसाधारण परिस्थितीचे अवलोकन करून ढोबळमानाने त्यामधून काही वस्तुस्थितीदर्शक सत्य बाबी निदर्शनास आल्या. त्यांचा उहापोह प्रस्तुत लेखात करण्याचा प्रयत्न केला असून त्यावर काही उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची खालील गटामध्ये वर्गवारी करावी लागेल.**

**गट अ :**

सर्व सुखसोयी, सुशिक्षित पालक, चांगल्या शाळेत असूनसुद्‌धा प्राथमिक शिक्षणाचा पाया कच्चा राहिल्याने व नापास करावयाचे नाही या बाबीखाली पुढे सरकत १०वी च्या परीक्षेस प्रविष्ट होणारे असे साधारणपणे २०% पैकी ३% विद्यार्थी आढळले.

**गट ब :**

अशिक्षित पालक, मोल मजुरी करणारे पालक, मूल शाळेत पाठविले की जबाबदारी संपली व ते शिकतेच अशी भावना असणारे पालक, मजुरीसाठी हाताखाली येण्याचे वय अद्याप व्हावयाचे तोपर्यंत बसून काय करावयाचे आहे. म्हणून मुलास शाळेत बसावयास पाठविणारे पालक, ज्यांची नैसर्गिकरित्याच आकलनशक्ती कमी, शिकवलेले काहीही लक्षात येत नाही असे विद्यार्थी अशा प्रकारचे साधारणपणे २०% पैकी ५% विद्यार्थी आढळले.

**गट क :**

नापास होणाऱ्या २०% मुलांमध्ये काही विद्यार्थी खरोखरीच खूप हुशार असल्याचे निदर्शनास आले. त्यांचा बुद्‌ध्यांकही गतिमान असून आकलनशक्तीही असाधारण असल्याचे दिसले. ते एकतर गरीब कुटुंबातील असून त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असणे, वह्या-पुस्तके खरेदी करण्याची क्रयशक्ती नाही. विशेष म्हणजे अभ्यास करण्याची प्रचंड इच्छा असूनही त्यांना अभ्यास करण्यास जागा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. परिस्थितीमुळे झोपडपट्टीत राहणे, चार ते पाच माणसाचे कुटुंब एक ते दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरात राहणे, रात्रीच्या अभ्यासास वीज उपलब्ध नसणे, पण अशा



मुलांमध्ये शिकण्याची त्यांना पास होण्याची इच्छाशक्ती प्रचंड असल्याचे दिसले. काही काही मुले तर जागेअभावी शाळेमध्ये जेवढे शिकावयास मिळाले तेवढ्या भांडवलावरच परीक्षेला सामोरे जात असल्याचे दिसले. असे साधारणपणे २०% पैकी १०% विद्यार्थी आढळले.

उपरोक्त सर्व गटांमधील विद्यार्थ्यांचा विचार केला तर गट अ व गट ब मधील एकूण १०% विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती, उद्‌बोधन, प्रात्यक्षिकावर जोर दिल्यास त्यांच्या निकालात थोड्या प्रमाणात बदल घडवून आणता येईल. यापैकी तीन ते चार टक्के निकाल सुधारणे शक्य होईल. पण गट क मधील विद्यार्थ्यांसाठी अभ्यास करण्यास जागा उपलब्ध करून दिल्यास सर्वच निकालात वृद्धी घडवून आणता येईल. गट क मधील विद्यार्थ्यांसाठी विशेष असे काही करावे लागणार नाही. आहे त्याच मनुष्यबळात, उपलब्ध साधनसामग्रीत त्यांना अभ्यासिका उपलब्ध करून देता येईल. हे सहजच शक्य आहे. यासाठी शासनाकडून नवीन खर्चाची/अनुदानाची आवश्यकता भासणार नाही. फक्त शासन स्तरावरील शालेय शिक्षण विभाग, संचालक (माध्यमिक), संचालक (प्राथमिक), सर्व शिक्षण उपसंचालक, माध्यमिक, प्राथमिक शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र राज्य यापैकी कोणत्याही शासन यंत्रणेने या कामी पुढाकार घेऊन सर्व माध्यमिक, प्राथमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांना अभ्यासिका सुरू करणेबाबत आदेशित करणे आवश्यक आहे म्हणजे त्याची कार्यवाही १००% होईल.

## प्रत्येक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात अभ्यासिका सुरू करणेची सर्वसाधारण योजना :

### प्रास्ताविक :

आज भारत सरकारने सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत सर्वांसाठी समान शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. ही देशास अभिमानाची बाब आहे. परंतु ते खरोखरच सर्वांना मिळत आहे किंवा नाही ते मिळत नसल्यास का मिळत नाही याची पुन्हा पुन्हा पडताळणी करून ठोस उपाययोजना करण्याची यंत्रणा कार्यान्वित करण्याची वेळ आली आहे. आजही राज्यात कित्येक विद्यार्थी शाळाबाह्य असून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. शाळाबाह्य विद्यार्थ्यास सक्तीने पकडून आणून शाळेत बळजबरीने बसवून शिक्षण देणे म्हणजे शैक्षणिक विकास नव्हे तर त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडवणे व त्यातूनच त्यांचा सर्वांगीण विकास साधणे म्हणजे खऱ्या अर्थाने सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी होणे. फिरस्ती, वाड्या, वस्त्या, राहण्याची सोय नाही, झोपडपट्टीत राहणे, पालात राहणे यामधीलच विद्यार्थी प्रामुख्याने शाळाबाह्य आढळतात. त्यामधीलही काही विद्यार्थी शिकले किंवा शिकण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांना अभ्यासास जागाच उपलब्ध नाही हे सत्य आहे. शहरातील विद्यार्थ्यांची परिस्थितीसुद्‌धा याहून फारशी वेगळी नाही. वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या, वाढत्या झोपडपट्ट्या व त्यामूधन शिकणारी मुले, परिस्थितीमुळे शहरात १० बाय १० च्या खोलीत राहणारे चार-पाच माणसांचे कुटुंब, म्हाडा, घरकुल योजनाअंतर्गत तयार होणारी घरे, एक-दोन खोल्याच्या भाड्याच्या घरात राहणारी व त्यामधून शिकणारी मुले अशा अडचणीच्या परिस्थितीत मुले अभ्यास कसा करणार व त्यांना ते शक्यही नाही. विशेषत: मुलींचे अशा परिस्थितीत तर फारच हाल होतात. अपवादात्मक परिस्थितीवर मात करून शिकणारी मुलेही आहेत पण त्यांचे सरासरी प्रमाण अगदी अल्प आहे. तर अशा विद्यार्थ्यांसाठी जागा उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. प्राप्त परिस्थितीतही महाराष्ट्रातील काही माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये अभ्यासिका चालवतात त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. विशेष म्हणजे सन १९६५ ते १९७५ च्या दशकात अभ्यासिका चालवण्याचे प्रयोग काही शैक्षणिक संस्थांनी यशस्वीपणे केले आहेत. पण पुढे मात्र ते टिकले नाहीत असे निदर्शनास येते.

## अभ्यासास जागा उपलब्ध नसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या :



१. अभ्यास करण्यास, त्याची उजळणी करण्यास जागा उपलब्ध नसल्याने शाळेत किंवा कनिष्ठ महाविद्यालयात जेवढे शिकावयास मिळेल तेवढ्या भांडवलावरच परीक्षेस सामोरे जाणे. परिणामी एक-दोन विषयात नापास होणे.

२. गल्ली, मोहला अशा ठिकाणी राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सतत कोणत्या ना कोणत्या सार्वजनिक कार्यक्रमांना सामोरे जावे लागते. उदा. विविध जयंत्या, गणपती उत्सव, नवरात्र उत्सव अशा उत्सवात रात्रभर चालणारे डॉल्बी सिस्टिम, स्टिरियो, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होवू शकतो.

३. झोपडपट्टी, पालात, वाड्या-वस्त्या, फिरस्ती यामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेनंतर अभ्यास करण्यास उजेड म्हणजे विजेची सोय उपलब्ध नसणे.

४. घरातील पालकांच्या मधील व्यसनाधिनताही विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर प्रतिकूल परिणाम करते. समजा एखादा कुटुंबातील सदस्य दारू पिऊन दररोज दंगा करीत असेल तर विद्यार्थी कसा अभ्यास करू शकेल.

५. घरातील इतर सदस्यांकडून होणारा टी.व्ही. पाहण्याचा अतिरिक्त वापर, छोट्या घरामध्ये अभ्यासास स्वतंत्र खोलीचा अभावही अभ्यास न करण्यास कारणीभूत ठरतो.

६. आता सगळीकडे सर्वच विद्यार्थ्यांना अगदी लहान वयातच सहजासहजी उपलब्ध झालेले खेळणे म्हणजे मोबाईल व त्यावरील सुविधा. अभ्यास करण्यास जागाच नसल्याने उपलब्ध असणारा शाळाबाह्य सर्व वेळ मोबाईलमध्ये विनाकारण खर्ची करणे. कारण यास काही जागा लागत नाही. तो कुठेही हाताळू शकतो.

७. अभ्यासाची उजळणीच होत नसल्याने अभ्यास कच्चा राहणे.

८. अशा सर्व विद्याार्थ्यांचा आजूबाजूचा परिसर हा मागास असल्याने असे विद्यार्थी नाइलाजाने आजूबाजूच्या वाईट मुलांच्या संगतीत आपोआपच मिसळतात व लहान वयातच व्यसनात अडकतात.

९. अभ्यास न झाल्यामुळे परीक्षेत गैरमार्ग करून पास होण्याचे विचार येतात.

अशा अनेक समस्या अभ्यासास जागा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यास भेडसावत आहेत.

## यावर उपाययोजना :

१. आज राज्यातील प्रत्येक माध्यमिक शाळेकडे किंवा कनिष्ठ महाविद्यालयाकडे स्वत:ची किंवा भाडेपोटी घेतलेली इमारत आहेच. म्हणजेच अभ्यासिकेसाठी जागा उपलब्ध आहे. जागेचा प्रश्न मिटला तर अशा इमारतीचा उपयोग या कामी करता येईल. काही प्राथमिक शाळेच्या इमारतीही या कामी वापरात घेता येतील. शासन स्तरावरील शालेय शिक्षण विभाग, संचालक (माध्यमिक), संचालक (प्राथमिक), सर्व शिक्षण उपसंचालक, माध्यमिक, प्राथमिक शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र राज्य यापैकी कोणीही या कामी पुढाकार घेऊन त्यांचेमार्फत लेखी आदेश काढून सर्व माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालये यांना सक्तीने माहे डिसेंबर ते माहे एप्रिल या काळात इमारतीमधील एका वर्गात अभ्यासिका सुरू करण्यास सूचित करावे. या अभ्यासिकेची वेळ सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत राहील. ज्या शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांना नियमित वेळेत जादा विद्यार्थी संख्येमुळे वर्ग उपलब्ध होणार नाहीत अशा शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांनी निदान शाळा सुरू होणेपूर्वी किमान तीन तास व शाळा सुटल्यानंतर किमान तीन तास सहज विनासायास वर्ग उपलब्ध करून देऊ शकतात. विद्यार्थ्यास अभ्यास करण्यास जागेची सहा तासाची उपलब्धता ही फार मोठी संधी आहे. अशा शाळेतील, कनिष्ठ महाविद्यालयातील उपलब्ध शिक्षकांना अभ्यासिकेवर संनियंत्रणासाठी मुख्याध्यापक, प्राचार्य यांनी उपोक्त कालावधीत उपलब्ध शिक्षकांच्या सहमतीने त्यांच्या सोयीनुसार वेळापत्रक तयार करून नियुक्त करावे. विशेषत: महिला

शिक्षक कर्मचारी यांना सकाळच्या सत्रात नियुक्ती द्यावी. (म्हणजे वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत) शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियत वेळेत शिक्षकाच्या संनियंत्रणाची आवश्यकता नाही. कारण नियत वेळेत शाळेचे प्रशासन असतेच. मात्र सकाळच्या व रात्रीच्या वेळी संनियंत्रणासाठी शिक्षक ठेवणे आवश्यक राहील. अशा कर्तव्यातून आपणही विद्यार्थ्यांच्या विकासास हातभार लावत आहोत याचा आनंद आपणास आपोआपच मिळेल व याचे मोल फार मोठे असेल. म्हणजे गैरप्रकारांना आळा बसून अभ्यासिकेची संकल्पना परिपूर्णपणे साध्य होईल.

उपरोक्त प्रस्तुत लेखामध्ये केलेले विचार हे प्रत्यक्ष समाजामध्ये निदर्शनास येत असलेल्या सत्य सामाजिक परिस्थितीवर आधारित आहेत. सामाजिक परिस्थितीमध्ये सकारात्मक बदल केला तर एक आदर्श समान उन्नतीची आदर्श परिस्थिती निर्माण होऊ शकते. प्रस्तृत योजना ही एक मॉडेल स्वरूपात मांडली असून ती शालेय शिक्षण विभाग, शिक्षण संचालक, (माध्यमिक/प्राथमिक) यांना अंमलबजावणीसाठी कच्च्या स्वरूपात विशद केली आहे. या योजनेचा मतितार्थ लक्षात घेऊन महाराष्ट्रातील अनेक नामवंत शिक्षण तज्ज्ञ/शिक्षण विभागातील अधिकारीवर्ग यांचेकडून योजना सुधारणेच्यादृष्टीने मत जाणून घेता येईल. भविष्यात शाळा तपासणी, नवीन शाळा मान्यता यावेळी अभ्यासिका सक्तीने करता येईल. अभ्यासिका या परीक्षा काळातच सुरू न ठेवता त्या वर्षभर कार्यरत ठेवणे हे शैक्षणिक हिताचे दृष्टीने आवश्यक आहे. अभ्यासिका ही निव्वळ इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठीच कार्यरत न ठेवता ती प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनाही उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. अभ्यासा व्यतिरिक्त अभ्यासिकेत आपली ग्रंथसंपदा, ललित साहित्य, आत्मचरित्र, प्रवासवर्णने, व्यवसायभिमुख पुस्तकेही विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. म्हणजे आदर्श नागरिक घडवण्याचे कार्यही अभ्यासिका करतील. एकदा ही योजना सुरू झाली म्हणजे त्याचा विस्तार होण्यास वेळ लागणार नाही. अशा या नवीन उपक्रमास समाजातील अनेक नामवंत उद्योगपती, दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्तेही आर्थिक मदत (उदा. वीजेची सोय, ग्रंथालयासाठी पुस्तके, पंखे, टेबल, खुर्च्या इ.) करण्यास मागेपुढे पाहणार नसून देशामध्ये एकमेव महाराष्ट्र राज्यासाठी वेगळा उपक्रम राबविणारे शैक्षणिक धोरण तयार होईल असा विश्वास वाटतो.

❖❖❖

## अभ्यासिका सुरू केल्याने होणारे फायदे :

१. साधारणपणे २ कि.मी. च्या आतीलच विद्यार्थी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिकत असतात. त्यांना अभ्यासिकेची सोय उपलब्ध असल्याने अभ्यासिकेत येऊन बसण्यास कोणतीही अडचण राहणार नाही.

२. अभ्यासिकेची सोय असल्याने मुलांना अभ्यास करण्याची सवय आपोआपच लागेल.

३. वाचन संस्कृती आपोआपच वृद्धिंगत होईल.

४. शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील पुस्तकांचा लाभही विद्यार्थ्यांना घेता येऊन खऱ्या अर्थाने शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयाचा हेतू साध्य होईल.

५. पालकांनाही आपले मूल अभ्यासास जाणे हे अभिमानास्पद वाटू लागेल.

६. मुलांना अभ्यास कर असे सांगणे आपोआपच बंद होईल.

७. शाळा व्यतिरिक्तचा वेळ सत्कारणी लागून मुलांमध्ये बळावत चाललेली मोबाईल, टी.व्ही. संस्कृती ऱ्हासाकडे जाईल.

८. झोपडपट्टी, पालामध्ये राहणारी, वाड्या-वस्त्यामध्ये राहणारी मुले यांची अभ्यासाची सोय होणार असल्याने सकाळी व सायंकाळी समाजामध्ये एक वेगळी वातावरण निर्मिती होईल व ती समाजाच्या हिताची असेल.

९. कच्च्या मुलांना अभ्यासिकेचा विशेष उपयोग होईल.

१०. अभ्यासिकेची सोय उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांची गळती आपोआपच थांबण्यास मदत होईल.

११. विशेष करून मुलींसाठी अभ्यासिकेची उपयोगिता सर्वात बहुमोल असणार आहे.

१२. अभ्यासिकेमुळे सध्याची शैक्षणिक रचना बदलून तो एक शिक्षण प्रणालीमधील अविभाज्य घटक बनेल.

# उच्च शिक्षणापुढील आव्हाने

**डॉ. मोहन खेडकर**
कुलगुरू - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

शिक्षण म्हणजे भावी जीवनाची तयारी करून घेण्यासाठीचे साधन होय, अशी विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंतची सर्वसामान्य संकल्पना होती. त्यानंतर शिक्षण हे ज्ञान मिळविण्याचे साधन असून ज्ञान हे सर्वश्रेष्ठ असल्याने ज्ञानासाठी ज्ञान अशी धारणा रूढ झाली. परंतु उपयुक्ततेच्या सिद्धान्तानुसार (कुलकर्णी व भिंताडे : २००६) ज्ञान जर उपयोगी पडत नसेल तर ते कशासाठी संपादन करावयाचे असा प्रश्न विचारला जाऊ लागला. ज्या ज्ञानामुळे आपले दैनंदिन जीवन सुखद होत नसेल ते ज्ञान काय कामाचे अशी विचारसरणी पुढे रूढ होत गेली. त्यामुळे शिक्षण केवळ वर्गखोलीच्या चार भिंतीत शिक्षकांच्या माध्यमातून संपादन करावयाची बाब आहे, अशी शिक्षणविषयाची धारणा कालबाह्य होऊ लागली. आज शिक्षणक्षेत्रात इंटरनेटचा अधिक उपयोग होऊ लागला. संगणकाच्या प्रभावी प्रसारामुळे ज्ञान आता कोणा एकाची किंवा कोण्या एका समाजाची मालकी उरली नाही.

शिक्षणामुळेच व्यक्तीचा पर्यायाने देशाचा विकास होतो. आज मानवाला आपले भविष्य उज्वल करण्याचे सामर्थ्य केवळ शिक्षणामुळे प्राप्त होत आहे. या सामर्थ्याच्या जोरावरच तो जीवनातील विविध समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जात आहे. मानवाच्या विविध क्षमतांचा विकास शिक्षणामुळे साधला जात असून त्यातून त्याचे जीवन गतिमान होत आहे. तर्क, ज्ञानसंपादन व विचारक्षमता, व्यावहारिक कार्यक्षमता, सामाजिक गुणांचा विकास, नागरिकत्व व राष्ट्रीयत्व आणि चारित्र्यसंवर्धन या सर्व बाबींचा विकास व्यक्तींमध्ये केवळ शिक्षणाद्वारे होतो.

## उच्च शिक्षणाची वाटचाल :

स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वीचे उच्च शिक्षण हे समाज-जीवनापासून आणि राजकीय परिस्थितीपासून पूर्णपणे वेगळे होते. समाजाच्या गरजा ओळखून त्यानुसार शिक्षणात बदल करण्याची प्रक्रिया होत नव्हती. उच्च शिक्षण घेतलेले लोक समाजापासून दूर राहायचे. नालंदा विद्यापीठ सध्याच्या बिहार राज्यात होते. राजा शक्रादित्याने या विद्यापीठाची उभारणीचा पाया घातला. विद्यापीठाच्या परिसरात शिक्षक व विद्यार्थी राहत असत, शास्त्रे, कला, वेद, पुराण, शब्दविद्या, चिकित्साविद्या, वैद्यक, जादूविद्या, सांख्य, न्याय, अध्यात्म, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांचे इथे अध्यापन व्हायचे. देशातील विद्यार्थ्यांप्रमाणे परदेशातूनही विद्यार्थी इथे अध्ययनासाठी येत असल्याचा उल्लेख आहे.

> **सर्जनशीलता ही संशोधनाची जननी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधली सर्जनशीलता कशी शोधावी याचे ज्ञान शिक्षकाला माहीत असले पाहिजे.**

स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्राला सामर्थ्यशाली बनविणारे मनुष्यबळ निर्माण करणाऱ्या शिक्षणासाठी भारत सरकारने १९४८ ला विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी उच्च शिक्षणाची उद्दिष्टे निश्चित केली. ती पुढीलप्रमाणे १. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर, बदलत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक, व्यावसायिक, व्यापार इत्यादी क्षेत्रात नेतृत्व पुरवठा करणारे शिक्षण देणे, २. भारतीय संस्कृतीचे संवर्धन व संक्रमण करणे, ३. विद्यापीठ बौद्धिक साहसाची केंद्रे बनविणे, ४. जीवनाचा समग्र विचार दाखविणारे बौद्धिक सामर्थ्य देणे, व ५. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, चातुर्य निर्माण करून त्यांचा शारीरिक आणि सामाजिक विकास करणे. या प्रमुख उद्दिष्टांबरोबर इतरही अनुषंगिक उद्दिष्टे समोर ठेवली गेली. या आयोगाच्या शिफारशीनंतर उच्च



शिक्षण प्रक्रियेत खऱ्या अर्थाने वेगवान प्रगती सुरू झाली. भारतात १९५० मध्ये केवळ २७ विद्यापीठे होती. आज एकूण विद्यापीठांची संख्या ६११ पर्यंत पोहचली आहे.

### उच्च शिक्षणातील आव्हाने व उपाय :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण जागतील माणसे एकमेकांशी जोडली जात आहेत. ज्ञानाच्या प्रस्फोटांमुळे नव नवे विचार पुढे येत आहेत. त्यातूनच सर्जनशील अशा नव्या तंत्राचा उदय होत आहे. ही बाब विचारात घेता शिक्षण ही केवळ वर्षभरात आत्मसात करावयाची कृती नसून ती सतत चालणारी म्हणजे विद्यार्थ्याला त्याच्या जीवनभर करावी लागणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये उच्च शिक्षण संबंधित सर्व घटकांचा मोठा वाटा आहे. आज भारतामध्ये १८ ते २३ वयोगटातील युवकांचे उच्च शिक्षणातील प्रवेश प्रमाण GER (Gross Enrollment Ratio) हा २०१३-१४ च्या अधिकृत आकडेवारीनुसार १६-१९% आहे. म्हणजे आजही १८ ते २३ वयोगटातील ८१-८४% टक्के मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळत नाही. भारताने २०२० पर्यंत GER चे प्रमाण हे ३०% करायचे असे ठरविलेले आहे. हे ध्येय गाठण्यासाठी, उच्च शिक्षणातील आव्हाने यावर चिंतन करण्याची आवश्यकता आहे.

### शिक्षक एक सामाजिक अभियंता :

नवीन ज्ञानाची दालने ज्ञानाच्या प्रस्फोटातून निर्माण झालीत. या दालनाची चावी शिक्षकाला गवसली पाहिजे आणि त्यासाठी शिक्षकांनी नवनवे ज्ञान व अध्यापनकौशल्ये अवगत करून घेतलीच पाहिजे. एक काळ असा होता की, श्रेष्ठ गुणवंत धारकच शिक्षकी व्यवसायात येत असत. मात्र अलिकडच्या काळात अन्य नोकऱ्या मिळत नाहीत म्हणून शिक्षकी व्यवसाय स्वीकारणाऱ्यांची संख्या वाढू लागली. ही स्थिती बदलणे गरजेचे आहे. सर्वात अवघड व्यवसाय जर कोणता असेल तर तो शिक्षकांचा होय. कारण शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील माहितीच देत नसून तो विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देतो व मूल्यांची रुजवणूक करतो. शिक्षक शिक्षणरूवी इमारतीला आकार देतो म्हणून शिक्षक एक सामाजिक अभियंता आहे असे म्हटले जाते. आजच्या शिक्षण क्षेत्रात अत्यंत बुद्धिमान व निष्ठावान माणसांची आवश्यकता आहे. ज्ञानाच्या क्षेत्रातील नव्या वाटा शिक्षकांना अवगत झाल्या पाहिजेत. त्यासाठी नवनवीन विषयांवरील संशोधनांचा परिचय शिक्षकांना आवश्यक आहे. सर्जनशीलता ही संशोधनाची जननी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधली सर्जनशीलता कशी शोधावी याचे ज्ञान शिक्षकाला माहीत असले पाहिजे. शिक्षकांनी अध्यापन कार्यासोबत संस्कारांचे दृढीकरण करणे आज काळाची गरज आहे. उत्तम संस्कारांची आज नितांत गरज आहे. मूल्यांचे संस्कार कसे होतात, या संदर्भात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. विद्यार्थ्यांना 'शिकवण्यापेक्षा' 'शिकण्यास' शिकविणे ही शिक्षकांची महत्त्वाची भूमिका बनली पाहिजे. शिकण्याची उर्मी निर्माण करणे, कसे शिकावे हे शिकविणे, शिकणाऱ्यास मदत करणे व निरंतर संशोधन करणे ही आजच्या शिक्षकांची प्रमुख कर्तव्ये राहायला पाहिजेत.

कोणीही जन्मजात शिक्षक अथवा डॉक्टर म्हणून जन्माला येत नाही. प्रत्येक व्यवसायासाठी त्या व्यवसायाचे प्रशिक्षण प्राप्त करून घेणे आवश्यक असते. शिक्षकी व्यवसायालाही हेच तत्त्व लागू आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र, अध्यापन कौशल्य, संप्रेषण इत्यादी बाबींचे ज्ञान असणे आवश्यक असते. त्यासाठी दर्जेदार सेवान्तर्गत प्रशिक्षणाची नितांत गरज आहे. सोबत उत्कृष्ट शिक्षकांची वस्तुनिष्ठ निवड करणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

### उच्च शिक्षणाचा विस्तार व गुणवत्ता :

विद्यापीठ शिक्षण आयोगाने उच्च शिक्षणाची अतिशय उत्तम उद्‌दिष्टे ठेवली. त्यानुसार मागील ६५ वर्षात उच्च शिक्षणाचा विस्तार झाला. परंतु गुणवत्तेमध्ये अपेक्षेप्रमाणे वाढ झालेली दिसत नाही. काही शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षणविषयक पुरेशा सोई नाहीत, दर्जेदार ग्रंथालय व प्रयोगशाळा नाहीत, उत्तम शिक्षक वर्ग उपलब्ध नाही. प्राथमिक स्तरातून

महाविद्यालयात जो विद्यार्थीवर्ग येतो त्यातील बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जी बौद्धिक व वैचारिक क्षमता लागते इतक्या स्तराचा नसण्याचाही परिणाम गुणवत्ता ढासळण्यावर झालेला संशोधनांती दिसून आलेले आहे. नोकरीसाठी आवश्यक पात्रता म्हणजे पदवी. बहुतांश पदवीधरांजवळ ज्ञान आहे परंतु आवश्यक कौशल्य व क्षमता नसल्यामुळे त्यांना नोकरी मिळत नाही. आजही कुशल पदवीधरांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये गरज आहे.

*विद्यार्थ्यांना 'शिकवण्यापेक्षा' 'शिकण्यास' शिकविणे ही शिक्षकांची महत्त्वाची भूमिका बनली पाहिजे.*

सर्वप्रथम गरजेनुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची नितांत आवश्यकता आहे. कोणत्या बाबींची कंपनीला अथवा समाजाला आवश्यकता आहे. त्यानुसार जर लवचीक अभ्यासक्रम तयार केला तर त्याचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल. अभ्यासक्रमात आशययुक्त ज्ञानासोबत कौशल्ययुक्त ज्ञानाला महत्त्व देण्याची गरज आहे. तसेच विद्यार्थ्यांची आवड, क्षमता, बुद्धिमत्ता याद्दष्टीने त्यांनी उच्च शिक्षणाचा कोणता अभ्यासक्रम निवडावा याचे मार्गदर्शन व समुपदेशन करणाऱ्या संस्था कार्यान्वित कराव्यात. अध्ययन अध्यापनात संगणकाचा नियमित उपयोग करणे, इतर देशातील शिक्षकांसोबत वैचारिक आदान प्रदान करणे व विद्यापीठाला पूर्णत: स्वायत्तता देणे ही काळाची गरज आहे.

## सदोष परीक्षापद्धती :

शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलाचा प्रभाव परीक्षा पद्धतीवर झालेला दिसतो. आजच्या शिक्षणप्रणालीत परीक्षेला जास्त महत्त्व दिले जात आहे. मुलांपेक्षा त्यांचे पालक परीक्षेतील टक्केवारीला अधिक महत्त्व देताना दिसतात. एखाद्या विद्यार्थ्याला तीन तासाच्या कालावधीत जेवढे आठवेल, त्यावरून विद्यार्थ्यांची गुणवत्ता निश्चित केली जात आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या स्मृतीच्या स्तराला अधिक महत्त्व दिले जाते असे दिसते. ३९.४९ गुण मिळविणारा अनुत्तीर्ण व ३९.५० = ४० गुण मिळविणारा उत्तीर्ण म्हणजे एका गुणाच्या शंभराव्या भागापैकी एक भाग ठरविणार की विद्यार्थी पास का नापास! तसेच परीक्षा पद्धतीत संधी, नशीब, योगायोग याला अधिक महत्त्व व व्यक्तिगत गुणांना कमी महत्त्व दिले जात आहे. असे चित्र पाहायला मिळते. काही विद्यार्थी प्रचंड मानसिक व बौद्धिक ताणात परीक्षा देतात.

वरील दोष कमी करण्यासाठी सतत अंतर्गत मूल्यमापन, सत्र पद्धती, श्रेणी - क्रेडीट पद्धती, वस्तुनिष्ठ प्रश्नपत्रिका, प्रश्नपत्रिकेची यथार्थता, विश्वसनीयता व उपयुक्तता, ऑनलाईन परीक्षा पद्धती व पुस्तकांसह परीक्षा (Open Book Test) सुरू कराव्यात. तसेच परीक्षा अत्यंत निर्दोष पद्धतीने व अधिक चांगल्या वातावरणात घ्याव्यात.

वरील उच्च शिक्षणापुढील आव्हानांसोबत पुढील बाबींवर चिंतन करणे गरजेचे आहे :

समाजात मूल्यांचा ऱ्हास होताना दिसत आहे, त्यामुळे मूल्याधिष्ठीत अभ्यासक्रमाचा समावेश करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना शिकविण्यासोबत स्वयंअध्ययनाची प्रेरणा देण्याची गरज आहे. ज्ञान, समज, कौशल्य आणि प्रत्यक्ष उपयोग या शिक्षणाच्या तत्त्वांचा वापर शिक्षकांनी दैनंदिन अध्यापनात करण्याची नितांत गरज आहे.

शिक्षकांनी स्वत:ला स्वयंभू न समजता सतत अध्ययन करीत राहणे ही काळाची गरज आहे. कारण आ आयटीसीच्या युगामध्ये ज्ञान मिळविणे सहज शक्य झाले आहे.

आपली भारताची अर्थव्यवस्था आजही कृषी केंद्रित आहे. या क्षेत्राच्या शिक्षणाकडे जास्त गांभीर्याने पाहिले पाहिजे. सध्याचा ट्रेंड फक्त अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन याभोवती घुटमळणारा आहे. कृषी क्षेत्रातही आयटीसीचा अधिक प्रमाणात वापर करून उच्च शिक्षणात त्याला प्राधान्य देण्याची गरज आहे.

उच्च शिक्षणाचा दर्जा उंचवण्यासाठी भौतिक सुविधा, अभ्यासक्रमात बदल, शिक्षकांची गुणवत्ता कशी सुधारता येईल याचा विचार व्हावयास हवाच. त्याचप्रमाणे कृतियुक्त आणि भावी व्यवसायाचा विचार करून अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळावे म्हणून तशी तरतूद करणारे नवनवे अभ्यासक्रम तयार झाले पाहिजेत. केवळ नोकरवर्ग तयार करणारे शिक्षण निरर्थक आहे, इतकंच !

❖❖❖

# शैक्षणिक अंधश्रद्धा निर्मूलन

**श्री. महेंद्र बैसाणे**
(भारू काका)
संपर्क : ९३२१५५०२८६

काळ सतत बदलत असतो आणि त्यासोबत जाण्यासाठी व्यक्तीला तसेच कोणत्याही व्यवस्थेला कालानुरूप बदलायची गरज असते. मात्र बदलाची ही प्रक्रियाच मुळात सर्वात मोठी समस्या व आव्हानसुद्धा ठरते. कारण बदल हा निसर्गाचा स्थायीभाव असला तरी तो सहजासहजी घडून येत नाही हेही वास्तव आहे. त्यासाठी प्रयत्नपूर्वक कृती करणे आवश्यक असते. तसे केल्यास अपेक्षित सकारात्मक बदल तर घडून येतोच परंतु त्यासोबत विकासाची पुढची पातळीही साध्य केली जाऊ शकते. आजच्या काळातील विविध शैक्षणिक आव्हानांना सामोरे जाताना हाच दृष्टिकोन बाळगला तर या आव्हानांवर यशस्वीपणे मात करता येईल. किंबहुना असे करीत असताना नव-नवीन संधीसुद्धा दृष्टीस पडतील.

नेमकं कोणतं शिक्षण घ्यावं ? आजच्या जागतिक स्पर्धेला परंपरागत शिक्षणाच्या आधारे तोंड कसं देणार ? शिक्षण घेतलं तरी नोकरीचा प्रश्न सुटतोच असं नाही. इथपासून तर शिक्षणाने नैतिक, सामाजिक भान येतंच असं नाही. ही आणि अशीच अनेक शिक्षणविषयक आव्हाने आज आपल्यासमोर आहेत. यातील निदान काहींवर चर्चा केली तर त्या आव्हानांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी किमान आपली मानसिकता तरी तयार होईल. शिक्षणाविषयी सगळीकडून एक सूर ऐकायला मिळतो तो म्हणजे आजचं शिक्षण कुठेतरी तोकडं पडतंय. कारण शिक्षण भरपूर आहे. अगदी आर्टस्, सायन्स किंवा कॉमर्सची पदवी असेल, पदव्युत्तर पदवी असेल किंवा इंजिनियरिंगचीही पदवी असेल पण नोकरी नाही. अशी स्थिती आजकाल सर्रासपणे बघायला मिळते. याही पुढे जाऊन एम.बी.ए. केलं तरी त्यामानाने चांगली नोकरी नाही अशी पण उदाहरणे आहेत. म्हणूनच निम्न स्तरावरील नोकऱ्यांसाठी सुद्धा अक्षरशः १०-१०, १५-१५ लाख रुपये मोजावे लागतात अशी भयानक अवस्था आपल्याच आजूबाजूला बघायला मिळते. मग शेवटी मनात प्रश्न येतो की शिकून नेमका काय फायदा झाला ? एवढ्या शिक्षणाचा उपयोग काय ? आणि हे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेपुढील सर्वात मोठं आव्हान आहे.

> **एखादी नोकरी आपल्याला मिळेल की नाही हे आपला दृष्टिकोन कसा आहे यावर, आपल्यात कोणती कौशल्ये आहेत व आपल्यात कोणत्या चांगल्या सवयी आहेत यावर ठरतं.**

परंतु याकडे डोळसपणे बघितलं तर या प्रश्नाचं उत्तरही दिसेल. एकीकडे ज्याला आपण कमी दर्जाचं समजतो ते आर्टस्चं शिक्षण घेतलेले आणि त्याहूनही ज्या पदवीला काही किंमत नाही असं आपण म्हणतो त्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी आय.ए.एस., एम.पी.एस.सी. च्या परीक्षा पास होताहेत. याला कारण अगदी स्पष्ट सांगायचं तर आपण मुळात नाही शैक्षणिक अंधश्रद्धांमध्ये नकळतपणे का होईना पण गुंतलो आहोत. काय आहेत या अंधश्रद्धा तर वाट्टेल ते करून सायन्सला प्रवेश घ्यावा व पुढे डॉक्टर-इंजिनियर व्हायचं आणि मस्तपैकी ऐशो आरामाचं आयुष्य जगायचं. खरं तर यात काहीच वावगं नाही. ही एक

बाजू झाली. परंतु इतर शिक्षण व पर्याय म्हणजे कुचकामी ठरवून आपला कल कुठे आहे ? आपली आवड काय ? क्षमता काय ? याचा कोणताही सारासार विचार न करता एक अंगठेछाप नियम लावून शिक्षण घेतल्याने खरं तर हे प्रश्न निर्माण झाले आहेत. काय आहे हा अंगठेछाप नियम - थंब रुल तर ५०-६० वाल्यांनी आर्टस्‌ला जायचे ७०-८० वाल्यांनी कॉमर्सला जायचे व ८०-९० वाल्यांनी सायन्सला जायचे. या उपरही कडी म्हणजे ५०-६० वाल्यांनी व ७०-८० वाल्यांनीही जीवाचं रान करून ८०-९० साठीच आटापिटा करायचा. विचार करा आज जी जीवघेणी स्पर्धा आपण जिकडे तिकडे ॲडमिशन घेताना, नोकऱ्या मिळवताना बघतो तिचा जन्मच मुळी या कारणाने होतो की सगळे जण एकाच प्रकारचे शिक्षण घेण्यासाठी धडपडतात. त्या ऐवजी काही कला शाखेत गेले, काही वाणिज्य शाखेकडे वळले, काहींनी शिक्षकी पेक्षा स्वीकारला, काहींनी संशोधनात स्वतःला गुंतवून घेतलं. काहींनी समाजकार्यासाठी स्वतःला वाहून घेतलं तर कोणाचीच कोणाशी स्पर्धा राहणार नाही. कारण प्रत्येक क्षेत्रात माणसं लागतात. त्यातही मग उत्तमोत्तम मनुष्यबळाची निवड केली जाते आणि हे उत्तमोत्तम मनुष्य बळ कसं तयार होईल तर जेव्हा आपण आपल्या आवडीनुसार, कलानुसार व क्षमतेनुसार शिक्षण घेऊन. त्याने काय होईल तर त्याचा दर्जा चांगला असेल. कारण ते जबरदस्तीचं, कंटाळवाणं शिक्षण नसणार ! आणि दर्जा उत्तम असेल तर त्याला मागणी व स्कोपही राहणार. हल्ली कशात जास्त 'स्कोप' आहे ? हा खूप फसवा प्रश्न आहे. त्याने अनेकांची फसगत होते. सध्या आय.टी.ची. चलती आहे म्हणजे आय.टी.ला खूप 'स्कोप' आहे असं म्हटलं जातं. पण मला त्यात इंटरेस्ट असेल तर मी मन लावून अभ्यास करीन व ते ज्ञान-कौशल्य चांगल्या प्रकारे आत्मसात करीन अन मगच त्याचा फायदा मला होईल. अन्यथा डिग्री आहे पण त्या तोडीची नोकरी नाही हीच गत होईल. मग आपण शिक्षणाला व शिक्षणव्यवस्थेला दोष देत बसणार. मूळ प्रश्न आपल्या समजुतीचा आहे आणि म्हणून मी याला शैक्षणिक अंधश्रद्‌धा म्हणतो. शिक्षण कोणतंही चांगलं किंवा वाईट नाही, तर त्याचा वापर कुठे आणि कसा करावा हे जमायला हवं म्हणजे शिक्षण घेतल्याचा आपल्याला हवा तसा फायदा होतो ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे.

आता अजून या प्रश्नाच्या खोलात जाऊन बघूया. लहान मुलाला शाळेत घालताना प्रत्येक आई-वडील विचार करतात की इंग्रजी माध्यम म्हणजे उत्तम. आहे त्याचेही काही फायदे आहेत नाही असं नाही. पण जे आई-वडील आपल्या लहानग्यांच्या मनातील शंकांचं निरसन गरजेप्रमाणे इंग्रजी भाषेतून करू शकत नाहीत त्यांनीही इंग्रजी माध्यमाचाच अट्टाहास केल्याने होतं काय की घरात मराठी बोललं जातं. बाहेर मराठी बोललं जातं आणि शिकायची वेळ येते तेव्हा मात्र इंग्रजी. हे म्हणजे ज्याला सायकल चालवता येत नाही त्याला सायकलच्या रेसमध्ये उभं केल्यासारखं होतं. तरी मानवी मेंदू या अडचणींवरही मात करून त्यातून मार्ग काढतो. पण हे सगळ्यांना जमतंच असं नाही. कारण जिथे भाषाच समजायला, लिहायला, बोलायला कठीण जातेय त्या भाषेतून ज्ञान ग्रहण करणे हे एक दिव्यच म्हणावं लागेल. या संदर्भातील पालकांची भावना-द्‌विधा-अडचण मी समजू शकतो. परंतु दुर्धर समस्यांवर विचार करणं व त्यातून योग्य मार्ग काढणं भविष्याच्या दृष्टीने तितकंच आवश्यक असतं. अन्यथा हे सर्व बिचाऱ्या मुलांच्या भल्यासाठीच आपण करतोय या भ्रमात पालक असतात. पालकांनी गंभीरतेने अशा बाबीत लक्ष घालून मग निर्णय घेणं हीच खरी पालकत्वाची जबाबदारी म्हणता येईल.

याउलट मातृभाषेतून शिक्षण दिलं-घेतलं तर मुलं ते शंभर टक्के आत्मसात करतात आणि म्हणून उत्तमोत्तम प्रगती करतात. मातृभाषा की इंग्रजी भाषा हा प्रश्न तसा जटील आहे परंतु त्याला भिडायचं धाडस केलं तर त्यातून चांगलंच निष्पन्न होईल. सरळ-सरळ सांगायचं म्हणजे एक तर मुलांना त्यांच्या हक्काचं मातृभाषेतलं शिक्षण तरी द्या नाही तर मग त्यांना संपूर्ण इंग्रजी वातावरण तरी उपलब्ध करून द्या. आता जे आपण करतोय तो यातला 'शॉर्ट कट' आहे. भविष्याचा विचार करता यातून मार्ग काढण्याचं आव्हान स्वीकारण्याची जबाबदारी अर्थातच पालकांची आहे.




आता थोडंसं फास्ट फॉरवर्ड जाऊ या, म्हणजे शिक्षण घेतल्यानंतरचा नोकरीचा प्रश्न हे आव्हान पेलण्याची जबाबदारी जास्त करून व्यवस्थेची असली तरी वैयक्तिकरीत्या मार्ग काढावयाचा झाल्यास आपणही तितकंच दक्ष व कृतीशील राहणं आपल्या फायद्याचं आहे. लोकसंख्या आणि रोजगार निर्मिती यांची सांगड घालणं कोणत्याही सरकारसाठी मोठं आव्हान असतं आणि ते पेलण्यासाठी अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असावा लागतो. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक असला आणि चीनचा पहिला क्रमांक असलं तरी चीनने अर्थव्यवस्था आणि पर्यायाने रोजगार निर्मिती या दोन्ही बाजू चांगल्या प्रकारे सांभाळल्या आहेत. आपण मात्र ठोस नेतृत्वाअभावी मागे पडत आहोत. पण व्यक्तिगत पातळीवर एका व्यक्तीच्या नोकरीचा प्रश्न सोडवायचा झाल्यास रोजगारक्षमता आपल्यात विकसित करून सोडवता येईल. आता रोजगारक्षमता म्हणजे काय ? हा प्रश्न साहजिकच आपल्या मनात येईल. कारण नोकरी मिळवण्यासाठी रोजगारक्षमता अर्जित करावी लागते. याविषयी आपल्याला आजवर कोणी काही सांगितलेलं नाही. किंबहुना रोजगार क्षमता हा शब्दही आपल्या ऐकण्यात कधी येत नाही. मग ती क्षमता आपल्यात यावी म्हणून प्रयत्न करणे ही लांबची गोष्ट ठरते आणि इथे पुन्हा शिक्षणव्यवस्थेचा संबंध येतो. नोकरी किंवा रोजगार मिळवण्यासाठी जी क्षमता असावी लागते ती रोजगार क्षमता विकसित व्हावी यासाठी शिक्षण व्यवस्थेत कोणतीही थेट तरतूद नाही.

साधारणपणे कोणतीही नोकरी मिळवण्यासाठी विशिष्ट शिक्षण, काही ठरावीक कौशल्ये, निकोप-सकारात्मक दृष्टिकोन आणि त्यासोबत तुमची वागणूक म्हणजे प्रवृत्ती व सवयी या बाबी बघितल्या जातात. थोडक्यात सांगायचे तर कोणतीही नोकरी मिळविण्यासाठी काश म्हणजे K-A-S-H असणे आवश्यक ठरते. यात के फॉर नॉलेज म्हणजे शिक्षण, ए फॉर ॲटीट्यूड म्हणजे स्वत:कडे, इतरांकडे, परिस्थितीकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन, एस् फॉर स्किल्स म्हणजे विविध कौशल्ये आणि एच फॉर हॅबीटस् म्हणजे आपल्या सवयी. नोकरी मिळवण्याच्या प्रक्रियेत शिक्षण आपल्याला इंटरव्ह्यूच्या टप्प्यापर्यंत नेण्याचं काम करतं. परंतु एखादी नोकरी आपल्याला मिळेल की नाही हे आपला दृष्टिकोन कसा आहे यावर, आपल्यात कोणती कौशल्ये आहेत व आपल्यात कोणत्या चांगल्या सवयी आहेत यावर ठरतं. यातही घेतलेल्या शिक्षणाचा व्यवहारात उपयोग करण्याची आपली क्षमता आहे की नाही हे बघितलं जातं. नुसते मार्क घेऊन मिळवलेली डिग्री कामाची ठरत नाही. याचा शिक्षण घेतानाच विचार व्हायला हवा. म्हणजे शिक्षणाचा खरा हेतू साध्य होईल. शिक्षण घेताना त्या विषयाचं ज्ञान मिळवणं, त्यात प्राविण्य मिळवणं याकडे कल असण्याऐवजी केवळ नोकरी मिळवण्याचं साधन म्हणूनच शिक्षणाकडे बघितलं जातं. इथेच आपली फसगत होते. नोकरी-पैसा यावर डोळा ठेवून मिळवलेल्या पदव्या कागदावरच राहतात. कारण डी.एड.-बी.एड. वाल्यांना शिकवता येत नसेल, सॉफ्टवेअर इंजिनियरला सॉफ्टवेअर डेव्हलप करता आलं नाही तर, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोलच्या पदवीधर व्यक्तीला अर्थव्यवस्था, अर्थसंकल्प, ऐतिहासिक संदर्भ, भौगोलिक रचना यावर विश्लेषण करता येणार नसेल तर आणि इंग्रजी विषय घेऊन बी.ए., एम.ए. होणाऱ्याला इंग्रजी बोलता येणार नसेल तर नोकऱ्या मिळणार कशा ? म्हणून आपण घेत असलेल्या शिक्षणाचा व्यवहारात व प्रत्यक्ष जीवनात उपयोग करता येणं ही नोकरी मिळवण्यासाठीची पहिली अट व क्षमता आहे हा विचार सतत डोक्यात असायला हवा.

आता आपला दृष्टिकोन किती महत्त्वाचा असतो ते एका उदाहरणातून बघूया. एक कंपनी दोन प्रतिनिधींना आपल्या उत्पादनाची विक्री करण्याच्या उद्देशाने सर्व्हे करण्यासाठी एका गावात पाठवते. खरं तर त्या गावात कोणाला त्या उत्पादनाची फारशी माहितीच नव्हती. म्हणून एक प्रतिनिधी लगेच परत आला आणि म्हणाला तिकडे आपल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी खूप चांगली स्थिती नाही. तर दुसरा प्रतिनिधी आपला सर्व्हे करून अतिशय उत्साहाने म्हणाला तिकडे अजून या प्रकारच्या उत्पादनाची माहिती नसल्याने कोणी ते वापरत नाही आणि म्हणून अजून आपला कोणी प्रतिस्पर्धीही तिकडे पोहोचलेला नाही. आपण जर त्या उत्पादनाचं महत्त्व पटवून दिलं तर खूप मोठी बाजारपेठ आपल्याला मिळू शकेल. म्हणजे बघा परिस्थिती एकच परंतु दृष्टिकोन वेगळा असेल तर येणाऱ्या परिणामातही किती फरक पडतो. मला सांगा कंपनी कोणाला कामाला ठेवेल ? जो वाट्टेल त्या परिस्थितीत सकारात्मक राहून कंपनीचा फायदा कसा होईल याचा विचार करतो त्याला की जो नेहमी नकारात्मकच विचार करतो त्याला ? असं म्हणतात ज्याला काम करायचं असतं तो मार्ग शोधतो, काढतो. त्याला मार्ग दिसतात आणि ज्याला कामंच करायचं नसतं त्याला सबबी-कारणं दिसतात. आता गंमत अशी आहे की हा दृष्टिकोन घडवण्याची काही सोय आहे का आपल्या या व्यवस्थेत ? एखादा सर्टिफिकेट कोर्स आहे का आपल्याकडे ? पुढचा मुद्दा कौशल्याचा-संभाषण कौशल्य, भाषा कौशल्य, नेतृत्व गुण, नियोजन कौशल्य, अध्ययन-लेखन कौशल्य, सादरीकरण कौशल्य, व्यवहार कौशल्य. अशा कितीतरी कौशल्यगुणांची गरज प्रत्येक व्यक्तीला आपापल्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी लागते. आजकाल तर ही कौशल्येच कळीचा मुद्दा बनली आहेत. सरकारी असो की खासगी क्षेत्र प्रत्येक ठिकाणी हे गुण तुमच्यात आहेत की नाही हे बघितलं जातं मग याचं विधिवत शिक्षण का दिले जाऊ नये ? आजच्या घडीला अशा प्रकारच्या शिक्षण-प्रशिक्षणाची कोणतीही सोय शिक्षणव्यवस्थेत नाही. ते प्रत्येकाच्या इच्छेवर सोडून देण्यात आलंय. संभाषण कौशल्य प्रत्येकासाठी आवश्यक आहे. आता भाषण करा म्हणून सांगितलं - कितीतरी जण अगदी ठासून सांगतील की आम्ही नाही बोलू शकत. मुलाखतीत एक प्रश्न विचारला - हमखास विचारला जातो - स्वत:बद्दल सांगा. बरेच या प्रश्नाने गोंधळतात. कारण आपण जगाचा अभ्यास केलेला असतो पण स्वत: आपण काय आहोत, आपली बलस्थाने काय, आपल्या सुधारणेच्या जागा कोणत्या, आयुष्यात आपल्यासाठी काय संधी आहेत याचा कधी आपण विचारच केलेला नसतो. खरं तर कौशल्यविकास हा अभ्यासक्रमाचाच भाग असायला हवा. नसला तर आपण वैयक्तिरीत्या त्याकडे लक्ष्य देणं आवश्यक आहे.

पूर्वीच्या काळी शिक्षण घेतलं, नोकरी मिळाली की आयुष्यभराची तजवीज होत असे. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. तुम्हाला निरंतर शिकत रहावं लागतं. त्याची आपण तयारी ठेवली तर काळासोबत आपण पुढे जाऊ अन्यथा मागे पडू. कम्प्युटर अगदी आवश्यक बाब झाली आहे. जीवनातील विविध क्षेत्रात आय.टी. चा वापर होत असल्याने आपणही त्यात सहभागी व्हायला हवं. शिक्षणाचे मार्गही बदलत चाललेत. मुक्त शिक्षण, ऑनलाईन शिक्षण ही माध्यमं खरं तर वरदान आहेत. त्याचा योग्य तो वापर केल्याने आपण आपल्यातील क्षमतांचा जास्तीत जास्त वापर करून स्वत:साठी, कुटुंबासाठी, समाजासाठी व देशासाठी यश मिळवून परिपूर्ण व कल्याणकारी आयुष्य व्यतीत करू शकतो.

एकूणच काय तर शिक्षणाकडे बघण्याचा संपूर्ण दृष्टिकोन बदलून त्यानुरूप शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणणे ही काळाचीच गरज आहे. त्यासाठी नवनवीन विचारप्रणालींचा अभ्यास व समावेश करणे संयुक्त ठरेल. याशिवाय जागतिक पातळीवरील या संदर्भातील बदल-सुधारणांचा अभ्यास करून त्यातील आपल्याला अनुरूप असे मुद्दे अंगिकारणे हे सुद्धा प्रगतीच्या दिशेने नेणारे पुढचे पाऊल ठरू शकेल.

❖❖❖

# माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपक्रमाचे महत्त्व

प्रा. सौ. कदम नीला वि.
श्री. शि. म. जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, पुणे
संपर्क : ८०८७०९७०४०

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उत्तम अध्ययन-अध्यापन प्रक्रिया त्यातून उत्तम निकाल म्हणजे उत्तम शाळा असा सर्वसामान्य संकेत आहे. पण उत्तम गुण मिळाले म्हणजे विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास झाला. सुसंस्कारित आणि सक्षम विद्यार्थ्याची घडण झाली असा अर्थ काढता येत नाही.**

माध्यमिक शाळेतील विद्यार्थी म्हणजे सर्वसामान्यपणे अकरा ते पंधरा वयोगटातील विद्यार्थी ! या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट जेव्हा आपण डोळ्यांसमोर ठेवतो तेव्हा त्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक विकासाची अवस्था लक्षात घेणे आवश्यक ठरते.

**माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये होणारे शारीरिक व मानसिक बदल:**

पाचवी-सहावीचे विद्यार्थी हे किशोरावस्थेकडून कुमारावस्थेच्या दिशेने वाटचाल करीत असतात. हा जणू त्यांच्या जीवनातील संक्रमणावस्थेचा काळ असतो. या काळात मुला-मुलींच्या शारीरिक आकारमानात, बांध्यात लक्षणीय फरक होतो. हा फरक मुलांच्या मानाने मुलींमध्ये लवकर दृग्गोचर होतो. किशोरावस्थेमध्ये मुलांमध्ये संघप्रियता निर्माण होते. '१०-११ वर्षांचे मूल म्हणजे घराबाहेरील समाजातील परिस्थितीशी समायोजन साधून नि:शंक मनाने वावरणारा प्राणी होय.' (शैक्षणिक मानसशास्त्र - प्रा. के. वि. कुलकर्णी)

विद्यार्थ्यांमध्ये मुलामुलींचे गट निर्माण व्हायला लागतात. सुरुवातीला ते समलिंगी असतात. नंतर विषमलिंगी गटही तयार होऊ लागतात. अवतीभवतीच्या वस्तू, घटना याकडे लक्ष जाऊ लागले. आपण काही करावे, त्याचे कौतुक व्हावे ही वृत्ती निर्माण होऊ लागते.

संघप्रवृत्ती, संग्रहप्रवृत्ती, रचनाप्रवृत्ती या शालेय विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्याचा उपयोग करून त्यांच्या या वैशिष्ट्यांचा विधायक मार्गाने विकास करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करणे आवश्यक ठरते. हे उपक्रम त्यांच्या शिक्षणासाठी, अभ्यासक्रमासाठी पूरक ठरायला हवेत. यादृष्टीने माध्यमिक शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे लक्षात घ्यावी लागतात ती पुढीलप्रमाणे :

- भाषिक कौशल्ये, गणिती कौशल्ये संपादन करणे व त्यांचा विकास करणे.
- वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास व्हावा यादृष्टीने निरीक्षण, तुलना, प्रयोग, वर्गीकरण, निष्कर्ष ही कौशल्ये आत्मसात करणे.
- पर्यावरण संरक्षण, निसर्ग प्रेमविषयक जाणिवा निर्माण करणे.
- राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रनिष्ठा, सर्वधमसमभाव, स्त्री-पुरुष समानता, श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता, संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा यांसारख्या नैतिक मूल्यांची जोपासना करणे.
- विद्यार्थ्यांना स्वप्रयत्नातून ज्ञान प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- विविध कलागुणांची जोपासना करणे.

- विद्यार्थ्यांच्या शरीरसंपदेचा विकास करणे.
- सामाजिक समस्या जाणून घेण्यास मदत करणे.

सर्वसामान्यपणे ही उद्दिष्टे व अन्य ध्येयधोरणे नजरेसमोर ठेवून शालेय अभ्यासक्रमांची रचना केली जाते. विविध विषयांची पाठ्यपुस्तके तयार होताना त्यातील पाठ्यघटकांच्या अनुषंगाने उपक्रमही पाठ्यपुस्तकात दिलेले असतात. याचबरोबर शासकीय धोरणानुसार तसेच संस्थेच्या धोरणानुसार वर्षभरात कोणकोणते उपक्रम राबवायचे याबाबत प्रत्येक शाळेकडे उपक्रमांची सूची असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उत्तम अध्ययन-अध्यापन प्रक्रिया त्यातून उत्तम निकाल म्हणजे उत्तम शाळा असा सर्वसामान्य संकेत आहे. पण उत्तम गुण मिळाले म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला. सुसंस्कारित आणि सक्षम विद्यार्थ्यांची घडण झाली असा अर्थ काढता येत नाही. तसेच शिक्षणाची उपरोक्त उद्दिष्टे साध्य झाली असेही म्हणता येत नाही. ती साध्य होण्यासाठी माध्यमिक शाळेत अभ्यासक्रमाला डोळसपणे व नियोजनपूर्वक उपक्रमांची जोड देणे हे आवश्यक नव्हे तर अनिवार्य ठरते.

### मुख्याध्यापकांची भूमिका :

प्रशालेच्या मुख्याध्यापकांची भूमिका ही फार महत्त्वाची असते. मुख्याध्यापक हे संघनायक - कप्तान असतात. विद्यार्थ्यांच्या विकासाची दिशा ते ठरवितात, विकासाचे सुकाणू त्यांच्या हाती असते. वर्षारंभी अभ्यासक्रमाचे नियोजन तसे उपक्रमाबाबत नियोजन सर्व शिक्षक वर्गाच्या बैठकीत होणे गरजेचे असते. प्रचलित उपक्रमांबरोबरच नवीन कोणते उपक्रम राबविता येतील, त्याचे फलित काय ? याबाबत शिक्षकांना प्रोत्साहित करण्याचे काम मुख्याध्यापकांना करावे लागते. गुणग्राहकतेने शिक्षकांच्या क्षमता ओळखून उपक्रमाची जबाबदारी टाकावी, केलेल्या कामाबद्दल शाबासकीची थाप द्यावी यातून उपक्रमशील शिक्षक तयार होतात.

### उपक्रम कसा असावा ?

- विद्यार्थ्यांना कृतिप्रवण करणारा
- सर्जनशीलतेला वाव देणारा
- चिकित्सक विचार करायला लावणारा
- आनंददायी अनुभव देणारा
- विचारांना चालना देऊन, रंजन करणारा
- व्यवहारज्ञान वाढविणारा
- विज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रवृत्त करणारा
- आत्मविकाराची संधी देणारा
- स्व-सामर्थ्याची जाणीव होऊन आत्मविश्वास वाढविणारा
- उर्जेला रचनात्मक व विधायक मार्ग प्राप्त करून देणारा
- सांघिक भाव बळकट करणारा
- जिज्ञासा, कुतूहल वाढीस लावणारा
- नैतिक मूल्यांची, कलागुणांची जोपासना करणारा
- व्यावहारिक जगाशी सांगड घालणारा

### उपक्रमाचे फायदे :

विद्यार्थ्यांची क्रयशक्ती विधायक दिशेने वळविणे, सुप्त गुणांचा विकास, छंदांची जोपासना, व्यवसाय शिक्षणाचा पाया, सांघिक भावनेचे पोषण, सुजाण नागरिकत्वाची घडण, नैतिक मूल्यांची व सुसंस्कारांची रुजवण, उज्ज्वल भविष्यकाळासाठी उपयुक्त अशा अनेक बाबी उपक्रमांमुळे साध्य होऊ शकतात. शालेय विद्यार्थ्यांची मानसिकता

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सुवर्णमहोत्सवास शुभेच्छा !



*महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या इतिहासात सोनेरी पान लिहायची वेळ येणे ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अभिमानास्पद घटना आहे, असे मला वाटते. अभ्यासक्रमाची रचना करणे, पाठ्यपुस्तके निर्माण करणे आणि परीक्षांचे आयोजन करणे या तिन्हीही पातळ्यांवर मंडळाला बऱ्याच वेळा युद्धपातळीवर काम करावे लागले आहे, याची जाणीव सर्वांनीच ठेवली पाहिजे. विशेष म्हणजे हे काम समाजाला बरोबर घेऊन करण्यात मंडळ यशस्वी झाले आहे. केवळ परीक्षा घेणारी यंत्रणा असे तिचे स्वरूप नसून शिक्षणप्रक्रियेच्या सर्व क्षेत्रांमध्ये गरजेप्रमाणे हस्तक्षेप करून योग्य ती कृती करणारी संस्था बनली आहे. एवढा अवाढव्य पसारा सांभाळताना वेळेचा हिशेब जमवण्याचे कसबही मंडळाकडे आहे.*

*एकविसाव्या शतकातील शैक्षणिक आव्हाने पेलण्यासाठी मंडळाने सज्ज व्हायला हवे, एवढेच मला सांगायचे आहे. त्यासाठी मंडळाला सर्व शुभेच्छा !*

**- डॉ. सदानंद मोरे**
*ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत (पुणे)*
*अध्यक्ष-अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (२०१५)*

लक्षात घेता 'अभ्यास एके अभ्यास' त्याला कंटाळवाणा वाटू शकतो.

''अभ्यासक्रम + उपक्रम = आनंददायी शिक्षण'' हे सूत्र शालेय विद्यार्थ्यांबाबत लक्षात घेऊन नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे. शिक्षकांनी एखादा उपक्रम राबविताना आपण काय काय करू शकतो. याबाबत विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करावे. त्यांच्या कल्पनांचा आदर करावा. सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.

### शासन धोरणानुसार उपक्रमांचे महत्त्व :

महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० तील शिफारशींमध्ये उल्लेखिलेल्या काही बाबी पुढीलप्रमाणे :

'अध्ययन प्रक्रिया ही विद्यार्थ्यांना विचारप्रवण व कृतिप्रवण बनवणारी व ज्ञानरचनावादी असली पाहिजे. अध्ययन प्रक्रियेत सामूहिक प्रकल्प, सामूहिक सादरीकरणे, नाट्यीकरण, गटचर्चा, प्रदर्शन इ. तंत्रांचा वापर अनिवार्य करावा. शाळेच्या वेळापत्रकाचे नियोजन करताना निव्वळ बौद्धिक अंगाचा विचार करण्यापेक्षा भावनिक, कलात्मक, सामाजिक इत्यादी अंगांचा विचार करून नावीन्यपूर्ण नियोजन करता यावे यासाठी शाळा व शिक्षकांना विशेष प्रोत्साहन द्यावे' या शिफारशींचा विचार करता माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपक्रम नि:संशय महत्त्वाचे आहेत.

❖❖❖

# शिक्षकांनी स्वत:ला समृद्ध कसे करावे?




**श्री. शहाजी ह. ढेकणे**
सचिव (निवृत्त)
राज्य शिक्षण मंडळ, पुणे
संपर्क : ९८६०३८४३३०


**शिक्षकाने स्वत:हून समृद्ध होण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात त्याविषयीचा परामर्श**

बदलत्या परिस्थितीत शिक्षकांनी अद्ययावत राहून स्वत:ला समृद्ध करण्याची गरज वाढलेली आहे. पूर्वीच्याच साच्यात राहणारे शिक्षक विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान करण्यास कारणीभूत होत आहेत. शिक्षकांनी स्वत: समृद्ध होण्याच्या विविध मार्गांचा तपशील या लेखात पाहणार आहोत.

१) प्रत्येकाने घरी स्वत:चे ग्रंथालय करावे. दरवर्षी किमान रु. १,०००/- चे संदर्भग्रंथ विकत घ्यावेत व त्यांचा वापर करावा.

२) शिक्षण संक्रमण, जीवन शिक्षण तसेच अध्ययन-अध्यापनविषयक नियतकालिकांचे वैयक्तिक वर्गणीदार व्हावे. त्यांचे नित्य वाचन ठेवावे. शक्यतर एखादा लेखही त्यात लिहावा.

३) आपल्या अध्यापन विषयांचा इ. १ली पासूनचा अभ्यासक्रम बारकाईने अभ्यासावा. सर्व इयत्तांची पाठ्यपुस्तके आपले संग्रही असावीत. त्यांचे बारकाईने वाचन करावे.

४) शिकवावयाच्या सर्व विषयांचे संदर्भ, शिक्षकहस्तपुस्तिका आवश्यक तेथे शब्दकोश, इ. काळजीपूर्वक अभ्यासावेत.

५) सर्व घटकांच्या घटकनिहाय प्रश्नपेढ्या करून घ्याव्यात. त्यासाठी बाजारातील संदर्भ/प्रश्नपत्रिका संच/ स्वाध्यायमाला/व्यवसायमाला इत्यादींचा वापर करावा.

६) विद्यार्थ्यांना सराव देण्यासाठी घटकनिहाय सराव कार्डे, स्वयंअध्ययन साहित्य, स्वाध्याय कार्डे व चाचणी कार्डे तयार करून ठेवावीत. पुरेशा प्रमाणात केलेल्या या साधनांचा कल्पकतेने वापर करावा.

७) स्वत: शालेय ग्रंथालयाचा नियमित वापर करावा. आपल्या विद्यार्थ्यांना वापर करण्याबाबत प्रेरित करावे. त्याच्या नोंदी ठेवाव्यात.

८) गावातील सार्वजनिक ग्रंथालयाचेही सभासद व्हावे. वरचेवर ग्रंथालयात जाऊन पुस्तकांची देव-घेव करावी. विद्यार्थ्यांनाही सभासद होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

९) परिसरात/जवळच्या शहरात भरणारी पुस्तक प्रदर्शन, साहित्यप्रदर्शने, साहित्य संमेलन, व्याख्यानमाला यांना आवर्जून भेट द्यावी. त्यानुसार शाळेतही उपलब्ध पुस्तकांचे प्रदर्शन भरवावे व मुलांना / पालकांना पुस्तक विकत घेण्यास प्रवृत्त करावे.

## शिक्षक बदलला तर विद्यार्थी बदलेल

१०) मुलांसाठी प्रकाशित होणारी विविध नियतकालिके आवर्जून स्वत: वाचावीत. मुलांना वाचण्यास सांगावीत व पालकांना सभासद (वर्गणीदार) करण्यासाठी मार्गदर्शन करावे.

११) आपली स्वत:ची शैक्षणिक पात्रता वाढविण्याचा प्रयत्न करावा. बी.ए./एम.ए./ एम.फिल./बी.एड./एम.एड./पी.एचडी इ. यामुळे शिक्षकांमध्ये अधिक विचारप्रगल्भता येते.

१२) अन्य शिक्षकांच्या पाठांचे त्यांच्या परवानगीने निरीक्षण करावे व त्यांच्यामध्ये असलेल्या चांगल्या बाबी आपल्यात आणण्याचा प्रयत्न करावा.

१३) आपल्या पाठाचे निरीक्षण अन्य शिक्षकांना करायला लावून आपल्यातील दोषावर चर्चा करावी व ते कमी करण्याचा प्रयत्न करावा व चांगल्या बाबींची वाढ करीत रहावे.

१४) शाळा सोडून जाणाऱ्या (इ. १०वी / इ. १२वी) मुलांना प्रश्नावली देऊन आपल्या अध्यापनाबाबत त्यांची मते अजमावावीत. (त्यावर नाव न लिहिण्यास सांगावे) त्यानुसार स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून आणावा.

१५) शाळेतील / परिसरातील समान विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनी ठरावीक कालावधीनंतर एकत्र यावे व अध्ययन / अध्यापन / पाठ्यपुस्तके / मूल्यमापन इत्यादींवर सखोल चर्चा घडवून आणावी.

१६) दर्जेदार शाळेला भेट देऊन दिवसभराच्या कामकाजाचे निरीक्षण, त्यांचे अध्यापन, मुलांचे प्रतिसाद, विविध उपक्रम, मूल्यमापन, प्रगती इत्यादींचे काटेकोरपणे निरीक्षण करावे.

१७) वर्षभरात किमान ५० पालकांच्या भेटी घेऊन मुलांच्या प्रगतीबाबत चर्चा करावी. वर्षाअखेरी त्यांना प्रश्नावली देऊन आपल्या प्रतिसादाबाबतचे अभिप्राय घ्यावेत.

१८) संगणकाचे पुरेसे ज्ञान आत्मसात करावे. (किमान एमएससीआयटी) आपल्या विषयांशी संबंधित वेबसाईट्स कोणकोणत्या आहेत त्यांची यादी करावी व त्यांचे नियमित अवलोकन करावे. अध्यापनात त्यांचा वापर करावा.

१९) वर्षभरात किमान १० पाठ संगणकाचे मदतीने शिकवावेत. Power Point Presentation चा वापर करावा.

२०) शिक्षण विषयक दर्जेदार चित्रपटांची निर्मिती होत असते. असे चित्रपट आवर्जून पाहावेत. (उदा. तारे जमिंपर)

२१) परिसरातील / आपल्या कार्यकक्षेतील (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) शी संपर्कात राहून विविध ग्रंथ / सीडीज् / वेबसाईट्स / प्रशिक्षण इत्यादींची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा.

२२) देश पातळीवरील / राज्यपातळीवरील विविध शैक्षणिक संस्थांची माहिती त्यांच्या वेबसाईट्स माहिती करून घ्याव्यात व त्यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिरास गरजेनुरूप हजर रहावे.

२३) शिक्षकांसाठी असलेल्या विविध निबंध स्पर्धा नवोपक्रम स्पर्धा, शैक्षणिक खेळणी / साहित्य स्पर्धा / प्रकल्प स्पर्धा इत्यादींमध्ये सक्रीय सहभाग घ्यावा.

२४) दैनंदिन अध्यापनामध्ये येणाऱ्या समस्येवर आधारित कृतिसंशोधन हाती घ्यावे व त्यातील निष्कर्षानुसार सकारात्मक बदल घडवून आणावा.




२५) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ / इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ इ. संस्थांशी व शिक्षणाशी संबंधित पत्रद्वारा प्रशिक्षणात सहभाग घ्यावा.

२६) दरवर्षी शैक्षणिक सहल काढून वस्तुसंग्रहालये/जंगले/पर्यावरणपूरक प्रभाग/ऐतिहासिक स्थळे/विविध शिक्षण संस्था यांना भेटी देऊन आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदवाव्यात.

२७) दरमहा शिक्षकांची संयुक्त सभा घेऊन त्यामध्ये प्रत्येकाने आपापले मुलांच्या व शिक्षकांच्या विकासाबाबतचे विचार मांडावेत. परस्पर विचारांची देवाण-घेवाण व्हावी.

२८) स्वत:चं व्यक्तिमत्त्व आकर्षक व शिक्षकाला साजेसं राहील याचा आटोकाट प्रयत्न करावा. त्यानुसार आपली वेशभूषा, केशभूषा व राहणीमान आकर्षक व प्रसन्न ठेवावे. चेहरा सतत हसतमुख व प्रसन्न असावा. (घरच्या काळज्या घेऊन शाळेत जाऊ नये)

२९) स्वत:ला चांगल्या सवयी लावाव्यात. व्यायाम, योगासने, प्राणायाम, विपश्यना इत्यादींचे ज्ञान आत्मसात करून नियमित वर्तन ठेवावे.

३०) कोणत्याही अनिष्ट सवयींचा शरीराला/मनाला स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी. सर्व व्यसनापासून दूर राहायचे व आपले वर्तन नैतिकदृष्ट्या शुद्ध ठेवावे. शिक्षकाच्या - वृत्तीला डाग लागेल असे कोणतेही कृत्य आपल्याकडून होणार नाही याची काळजी घ्यावी.

३१) अध्यापनाच्या विविध पद्धतींचा अध्यापनात जाणीवपूर्वक वापर करावा. अध्यापनात नावीन्य आणावे. त्यामुळे त्याची परिणामकता वाढते व मुलांनाही आकर्षण वाटते.

३२) आपल्या विषयांचे अध्यापन करताना कल्पक उपक्रमांची यादी तयार करावी व त्यांचा वापर नियमितपणे करावा. विद्यार्थ्यांना शैक्षणिक अनुभव देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. त्यामुळे विद्यार्थी अधिक चांगले शिकू शकतात.

३३) शाळेच्या दैनंदिन कार्यक्रमात आवर्जून सहभाग घ्यावा. सर्व शिक्षकांनी एकत्रित केलेले कार्य अधिक उठावदार होते व टीमवर्क झाल्यावर यश सहज मिळते.

३४) व्यवसायावर निष्ठा असावी. मुलांबद्दल अफाट प्रेम असावे. शाळा भरण्यापूर्वी काही वेळ शाळेत हजर राहून अध्यापनाची पूर्वतयारी, पालकभेटी, मुलांशी संवाद, अप्रगतांसाठी विशेष प्रयत्न केल्याने मुलांची प्रगती अधिक गतीने होऊ शकते.

३५) यथावकाश सामाजिक व राष्ट्रीय कार्यात जरूर सहभाग घ्यावा. जबाबदार नागरिक म्हणून ते आपले कर्तव्य आहे. अशा कार्यात शिक्षक पुढे झाल्यास अन्य समाज सहज त्यांचे मागे येतो.

३६) आपल्या स्वत:च्या कार्याचे वार्षिक मूल्यमापन दरवर्षी अखेरीस करावे. त्यासाठी वर्षभर केलेल्या कामाच्या नोंदी घेण्यास ''वार्षिक शिक्षक कार्यदर्शिका'' ठेवावी. त्यामध्ये नियमित नोंदी घ्याव्यात व वर्षअखेरीस पडताळाव्यात. पुढील वर्षी त्यात सुधारणा घडवून आणावी.

उपरोक्त सूचनांनुसार शिक्षकांनी कार्यवाही केल्यास त्यांची गुणवत्ता स्वत:ची स्वत: ते सुधारू शकतात व समाजातील आपली पत वाढवतील. मुलांच्या यशात स्वत: स्थान मोलाचे ठरवतील व स्वत:ला समाधान मिळवून आनंदाचे धनी होतील. त्यानुसार शिक्षकांनी प्रयत्न करून स्वत:ला नियमित समृद्ध करीत रहावे.

❖❖❖

# यशवंत व्हा !
# जयवंत व्हा !!!

**डॉ. हेमंत म.पेडणेकर**
प्राचार्य - प्रा. चिंतामणराव व्यापार महाविद्यालय,
सांगली

**'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' आपल्याला आपले जीवन घडवायचे असेल तर डोळे उघडे ठेवून योग्य वेळी योग्य निर्णय घेऊनच पुढे जायला हवे.**

गेल्या वर्षीची गोष्ट ! मुंबईतली १९ वर्षांची मुलगी मोबाईलच्या दुकानात सेल्स गर्ल म्हणून काम करत होती. पगार रु. १७,०००/-, शिक्षण इ. १२वी, दिसायला साधारण पण इंग्रजीतील बोलणे उत्तम. हीच मुलगी मुंबईतील मोठ्या जवाहिऱ्याच्या दुकानात मुलाखतीसाठी आत्मविश्वासाने गेली. तिची निवडही झाली. पगार रु. १८,०००/- त्याशिवाय ती ज्या प्रमाणात सोन्याची विक्री करेल त्याच प्रमाणात तिला बोनस. त्या मुलीचा आजचा पगार बोनस धरून आहे. रु. ४०,०००/- याच मुलीचा दूरचा भाऊ वय वर्षे ३५. नोकरीसाठी भटकतोय. रु. ५-६ हजारावर मिळेल ती तात्पुरती नोकरी करतोय. कारण इंग्रजी येत नाही.

आजच्या विद्यार्थ्यांचा 'साधन' व 'साध्य' यात गोंधळ उडालेला दिसतो. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण हे चांगली नोकरी मिळविण्याचे साधन होते व त्या काळातील बऱ्याच विद्यार्थ्यांचे साध्यही तेच होते. 'फायनल' ची इ. ७वी ची परीक्षा पास झाल्यावर नोकऱ्या मिळत होत्या. त्यानंतरच्या काळात 'मॅट्रिक' च्या परीक्षेला महत्त्व आले. मग १२वी, पदवी परीक्षा व त्यानंतर पदव्युत्तर शिक्षण याप्रमाणे समाजाच्या अपेक्षा वाढतच गेल्या. आज पदव्युत्तर शिक्षण घेतलेले पदवीधर हजारोंनी आहेत. लाचारीने २-४ हजार रुपयांवरही झाडूवाल्याची नोकरी करण्याची त्यांची तयारी आहे. ही परिस्थिती का येते ? याला जबाबदार कोण ? दोष समाजाचा की स्वत:चा ? नक्कीच स्वत:चा.

सद्‌गुरु श्री. वामनराव पै म्हणतात, 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' आपल्याला आपले जीवन घडवायचे असेल तर डोळे उघडे ठेवून योग्य वेळी योग्य निर्णय घेऊनच पुढे जायला हवे.

टांग्याच्या घोड्यांच्या डोळ्यांच्या दोन्ही बाजूंना ढापणे असतात. हा घोडा फक्त समोरच पाहतो. आजूबाजूला नाही. आजचा विद्यार्थीही सरळ रेषेत शिकत जातो. दहावी-बारावी-पदवी, पदव्युत्तर शिक्षण, शेवट शिक्षणाचा द एण्ड आणि आयुष्याच्या स्वप्नांचाही.

पूर्वी लोकसंख्या कमी होती, नोकऱ्या त्या मानाने जास्त होत्या. कालांतराने तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबरच संगणक आले. अनेक माणसांची कामे संगणक बिनचूक करू लागला. माणसांची गरज कमी होऊ लागली. लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली. नोकऱ्या झपाट्याने कमी झाल्या.

'शिक्षण' हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन उरले आहे. बरेच विद्यार्थी त्यालाच 'साध्य' समजतात. मी चांगला अभ्यास केला. परीक्षेत उत्तम गुण मिळविले की माझे कर्तव्य मी पार पाडले. आपल्या आजूबाजूला आपण पाहणार कधी? ज्यावेळी या सर्वांची जाणीव होते त्यावेळी खूप उशीर झालेला असतो. यासाठी शिक्षण घेतानाच

प्रादेशिक व जागतिक बदलाकडे लक्ष ठेवून आपल्या आवडीचे क्षेत्र निवडणे फायदेशीर ठरते.

काही मूलभूत गोष्टी सर्वच क्षेत्रांत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात. त्यांपैकी दोन प्रमुख गोष्टींचा विचार या लेखात केला आहे.

सर्वांत प्राधान्य द्यायला हवे व्यायामाला. व्यायाम म्हणजे आपल्या शरीररूपी यंत्राचीच दैनंदिन देखभाल. काही लाख रुपयांची नवीन गाडी घेतल्यावर आपण ती जिवापाड जपतो. तिला नियमित तेलपाणी देतो. पण आपल्या अमूल्य अशा शरीराची मात्र हेळसांड करतो. लहानपणी, वयात येण्याच्या काळात शरीराची जोमाने वाढ होते, नेमक्या याच काळात विद्यार्थी अभ्यासात किंवा इतरत्र वेळ घालवतात. व्यायामासाठी 'फुकट घालवायला' त्यांच्याकडे वेळ नसतो. वयात आलेल्या मुली नटण्यात व बाजारी उत्पादने चेहऱ्यावर चोपडण्यात वेळ घालवतात. सुंदर दिसण्याची त्यांची धडपड समजण्यासारखी आहे. मात्र त्यांना जे हवे आहे ते कमी खर्चात व्यायामाच्या माध्यमातून साध्य करणे सहजशक्य आहे. हे त्यांच्या लक्षात येत नाही किंवा कळते पण वळत नाही अशी स्थिती होते.

वयात येण्याच्या काळात शरीराची जोमाने वाढ होते व त्यात शरीरातील अंतर्गत ग्रंथींचे कार्य महत्त्वाचे असते. योगासनांमुळे किंवा सूर्यनमस्कारामुळे शरीराला सर्वांगीण व्यायाम होतो. अंतर्गत ग्रंथींचे कार्यही सुधारते. शरीराचा तसेच मनाचाही चांगला विकास होतो. योगासने शिकणे शक्य झाले नाही तरी किमान १०-१२ सूर्यनमस्कार रोज घातले तरीही आयुष्यभरासाठी आपण निरोगी, उत्साही, जीवनाची देणगी सहज मिळवू शकतो व तीही फुकटात.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीला पर्याय नाही. विद्यार्थी परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी जिवापाड मेहनत करतात. पण इंग्रजीकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे परीक्षेतले उत्तम गुणही कवडीमोलाचे होतात. यासाठी इंग्रजी बोलता येणे महत्त्वाचे आहे. इंग्रजी बोलण्यातील सर्वांत महत्त्वाची अडचण म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव. आत्मविश्वासाचा अभाव असेल तर कोणतीही गोष्ट नीटपणे करता येत नाही.

या संबंधातील एक छान गोष्ट आठवली. सर्कशीत हत्ती असतात. मोठा हत्ती पकडणे अवघड असते म्हणून हत्तीचे पिलू पकडतात. त्याला साखळदंडाने बांधतात. पिल्लू सुटण्याची खूप धडपड करते पण त्याला ते जमत नाही. मग ते निराश होते. मनाने खचून जाते. आत्मविश्वास गमावते. नंतरच्या काळात पिल्लू मोठे होते. त्याची ताकद वाढते पण मन खचलेले असते. आत्मविश्वासाचा अभाव असतो. त्यामुळे साधा दोरखंड बांधला तरी हत्तीला तोडता येत नाही.

लहानपणी आपली क्षमता कमी असते. त्यावेळी इंग्रजीची सुरुवात होते. मनातील भीतीमुळे शिकण्याची प्रक्रिया अवघड होते. मोठे झाल्यावर आपली क्षमता वाढलेली आहे. थोडा प्रयत्न केला तर इंग्रजी बोलणे आपल्याला सहज जमेल हे लक्षातच येत नाही. निष्कारण इंग्रजीची भीती आपण आयुष्यभर बाळगतो आणि अपयशी होतो.

तुम्हांला सायकल चालवता येते ना ? जरा ते सुरुवातीचे दिवस आठवा. तुम्हाला सायकला चालवता येत नव्हती. खूप भीती वाटायची. आत्मविश्वासाचा अभाव होता. सायकलवर बसल्यावर आपण नक्की पडणारच याची तुम्हाला खात्री होती. आणि तुम्ही पडत होता. पायाला खरचटत होते. पण तुमची शिकण्याची इच्छा जबरदस्त होती. त्यामुळे मनातल्या भीतीवर तुम्ही मात केलीत आणि तो क्षण आला. त्या क्षणाला तुम्हाला जाणवलं की तुम्ही न पडता सायकला चालवू शकता. जग जिंकल्याचा आनंद झाला. त्यानंतर मनात भीती कधी आलीच नाही. सायकल चालविण्याचा आनंद तुम्ही मिळवतात. अगदी तसाच किंबहुना त्यापेक्षा अनेक पटींनी जास्त आनंद तुम्ही इंग्रजीची भीती घालवून मिळवून शकाल. त्यासाठी काही सोप्या युक्त्या.

कोणतीही भाषा शिकताना पुढील चार घटक महत्त्वाचे असतात. १. शब्द २. व्याकरण ३. संभाषण व ४.

लिखाण. या चार घटकांवर तुम्ही नियंत्रण मिळवले तर अल्लदीनच्या जादूच्या राक्षसासारखे तुम्हाला आयुष्यभर मदत करतील. तुमची कामे चुटकीसरशी होतील. यांच्याकडे दुर्लक्ष केलेत तर ही चार भुते तुमच्या मानगुटीवर बसलीच म्हणून समजा. तुम्ही जिवंत असेपर्यंत प्रत्येक क्षणी तुमचा अपमान झाल्यावर खदाखदा हसतील. जिवंतपणीच मरणप्राय वेदना देतील. चला तर मग त्यांना जिंकू या. जग जिंकू या.

## १. शब्द

एखादा पदार्थ शिजवून तयार करण्यापूर्वी त्यासाठी लागणारे सर्व घटक जमा करावे लागतात. तसेच वाक्य तयार करण्यासाठी शब्द लागतात. इंग्रजी शब्द कठीण वाटतात. कारण त्याने स्पेलिंग लक्षात राहत नाही. पण सुरुवातीच्या काळात नुसते उच्चार लक्षात ठेवूनही इंग्रजी बोलता येईल. नंतर हळूहळू जमेल तशी स्पेलिंग लक्षात ठेवता येतील. रोज किमान १० ते २० शब्दांचे उच्चार लक्षात ठेवण्याचा सराव केला तर कालांतराने आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.

शब्दसंपत्ती वाढविण्याचा दुसरा मार्ग म्हणजे इंग्रजी वर्तमानपत्रे. एखादे इंग्रजी वर्तमानपत्र घ्या. त्यातील १० ते २० ओळींचा परिच्छेद कापून वहीवर चिकटवा. परिच्छेद नीट वाचा. कठीण शब्दांखाली लाल रेष ओढा. ते शब्द लिहून काढा. डिक्शनरीत त्यांचा अर्थ शोधा. वहीत लिहून ठेवा. पाठ करा. असा सराव महिना दोन महिने केल्यास इंग्रजी वर्तमानपत्र वाचताना अडचण येणार नाही.

## २. व्याकरण

'व्याकरण' म्हणताच भीती वाढते. ते नियम कसे लक्षात ठेवणार याची काळजी वाटते. खरे तर व्याकरण म्हणजे शब्दांची जोडणी करून योग्य वाक्य तयार करण्याचे शास्त्र. व्याकरणाचे नियम लक्षात ठेवल्यास कमी वेळात, कमी त्रासात अचूक वाक्ये तयार करता येतील. पण तरीही व्याकरणाची भीती वाटते. व्याकरण समजत नाही म्हणून आपण इंग्रजीला घाबरतो. ही भीती अनाठायी आहे. उदा. आपण मराठीत किंवा आपल्या मातृभाषेत न घाबरता बोलतो. त्यावेळी आपण 'कर्ता', 'कर्म', 'क्रियापद' इत्यादी व्याकरणाच्या अंगांचा विचार करतो का ? नाही ना ! मग इंग्रजीच्याच व्याकरणाचा बाऊ का करायचा ?

हजारो रिक्षा, टॅक्सी, ड्रायव्हर असे आहेत त्यांना रिक्षा, टॅक्सीच्या इंजिनाबद्दल काहीही माहिती नाही. तरीही ते चांगली रिक्षा, टॅक्सी चालवतात. तेव्हा व्याकरणाबद्दलची भीती मनातून काढून टाका. फक्त इंग्रजी लिहिण्याचा सराव कराव. इयत्ता ४थीच्या मराठी माध्यमाच्या इंग्रजी विषयाच्या पुस्तकात संभाषणात्मक सोपी वाक्ये आहेत. हे पुस्तक फक्त २० रुपयांना मिळते. या पुस्तकातील वाक्ये तपासून घेतलेली आहेत. म्हणजेच व्याकरणाच्या दृष्टीने अचूक आहेत. याच वाक्यांचा रोज सराव केल्यास ती लक्षात राहतील व संभाषणात वापरता येतील. सराव करण्यासाठी वाचनापेक्षा लिखाण चांगले. वाचताना आपले मन भरकटू शकते. मनात दुसरे विचार येतात व काय वाचत आहोत ते लक्षात येत नाही. त्यासाठी पुस्तकातील वाक्ये रोज लिहून काढा. दर दिवशी किमान २ ते ५ फुलस्केप भरतील इतके लिखाण करा. सुरुवातीला कंटाळा येईल पण जिद्दीने हा कंटाळा दूर करून रोजचा सराव चालू ठेवला तर काही दिवसांनी लिखाणाचे काम सहज होत राहील. इंग्रजीत एक छान म्हण आहे, 'प्रॅक्टीस मेक्स मॅन परफेक्ट' सरावामुळे माणसाला नैपुण्य होते.

## ३. संभाषण

पोहायला शिकायचे असेल तर पाण्यात पडावेच लागते. तसेच इंग्रजीतून बोलल्याशिवाय संभाषणाचा सराव होणार नाही. मात्र इंग्रजी बोलताना आपण चुकीचे बोलत नाही ना याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

इंग्रजीच्या अनेक पुस्तकांमध्ये संभाषणाची वाक्ये दिलेली असतात. त्या दोन व्यक्तींमधील संवाद दिलेला असतो. ही वाक्ये लिहून काढा म्हणजे ती लक्षात रहायला मदत होईल.

त्या संवादाच्या दोन झेरॉक्स प्रती काढा. एक तुमच्याकडे राहील व दुसरी तुमच्या मित्र-मैत्रिणींकडे, तुम्ही समोरासमोर उभे राहून कागदावरील वाक्यांचा सराव करा. तुम्ही पहिल्या व्यक्तीचे वाक्य वाचले तर तुमचा साथीदार दुसऱ्या व्यक्तीचे वाक्य वाचेल व अशाप्रकारे तुम्ही आपापसात संभाषणाचा सराव करू शकाल.

ज्या व्यकतींना इंग्रजी चांगले येते त्यांच्याशी बोलण्याचा सराव ठेवा. आपल्या आजूबाजूला शेकडो दुकाने असतात. मॉल असतात. तेथे जाऊन दुकानदारांशी, विक्रेत्यांशी इंग्रजीतून संभाषण केल्यास तुमच्या मनातील भीतीवर मात करता येईल वा चांगले इंग्रजी बोलता येईल.

### ४. लिखाण

इंग्रजी शब्द कॅपिटलमध्ये किंवा नेहमीसारखे दुसऱ्या लिपीत लिहिताना अक्षरांकडे लक्ष ठेवा. उदा. एचची दांडी लहान काढली तर एच हा एनसारखा दिसतो. तसेच बी.एस. ही अक्षरे काढताना त्यांच्या वरच्या भागापेक्षा खालचा भाग किंचित मोठा असतो हे लक्षात घ्या.

स्टेशनरीच्या दुकानात इंग्रजी शब्द कोरलेल्या प्लॅस्टिकच्या पाट्या मिळतात. त्या अक्षरावरून पेन पेन्सिल फिरवून वळणाचा सराव करायचा व नंतर वहीवर ते अक्षर काढायचे. यामुळे अक्षर वळणदार होण्यास मदत होते.

एवढे सगळे समजले पण इंग्रजी या शब्दाचीच भीती असल्याने हातून काम पुढे सरकत नाही. त्यासाठी एक सोपी युक्ती वन मिनिट टीचर या इंग्रजी पुस्तकात दिली आहे. तुम्हाला जे साध्य करायचे आहे ते फक्त एका मिनिटाच्या सरावाने तुम्ही मिळवू शकता. डोळे बंद करा. डोळ्यासमोर चित्र आणा. तुम्हाला संयुक्त राष्ट्र संघटनेने भाषणासाठी बोलावले आहे. तुम्ही उत्तम इंग्रजीतून भाषण करत आहात. जगातील सर्व देशांतील लोक तुमचे भाषण ऐकत आहेत. तुमच्यासमोर हजारो लोक आहेत. भाषण संपते. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट. तुम्हाला खूप बरे वाटले.

डोळे उघडा, छान वाटले. उत्साह वाढला. चला तर मग याच उत्साहाचा उपयोग तुमच्या प्रगतीसाठी, इंग्रजीसाठी करून घ्या. हे तुम्ही नक्कीच करू शकतात. सद्‌गुरू श्री. वामनराव पै म्हणतात तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार. तुम्हाला खूप शुभेच्छा !

यशवंत व्हा ! जयवंत व्हा !!!

❖❖❖

## निवेदन

*सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी, विषयतज्ज्ञ, शिक्षणप्रेमी यांना आवाहन करण्यात येते की, मंडळाकडून 'शिक्षण संक्रमण' हा अंक दरमहा प्रकाशित केला जातो. शिक्षण संक्रमण मासिकाच्या सर्व वाचकांनी अंकाबाबतची आपली प्रतिक्रिया मंडळाकडे मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२-ए, फायनल प्लॉट नं. १७८- १७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ येथे पाठवाव्यात. प्राप्त झालेल्या प्रतिक्रियांना या मासिकातून प्रसिद्धी देण्यात येईल.*

# राष्ट्रभाषा हिंदी के विकास में महाराष्ट्र राज्य का योगदान



**श्री. गोविंद म. दाभोलकर**
माजी मूल्यमापन अधिकारी,
राज्य शिक्षण मंडळ, पुणे
प्रचार-शिक्षण प्रमुख, महाराष्ट्र
राष्ट्रभाषा सभा, पुणे
संपर्क : ९४२३५२९२८०

**स्वाधीनता के बाद महाराष्ट्र राज्य की सरकार ने राष्ट्रभाषा हिंदी के प्रति जनता की इस भावना को अधिकाधिक मजबूत बनाने की दृष्टि से हर कदम उठाया है ।**

## भूमिका :

स्वाधीनता आंदोलन के समय से लेकर आजतक महाराष्ट्र की जनता का हिंदी के प्रति दृष्टिकोण अति उदारमतवादी रहा है । उसने हिंदी को देश की संपर्क भाषा, राजभाषा और सही दिशा में राष्ट्रभाषा ही के रूप में स्वीकारा है । स्वाधीनता के बाद महाराष्ट्र राज्य की सरकार ने राष्ट्रभाषा हिंदी के प्रति जनता की इस भावना को अधिकाधिक मजबूत बनाने की दृष्टि से हर कदम उठाया है । राष्ट्रभाषा हिंदी के संबंध में बापूजी के विचारों पर चलने वाला, केंद्रीय शासन की राजभाषानीति को शत-प्रतिशत कार्यान्वित करने वाला हमारा 'महाराष्ट्र राज्य' अग्रसर है । इसके पहले का बंबई राज्य (महाराष्ट्र) का योगदान, विशेष रूप से उस समय के हमारे मुख्यमंत्री मान. बाळासाहेब खेर का कार्य विशेष उल्लेखनीय है । इस राज्य में विद्यालयों में हिंदी की पढ़ाई के शुभारंभ का श्रेय उन्हीं को जाता है ।

## राजनीति के चंगुल में हिंदी :

महाराष्ट्र के पूर्व शिक्षामंत्री मान्यवर श्री मधुकरराव चौधरी ने बापू की उक्ति का आधार लेकर कहा था, ''राष्ट्रभाषा के बिना राष्ट्र गूँगा नहीं, बहरा भी है । गांधीजी की इस बात में कितना गहरा अर्थ भरा है ! 'ऐरी मेरी वीर, जैसे-तैसे इन आँखिन सों कढ़िगो अबिर, पै अहिर कौं कढ़ैं नहीं' - वाली हालत उस समय हुई जब पंद्रह वर्ष की कालावधि के लिए हिंदी के साथ अंग्रेजी के प्रयोग को भारतीय संविधान ने मान्यता दी। यही आज हिंदी के लिए दुर्भाग्य सिद्ध हुआ है। देश को १९६५ के बाद भी अनिश्चित काल तक उस मान्यता को आगे बढ़ाना पडा । उस समय हिंदी के लिए अनुकुल स्थिति थी । आज वह स्थिति नही रही । एक भी राज्य का हिंदी को राष्ट्रभाषा बनाने को विरोध हो तो हिंदी इस देश की राष्ट्रभाषा नहीं बन सकती । केंद्रीय सरकार का अंग्रेजी के संबंध में यह निर्णय शुद्ध राजनीतिक चाल के आगे घुटना टेककर अपने राष्ट्रीय सिद्धांतो की बलि चढ़ाना मात्र है । भारतीय अस्मिता पर यह करारा आघात था । इस निर्णय के कारण राष्ट्रभाषा हिंदी के विकास की गति ही धीमी हो गई है । जब किसी भी देश की केंद्रीय सत्ता अपने संपूर्ण राष्ट्र के हित में निश्चित सिद्धांतों को पूरी ताकत के साथ अमल में लाने में सफल नहीं होती या किसी प्रादेशिक, धार्मिक, सांपदायिक अलगाववादी स्वार्थांध शक्ति के आगे एक बार झुक जाती है तो समझिए कि उसे दूसरी ऐसी अंदरुनी शक्तियों के सामने बार-बार झुकना पड़ता है और ऐसे राष्ट्र की प्रगति थम जाती है । उस समय तामिलनाडू जैसे एकमात्र अहिंदी भाषी राज्य के हिंदी विरोधी आंदोलन के आगे हमारा झुक जाना और इंग्रेजी भाषा को हिंदी के साथ सहयोगी भाषा के रूप में फिर से अनिश्चित काल के लिए जोड़ देना यही दर्शाता है । परिणामत: हिंदी के विकास में दृढ़ता से लगे अन्य राज्यों ने भी धीरे-धीरे हिंदी के प्रति अपनी नीति में अनिष्ट

लचीलापन लाना आरंभ किया । ऐसी अवस्था में भी आज तक महाराष्ट्र राज्य की हिंदी प्रति अपनी नीति पहले जैसी ही बिलकुल अनुकूल रही है ।

## बंबई (मुंबई) राज्य की हिंदी सेवा एवं पोतदार समिति का कार्य

सन १८३८ में हिंदुस्तानी बोर्ड की स्थापना हुई और उस समय से महाराष्ट्र में हिंदी शिक्षकों के लिए हिंदुस्थानी शिक्षक सनद परीक्षा चलाई गई । बाद में पोतदार समिति (१९५०) की रिपोर्ट के अनुसार ज्युनिअर तथा सीनियर शिक्षक सनद परीक्षाओं का आरंभ हुआ । उन परीक्षाओं को शासन की मान्यता रही ।

## पाठ्यक्रम में हिंदी का स्थान

महाराष्ट्र राज्य ने आरंभ से ही उच्च प्राथमिक एवं माध्यमिक के पाठ्यक्रम में अहिंदी भाषी छात्रों के लिए हिंदी का अध्ययन अनिवार्य रखा था । १९५७ से ११ वीं एस.एस.सी. के लिए और बाद में १०वीं एस. एस. सी. के लिए पाठ्यक्रम में हिंदी का अध्ययन अनिवार्य रखा गया था । कोठारी आयोग के त्रिभाषा सूत्र का स्वीकार करते समय भी अहिंदी माध्यम के स्कूलों में हिंदी को पूर्णतया या आंशिक रूप में अनिवार्य स्थान दिया गया था । वर्तमान राष्ट्रीय शिक्षानीति के अनुसार उच्च प्राथमिक एवं माध्यमिक के सभी अहिंदी भाषा छात्रों के लिए त्रिभाषा सूत्र में द्वितीय भाषा-संपर्क भाषा के रूप में पूर्ण हिंदी या संस्कृत अनिवार्य विषय रहा । महाराष्ट्र राज्य के पुनर्रचित पाठ्यक्रम में भी इसी नीति को स्वीकारा गया । महाराष्ट्र की पुनर्रचित पाठ्यक्रम समिति की महासभा ने यह भी निर्णय लिया था कि निम्न प्राथमिक को पाँचवीं कक्षा में ही हिंदी के अध्ययन का शुभारंभ होगा । उस दृष्टि से पाठ्यक्रम भी तैयार किया गया । आज भी पाँचवीं से उच्च प्राथमिक तक हिंदी का अध्ययन अनिवार्य है ।

## हिंदी में प्रचार में जुड़ी स्वैच्छिक संस्थाएँ

महाराष्ट्र में हिंदी के प्रचारयुग के इतिहास में सन १९३६, १९३७ और १९३८ ये तीन साल महत्त्वपूर्ण समझे जाएँगे। इन्हीं सालों में क्रमश: महात्मा गांधी के अहिंदी प्रांतों में, हिंदी प्रचार के प्रयत्न किए जाने के सुझाव को प्रत्यक्ष में लाने की दृष्टि से महाराष्ट्र में उस समय के बंबई राज्य में प्रयत्न हुए ।

'महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति, वर्धा', 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे' (१९३७) और 'बंबई हिंदी विद्यापीठ, बंबई' (१९३८) इन हिंदी प्रचार संस्थाओं की नीव डाली गई । इन संस्थाओं की स्थापना के पीछे पूरी राष्ट्रीय प्रेरणा थी । इन १९३६ के अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलन के नागपूर अधिवेशन में डॉ. राजेंद्र प्रसादजी के सभापतित्व में गांधीजी, टंडनजी जैसे महान राष्ट्रपुरुषों के नेतृत्व में वर्धा में 'राष्ट्रभाषा प्रचार समिति' की स्थापना हुई । उसके एक ही साल बाद सन १९३७ महामहोपाध्याय डॉ. दत्तो वामन पोतदार, देशभक्त शंकरराव देव जैसों के नेतृत्व में पुणे में 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा' की स्थापना हुई । उसके एक साल बाद सन १९३८ में भानु शंकर जैन जैसे नेता के तहत मुंबई में 'बंबई हिंदी विद्यापीठ' की स्थापना हुई । अखिल भारतीय स्तर पर हिंदी में प्रचार-प्रसार में जुटी इन तीन ताकदवर संस्थाओं का जन्म महाराष्ट्र के तीन प्रमुख शहरों में हुआ । सन १९५९ में राष्ट्र के महान नेता श्री मुरारजी देसाई, साथ ही श्रीमती रखमाबाई तल्ल्यूर जैसे काँग्रेसी कार्यकर्ताओं ने अपनी एक 'बंबई हिंदी सभा' नामक हिंदी प्रचार संस्था को जन्म दिया । हिंदी उर्दू के साथ-साथ प्रचार से जुटी 'हिंदुस्तानी प्रचार सभा' का जन्म भी मुंबई में हुआ ।

इसके अलावा 'महाराष्ट्र हिंदी प्रचार सभा, औरंगाबाद', 'लातूर जिला हिंदी साहित्य परिषद', 'हिंदी मंच', आंबेजोगाई, 'हिंदी आंदोलन' संस्था... आदि संस्थाएँ भी महाराष्ट्र में हिंदी के प्रचार-प्रसार में महत्त्वपूर्ण कार्य कर रही हैं।

## महाराष्ट्र शासन की मान्यता एवं संस्थाओं का कार्य

महाराष्ट्र सरकार ने पत्र संदर्भ-एफ ७-५०/६९ एच १/१८ फर १९७० की प्रेस विज्ञाप्ति के अनुसार प्रचार संस्थाओं की परीक्षाओं के पाठ्यक्रमानुसार हिंदी का स्तर निर्धारित करने उन परीक्षाओं को अधिकाधिक मात्रा में शरीक होने के लिए छात्रों को प्रोत्साहित किया है । आज तक ये संस्थाएँ महाराष्ट्र में और महाराष्ट्र के बाहर भी यहाँ तक कि विदेशो में भी करोड़ो अहिंदी भाषी छात्रों को हिंदी पढ़ाने का महत्त्वपूर्ण कार्य निभा रहीं हैं । इन संस्थाओं ने हिंदी के हजारों सेवाभावी प्रचारकों को तैयार किया है । हिंदी माध्यम के विद्यालय, महाविद्यालय, प्रशिक्षण केंद्र खोले हैं,

प्रचार पत्रिकाएँ-साहित्यिक पत्रिकाएँ चलाई हैं। कोशसाहित्य, भाषाशिक्षा पुस्तकें, साहित्यिक मौलिक ग्रंथ, अनुसंधान प्रबंध आदि का प्रकाशन किया है। प्रकाशन-प्रक्रिया में अनेक अध्ययनशील, प्रतिभाशाली लेखकों को प्रकाश में लाने में सफलता पाई है। अनेक मौलिक ग्रंथों-लेखों का अनुवाद हिंदी एवं प्रादेशिक भाषाओं में हुआ है। इन्हीं संस्थाओं के कारण अनेक हिंदी ग्रंथालय खुले हैं। हिंदी के प्रचार-प्रसार के हर पहलू को विकसित करने में महाराष्ट्र की इन संस्थाओं का कार्य बहुत ही महत्व रखता है।

## पत्र-पत्रिकाओं का हिंदी के प्रचार-प्रसार में योगदान

'नवभारत, टाइम्स, दैनिक विश्वमित्र, युगधर्म, नवभारत, आज का आनंद, लोकमत समाचार (दैनिक), धर्मयुग, साप्ताहिक हिंदुस्तान' .... (साप्ताहिक) जैसी हिंदी के प्रचार-प्रसार में ही नहीं, हिंदी के नवलेखकों को राष्ट्रीय स्तर तक लाने में महत्त्वपूर्ण भूमिका निभाने वाली इन पत्रिकाओं के साथ ही महाराष्ट्र की हिंदी प्रचार संस्थाओं की पत्रिकाएँ भी महाराष्ट्र के नवोदित प्रतिभाशाली लेखक-कवियों को प्रोत्साहित करने का काम कर रही हैं।

पत्रकारिता के क्षेत्र में राष्ट्रीय स्तर पर हिंदी के विकास में महाराष्ट्र का सकारात्मक योगदान महत्त्वपूर्ण है। माधव सप्रे जी द्वारा संपादित 'छत्तीसगढ़' पत्रिका, नागपुर में 'किसान समाचार, हिंदी केसरी', बाबुराव पराड़कर द्वारा संपादिक 'हिंदी बंगवासी, आज'। महाराष्ट्र ने भारत को पत्रकारमहर्षि विष्णु पराडकर, माधव सप्रे, लक्ष्मण गद्रे जैसे तेजस्वी पत्रकारों के साथ ही आचार्य काका कालेलकर, गोविंद थत्ते, कृष्णराव पळुसकर, न.वि. जोगळेकर, राहूल बारपुते (नई दुनिया : मध्य प्रदेश).... जैसे दर्जनों पत्रकार दिए हैं। इन पत्रकारों का योगदान भी कम महत्त्वपूर्ण नहीं। भक्ति के अमृतराय, मध्य मुनीश्वर, कृष्णदास, दयालदास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जैसे अनेक संतों ने अपने पदों की हिंदी में रचना करके तथा जनप्रबोधन द्वारा हिंदी को जन-जन तक पहुँचाने तथा राष्ट्र की एकता-अखंडता को दृढ़ कराने का महान कार्य किया।

संत साहित्यकारों में हिंदी शासकों में शिवाजी महाराज, छत्रपति शाहू महाराज ने भी हिंदी भाषा प्रोत्साहित किया। उस काल के जयराम पिंडे, रघुनाथ व्यास जैसे कवियों का योगदान भी उल्लेखनीय है। महादजी शिंदे, होळकर काल में भी कवि, महिपति, ठाकूरदास होनाजी बाळा, राम जोशी, सगनभाऊ प्रभाकर, अनंद फंदी... आदि कवि शायरों का हिंदी के विकास में महत्त्वपूर्ण योगदान रहा। धुळे के गोपाळ नरहरी देशपांडे, पुणे के केशव वामन पेठे जी ने भी हिंदी में रचनाएँ लिखीं। आपके द्वारा लिखी गई 'राष्ट्रभाषा' नामक पुस्तक (१८९४) हिंदी के प्रचार-प्रसार की दृष्टिसे महत्त्वपूर्ण रही। संत साहित्य नगरी में डॉ. वि. वि. कोलते, डॉ. यू. म. पठाण, डॉ. अशोक कामत, डॉ. केळकर, श्री. तुपकरी, डॉ. स. म. परळीकर, आदि का स्थान भी महत्त्वपूर्ण हैं।

हिंदी के विकास में सन १००० से महाराष्ट्र का योगदान आजतक अनविरत चलता आ रहा है। इस योगदान का हिंदी साहित्य के विकास में, हिंदी के प्रचार-प्रसार में और इससे भी महत्त्वपूर्ण 'हिंदी पढ़ो-आगे बढ़ो-भारत जोड़ो' का नारा जन-जन तक पहुँचाने में महत्त्वपूर्ण स्थान है।

तात्पर्य, हिंदी के प्रति अति उदार दृष्टिकोण, रखने वाला, केंद्रीय सरकार की राजभाषा नीति के अनुसार हर आदेश कड़ाई कार्यान्वित करने वाला 'महाराष्ट्र राज्य' हिंदी के विकास में विशेष कार्य करने वाला एक सर्वोपरि राज्य समझा जाता है।

इमें इस बात का गर्व है कि हिंदी के सर्वांगीण विकास में कम-से-कम महाराष्ट्र में हिंदी का कार्य एवं भविष्य काफी उज्ज्वल है।

(संदर्भ : सौजन्य : विश्व हिंदी सम्मेलन विशेषांक (गगनांचल), महाराष्ट्र हिंदी परिषद विशेषांक (उपलब्धि), महाराष्ट्र सभा रजत जयंति विशेषांक (राष्ट्रवाणी) : हिंदी साहित्य तथा भाषा को महाराष्ट्र की देन (डॉ. रणजित जाधव)।

❖❖❖

# आजच्या शिक्षणपद्धतीतील उणिवा व उपाययोजना



**श्री. बा.ल. नागवेकर**
माजी राज्यमंडळ सदस्य,
एस.एस.सी. बोर्ड, पुणे
संपर्क : ९८६९६३४२५५

गेल्या पन्नास-साठ वर्षात भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. अजूनही अपेक्षित बदल झालेले नाहीत. सर्वांगीण विकास करणे, हे शिक्षणाचे मूलभूत उद्दिष्ट आहे. शिक्षणार्थींचा मानसिक, शारीरिक आणि भौतिक विकास व्हावा यासाठी अनेक शैक्षणिक धोरणे राबविण्यात आली. तथापि उद्दिष्टपूर्ती झाली नाही. उलट उद्दिष्टांची पायमल्ली करण्यात आली. त्याचे मुख्य कारण म्हणजे परीक्षा पद्धतीला देण्यात आलेले अवास्तव महत्त्व. परीक्षा हे मूल्यांकनाचे प्रभावी साधन म्हणून वापरण्यात आले. वस्तुत: परीक्षा हे मूल्यांकनाच्या अनेक साधनांपैकी एक साधन आहे. परीक्षा पद्धती हीच मूळात सदोष पद्धती आहे. प्रथमत: आपण या परीक्षा पद्धतीतील लक्षणीय दोष समजून घेऊया.

रम्य ते बालपण, शैशवाचे दिवस, खेळायचे, बागडायचे, फिरायचे, निसर्गाचा आस्वाद घ्यायचे, बाल्यावस्थेतील आनंद घ्यायचे असे ते दिवस. फूलझाडावरची नाजूक, सर्वांगसुंदर अशी कळी आनंदाने उमलत असते, तसे उमलायचे ते दिवस, स्वाभाविकरीत्या उमलत विकास करण्याचे ते दिवस, पण परीक्षेच्या दडपणामुळे, भीतीमुळे आणि चिंतेमुळे बाल्यावस्थेतील मुलांचे बालपण हरवून जाते आणि नको ते बालपण म्हणण्याची वेळ येते.

सध्या पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यायची परंतु त्यांना अनुत्तीर्ण करावयाचे नाही, या सरकारी फतव्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावरचे दडपण कमी झाले आहे, तथापि परीक्षेची भीती ही असतेच.

मंडळाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या काही वेगळ्याच असतात.

शिक्षक, पालक, शेजारीपाजारी, नातेवाईक आणि अनेक हितसंबंधातील लोक परीक्षेला बसणाऱ्या त्या बिचाऱ्या विद्यार्थ्याला सातत्याने सतावत असतात. सतत अभ्यास करायला सांगतात. रोजच्या रोज शाळेत जाणे, कोचिंग क्लासला जाणे आणि शिवाय एखाद्या खाजगी ट्यूशनला जाणे. हे सगळे करीत असताना त्याचा जीव मेटाकुटीला येतो. स्वतंत्ररीतीने अभ्यास करायला त्याला वेळच नसतो. फिरणे नाही, खेळणे नाही, करमणूक नाही. या सर्वांमुळे त्याचे शारीरिक स्वास्थ्यही बिघडण्याचा संभव असतो.

परीक्षेच्या या कालावधीत एखादा परीक्षार्थी आजारी पडला, त्याला परीक्षेला जाता जाता अपघात झाला किंवा त्याच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती आजारी पडली अथवा कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे निधन झाले तर तो विद्यार्थी परीक्षेला बसू शकेल का ? बसला तरी कोणत्या मनोवस्थेमध्ये तो पेपर लिहू शकेल ? त्याचे वर्ष वाया गेल्यातच जमा आहे.

**सबंध वर्षभर केलेल्या अभ्यासाचे मूल्यांकन तीन तासात करणे हे कुठल्या शास्त्राला धरून आहे ?**

### उपाययोजना :

### १. शालेय स्तरावर व्यक्तिमत्त्वाचा विकास :



विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांचे उदात्तीकरण करण्यावर अधिक लक्ष दिले पाहिजे. वक्तृत्व कला, क्रीडा, वादविवाद, चर्चा इत्यादी सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करून त्यात प्रत्येक विद्यार्थ्याला सक्तीने सहभागी होण्यास लावले पाहिजे.

शिक्षक आणि पालक केवळ परीक्षेचाच विचार करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा नाही. परीक्षेला विचारण्यास येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे कशी लिहायची याच एका हेतूने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात म्हणून पालकांची आणि शिक्षकांची मानसिकता बदलण्याची आता नितांत गरज आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षार्थी न बनविता, विद्यार्थी ज्ञानार्थी बनविण्याची गरज आहे.

### २. शारीरिक क्षमता वाढविणे :

शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी शालेय स्तरावर शारीरिक शिक्षणाच्या तासिकेत वाढ करून दररोज किमान दोन तासिका ठेवणे आवश्यक आहे. रोजच्या रोजच विद्यार्थी मैदानात जातील अशी व्यवस्था करणे गरजेचे आहे. शाळा सुटल्यावरही एखादा तास विद्यार्थ्यांना स्वेच्छेने खेळण्यासाठी दिल्यास उत्तम.

### ३. प्रभावी अध्यापन :

अध्यापनासाठी प्रश्नोत्तर पद्धती अथवा व्याख्यानपद्धतीचा सर्रास उपयोग केला जातो ही कंटाळवाणी आणि कालबाह्य पद्धती आहे.

प्रभावी अध्यापनासाठी दृक्श्राव्य पद्धतीचा उपयोग करणे आता गरजेचे आहे. ओव्हरहेड प्रोजेक्टर, फिल्मस्ट्रिप प्रोजेक्टर, व्हिडीओ, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी अत्याधुनिक साधनांचा कौशल्यपूर्ण रीतीने उपयोग अध्यापन प्रक्रियेत करणे ही आता काळाची गरज आहे.

### ४. व्यावसायिक शिक्षणाची सोय :

सध्याचे तथाकथित शिक्षण घेतलेले लाखो तरुण-तरुणी रोजगारापासून - अर्थार्जनापासून वंचित आहेत म्हणून व्यावसायाभिमुख असे विषय अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत करून त्या विषयांचे शिक्षण देण्याची व्यवस्था शालेय स्तरावर होणे अतिशय गरजेचे आहे.

### ५. शिक्षण मंडळाने केवळ पन्नास गुणांची परीक्षा घ्यावी :

सध्या प्रत्येक विषयासाठी २०% गुण अंतर्गत मूल्यांकनातून शाळेतर्फे परीक्षा मंडळाला (बोर्डाला) दिले जातात. शारीरिक क्षमता वाढल्यानंतर मानसिक क्षमताही वाढते. शारीरिक शिक्षणाला महत्त्व देणे क्रमप्राप्त आहे. शारीरिक शिक्षण हा केवळ श्रेणीचा (Grade) विषय न ठेवता अंतर्गत मूल्यांकनाचा विषय ठेवावा. त्यासाठी १५% गुणांची तरतूद करावी. व्यवसाय शिक्षणालाही महत्त्व देणे आवश्यक आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या विषयांचेही अंतर्गत मूल्यांकन करून त्यासाठी १५% गुण निर्धारित करावे. २०% + १५% + १५% असे एकूण ५०% गुणांची परीक्षा अंतर्गत मूल्यांकनावर आधारित असेल. परीक्षा मंडळाने प्रत्येक विषयाची ५०% गुणांची परीक्षा घ्यावी.

परिणामी परीक्षा पद्धतीतील दोष ५०% ने कमी होतील. परीक्षार्थींच्या अनुत्तीर्णतेचे प्रमाण बरेच कमी होईल, अनुत्तीर्ण झाल्यामुळे आत्महत्या करणाऱ्या किंवा आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण नगण्य असेल. दहावी (S.S.C.) च्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा वयोगट हा सामान्यपणे तेरा-चौदा वर्षांचा असतो. आठवीपर्यंत कोणालाही अनुत्तीर्ण करायचे नाही. आता दहावीपर्यंतच्या कोणत्याही विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करायचे नाही असाही नियम करता येईल.

## ६. सर्वात्कृष्ट दर्जाच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती :

- सर्वोत्कृष्ट दर्जाचे पाठ्यपुस्तक निर्मिती करण्यासाठी खालील मुद्यांचा विचार करावा :
- मुद्रण (Printing) मोठ्या टाईपमध्ये असावे.
- पाठ्यांशातील संदर्भानुसार पाठ्यपुस्तकात रंगीत चित्रांचा अंतर्भाव करावा.
- सर्वोत्कृष्ट दर्जाचा कागद वापरावा.
- भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील नकाशे, चित्रे सुद्धा रंगीत असावीत.

भाषा विषयांच्या पाठ्यपुस्तकात लेखकांचे / कवींचे रंगीत फोटो असावे. कथेनुसार किंवा पाठानुसार रंगीत चित्रांचा समावेश करावा.

सचित्र, ठळक अक्षरांचे आणि मनोवेधक असे पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच आवडेल, मनापासून त्या पुस्तकाचे ते वाचन करतील.

## ७. शैक्षणिक फंडाची निर्मिती (प्रत्येक राज्याचा स्वतंत्र फंड) :

शिक्षण व्यवस्थेमध्ये वरीलप्रमाणे बदल आणि सुधारणा करावयाच्या असतील तर त्यासाठी प्रचंड मोठ्या शैक्षणिक निधीची आवश्यकता आहे. शैक्षणिक संस्था आणि शाळा या अनुत्पादित क्षेत्रामध्ये मोडल्या जातात. कोणतेही सरकार उत्पादनाचा विचार करीत असते.

अ) खासदार आणि आमदार यांचा निधी विकासकामांसाठी वापरला जातो. शैक्षणिक विकास हा सुद्धा विकासकामाचा विषय मानून खासदार-आमदारांच्या विकास निधीचा काही टक्के निधी शैक्षणिक निधीमध्ये जमा करता येईल.

आ) आपल्या देशातील प्रत्येक राज्यामध्ये कोट्यधीश आणि अब्जाधीश अशा अतिश्रीमंतांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैसा घेऊन या सरकारी निधीमध्ये भर टाकता येईल.

ई) केंद्र सरकारकडून प्रत्येक राज्याच्या शैक्षणिक फंडासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात पैसा उपलब्ध करता येईल.




सरकारची तीव्र इच्छाशक्ती असेल तर असा प्रचंड मोठा निधी उभारता येईल. सदर निधीचा विनियोग खालीलप्रमाणे करता येईल :

अ. व्हर्च्युअल शिक्षण पद्धती अवलंबिता येईल.

आ. अत्याधुनिक शैक्षणिक साधने - विशेषत: दृक्श्राव्य साधने विकत घेता येतील.

इ. शाळांच्या वेतनेतर खर्चासाठी या निधीचा उपयोग करता येईल.

ई. आपल्या राज्यात 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ' नावाचे राज्यमंडळ आहे. त्याशिवाय इतर नऊ विभागीय मंडळे आहेत. त्या सर्वांचे वार्षिक अंदाजपत्रक अगदी बेताचे प्रत्येकी सुमारे सोळा ते सतरा कोटींचे. नऊ विभागीय मंडळे आणि राज्यमंडळ धरून सर्वांचे दोनशे कोटीपेक्षाही कमी असे वार्षिक अंदाजपत्रक (Budget) असते. इतर आस्थापनांच्या मानाने हे फारच कमी आहे. मुंबई महापालिकेच्या

एकट्या शिक्षण समितीचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे दोन ते तीन हजार कोटींचे असते. पैशाची कमतरता असल्यामुळे सर्वच मंडळांना त्यांचे आर्थिक व्यवहार अतिशय काटकसरीने करावे लागतात.

**दर्जेदार शिक्षणाचे फायदे :**

- अर्थार्जनाचे साधन प्रत्येकाला उपलब्ध झाल्यास तरुण पिढी सक्षम होईल.
- चोऱ्या, लूटमार, दरोडे, भ्रष्टाचार इत्यादींचे निर्मूलन होईल.
- विकृत मनाचे नागरिक तयार होणार नाहीत.
- जागरुक, सजग आणि राष्ट्रप्रेमी नागरिक तयार होतील.
- राष्ट्र आर्थिकदृष्ट्या बळकट होईल.
- उत्तम दर्जाचे ज्ञान मिळाल्यामुळे पैशाचा हव्यास कमी होईल. पैशासाठी दुसऱ्याला लुबाडले जाणार नाही.
- दर्जेदार शिक्षणामुळे सुसंस्कृत नागरिक तयार होतील.

पैशाअभावी छपाईसाठी उत्तम दर्जाचा कागद वापरता येत नाही. परीक्षक, नियामक, केंद्रव्यवस्थापक आणि पर्यवेक्षक इत्यादींना समाधानकारक मानधन देता येत नाही. कामाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचा उपयोग करता येत नाही. मोजक्याच कर्मचाऱ्यांकडून प्रचंड मोठ्या प्रमाणात कामे करवून घेतली जातात. परीक्षा मंडळाची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रचंड निधीची आवश्यकता आहेच. तो निधी या सरकारी निधीतून उपलब्ध करता येईल.

**पाठ्यपुस्तक मंडळासाठी निधी :**

उत्तम दर्जाचा कागद, दर्जेदार छपाई आणि दर्जेदार सचित्र पाठ्यपुस्तके छापण्यासाठी पाठ्यपुस्तक मंडळालाही मोठ्या निधीची गरज आहे. त्यांनाही असा निधी उपलब्ध करून देता येईल. थोडक्यात दर्जेदार शिक्षणासाठी प्रचंड मोठा निधी उपलब्ध करणे गरजेचे आहे.

सगळी सोंगे करता येतात पण पैशाचे सोंग करता येत नाही. पैसा झाडाला लागत नाही असेही म्हणतात. परंतु दुर्दम्य आत्मविश्वास, अति मोठी महत्त्वाकांक्षा, प्रचंड मोठी इच्छाशक्ती या गुणांच्या जोरावर सरकारने असा प्रचंड मोठा, निधी उभारण्याचा संकल्प सोडावा आणि तो पूर्णत्वास आला तर आपण विद्यार्थ्यांना अतिशय दर्जेदार शिक्षण देऊ शकतो. पर्यायाने सर्वांगीण विकास झालेला आदर्श नागरिक आपण घडवू शकतो.

शिक्षण व्यवस्थेत आणि शिक्षण पद्धतीत अपेक्षित बदल होतील, हीच अपेक्षा.

❖❖❖

# शिक्षणातून असा साधावा राष्ट्रविकास

सौ. वैष्णवी बोरगावकर
को. दौ. विद्यालय व गोधाजीराव मुखरे कमवि,
पुसद, यवतमाळ
संपर्क : ९४२३६५३९१९

## शिक्षणातून राष्ट्रविकास

*अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानांजन शलाकया ।*
*चक्षुसान्मिलितं येनं तस्मै श्री गुरुवे नमः ।।*

अज्ञानअंधःकाराने काही पाहू न शकणाऱ्याच्या डोळ्यात ज्ञानरूपी अंजन टाकून ज्यांनी त्याला दृष्टी दिली, त्या गुरूंना प्रणाम !

शिक्षणातून राष्ट्रविकास साधण्याबद्दल लिहिणे, म्हणजे आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करणे. ही गरुडभरारी घेण्याचं बळ पंखात नाही, तरी अंतर्यामी उसळलेल्या अनंत विचारलहरींना 'गुरुचरणां'प्रत नेण्यासाठी हे शब्दधनू.

शिक्षकाची निर्मळ, सहजस्वाभाविक, निर्व्याज दृष्टी व त्याचे निष्कपट, करुणामय, प्रेममय वात्सल्यपूर्ण मन विद्यार्थ्यांना शिक्षणाची अनिवार ओढ लावू शकतात. चांगल्या मनातच चांगले विचार रुजतात आणि अशा व्यक्तीच इतरांना भावतात, प्रेरित करतात. नवराष्ट्र घडवतात.

*लाली मेरे लाल की, जीत देखु तीत लाल*
*लाली देखत मैं गई, मैं भी हो गई लाल ।*

(संत कबीर)

> **शिक्षकी-पेशा सामान्य नाही, सन्मान्य आहे. ज्ञानार्जनाला व ज्ञानप्रसाराला वाहून घेतलेल्या शिक्षकांचे जत्थेच्या जत्थे निर्माण व्हायला हवे.**

अज्ञान व गरिबी हे भारतीयांचे मोठे शत्रू आहेत, असं स्वामी विवेकानंद नेहमी म्हणायचे. ते दूर करण्यासाठी कसे व कोणते शिक्षण द्यावे, याची त्यांनी योग्य मांडणी केली, कार्यकर्ते तयार केले, भारताचं नवं रूप विलोभनीय वाटू लागलं. स्वामीजींना अपेक्षित होतं, त्या धर्तीवर शिक्षण दिलं तर 'नवभारत' पुन्हा एकदा तेजोमय होईल.

### राष्ट्र विकसित करण्याची आवश्यकता :

राष्ट्राची उभारणी, स्वातंत्र्य व प्रगती या बाबी अर्थातच नागरिकांवर अवलंबून असतात. लोकांचे राष्ट्रप्रेम, परस्पर सामंजस्य, आपुलकीची भावना, निर्भयता, कष्टाळू वृत्ती, यावर राष्ट्र उभं राहातं. स्वच्छता, सृजनता, सदाचार, सहनशीलता, शील-संवर्धन या गोष्टी राष्ट्राला सुंदर बनवतात, फुलवतात. सैनिकी शक्ती, आर्थिक पाठबळ हे सुद्धा फार महत्त्वाचं. हे गुण आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणं, हे शिक्षणाचं. उद्दिष्ट.

आपल्या प्राचीन संस्कृतीला आपल्याला जपायचं व वृद्धिंगत करायचं आहे. राष्ट्राच्या अस्मितेला धक्काही लागू देणार नाही, अशी मुलं तयार करायची आहेत. शेजारी राष्ट्रे रोज कुरापती काढत आहेत. 'हातात क्षेपणास्त्रे, तोंडात शांततेचा जप' अशी दुटप्पी भूमिका चीन घेत आहे. पाकिस्तानातील राजकारण्यांनी पाकिस्तानच्या 'पाक' नीतीला

केव्हाच सुरुंग लावलाय. 'बळी तो कान पिळी' अशी जगाची स्थिती आहे. भारतातही काही 'मोठी' मंडळी स्वार्थासाठी देशही विकायला मागेपुढे पाहणार नाहीत. असं 'कुंपणानीच शेत खाल्लं' तर आपण काय नुसतं बघत बसणार ? आपली मनं एवढी मुर्दाड झाली आहेत ? राष्ट्राचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक मूल्याधिष्ठित विकास करणं हा शिक्षणाचा हेतू आहे.

**लोकांचे राष्ट्रप्रेम, परस्पर सामंजस्य, आपुलकीची भावना, निर्भयता, कष्टाळू वृत्ती, यावर राष्ट्र उभं राहातं. स्वच्छता, सृजनता, सदाचार, सहनशीलता, शील-संवर्धन या गोष्टी राष्ट्राला सुंदर बनवतात, फुलवतात.**

## शिक्षण कसे असावे ?

आज जी मुलं माध्यमिकला आहेत, ती सात-आठ वर्षांनी स्वत:च्या पायावर उभी राहतील. त्यावेळी जवळपास पूर्णपणे automation आलेले असेल. आजच आपण बहुतांशी यंत्रांच्या भरवशावर आहोत. पुढच्या दशकात पूर्णपणे मशीन्सच्या भरवशावर कामं चालतील. त्यावेळची कामं तीन क्षेत्रात विभागली जाऊ शकतात.

१. मानवीय २. न-मानवीय ३. अमानवीय

जी कामं माणसं स्वत:च्या शक्तीच्या भरवशावर करू शकतात, ती मानवीय. जी कामं फक्त यंत्रांच्याच साहाय्याने केली जाऊ शकतात, ती न-मानवीय. मानवाला दिलेल्या विद्येचा उपयोग वाईट कामांसाठी उदा. दहशतवादी कारवाया विमान हायजॅकिंग अशा गोष्टींसाठी केला तर ते अमानवीय (मानवाला न शोभणारे) कृत्य ठरेल.

मानवीय कामं करण्याचं कौशल्य शाळेत शिकवले जातं. (जाऊ शकतं). यंत्रांची उत्तम जाण व हाताळण्यातील कौशल्य आपल्याला न-मानवीय कामांसाठी मदत करतील. संगणक, इंटरनेट हे शिक्षणाचे एक प्रभावी माध्यम आहे. फक्त वापर योग्य हवा. या जबाबदाऱ्या शिक्षक उत्तम रीतीने पार पाडू शकतात. अमानवीय कृत्य मुलांनी करू नये, यासाठी त्यांच्यावर तसे संस्कार करणे फार कष्टाचे पण महत्त्वाचे काम आहे.

आज सरकारने काही शाळांना संगणक दिले. पण कुशल तज्ज्ञांअभावी किंवा नियोजनाअभावी बऱ्याच ठिकाणी ते धूळ खात पडले आहेत. काही चांगल्या शाळांना ते मिळाले नाहीत. काही ठिकाणी ते अपुरे पडतात. सरकारने एवढ्या मोठ्या वस्तू दिल्यानंतर त्याचा वापर नीट होतो की नाही, याचा खरा तपास व्हायला हवा ना ? नवीन गोष्टी (उदा. संगणक) शिकायला मुलं फार उत्सुक असतात. शिक्षक कुठेतरी कमी पडतात.

जिथे मुलं कमी हुशार आहेत, तिथे कोणतातरी एक उद्योगधंदा करता येईल, असे प्रशिक्षण १२वी पर्यंत त्याला दिले पाहिजे. जिथे मुलं खूप हुशार आहेत, तिथे त्यांना अभ्यासाचं, स्पर्धेचं दडपण येणार नाही, असा एक विषय अनिवार्य केला पाहिजे. मुंबई आय.आय.टी. ने थिएटर, आर्ट्स, संगीत अशांपैकी एक विषय विद्यार्थ्यांना अनिवार्य केलेला आहे. हे आपल्याकडे ११वी व १२वी विज्ञानसाठी नाही का करता येणार ? त्यामुळे मुलांना येणारे संभाव्य नैराश्य टळेल. तसेच शाळांतील कार्यानुभव, समाजसेवा, संगणक यांच्या तासिकांचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे.

## शिक्षकाची भूमिका :

नव्या माध्यमांचा यथायोग्य व योग्यवेळी वापर शिक्षकांना व विद्यार्थ्यांना करता यायला हवा. एके काळी समाजाने शिक्षकांना 'गुरू' चा (जे देवासमान मानले जात होते) दर्जा दिला. आज ते फारसं शक्य नाही. कारणं आपल्याला ठाऊक आहेत. तेव्हा आपण मुलांचे सल्लागार, सहाध्यायी, मित्र, मदतनीस बनूया. शिकणं सोपं बनवूया. दृक-श्राव्य साधनांचा वापर करून अध्ययन-अध्यापन रंजक व परिणामकारक करूया. विद्यार्थ्यांना career - options निवडायला आपल्या मदतीची गरज आहे. त्यांच्या मनाचा कल कोणत्या विषयाकडे आहे, ते त्याला कळण्यासाठी मदत करूया. (Aptitude test) स्पर्धा परीक्षांमध्ये माहिती लक्षात ठेवण्याच्या काही खास खुबी त्याला सांगूया. निव्वळ पुस्तकी किडा न बनता आपलं एक सोशल सर्कल बनवून किंवा स्टडी सर्कल बनवून त्यांना गप्पा मारायला

शिकवूया. (Group discussion)

भारतात खूप गरीब मुलं आहेत. दररोज ४००० बालमृत्यू होतात. हजारो बालमजुरांच्या इवल्याशा डोळ्यांमधली स्वप्नं वास्तवतेच्या निखाऱ्यात जळून खाक होतात. रोगराई, अंधश्रद्धा, कुपोषण इत्यादींचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत आहे. श्रीमंताच्या मुलांना गरिबीचे चटके बसत नाहीत, पण त्यांची 'तृष्णा'च आई-वडीलांनी काढून घेतली आहे. मागायच्या आधीच सारं काही मिळतं. संघर्ष नाही. म्हणून मिळवण्यातला आनंद नाही. अशाने जाणिवा, संवेदना बोथट होतात. उथळ अपेक्षा डोईजड होतात. तरल संवेदना कुरतडल्या जातात. समाजाला ही मुलं कधी जवळच करत नाहीत. सतत आपल्याच नादात कर्तव्यशून्यतेचे अवजड ओझे मनावर असल्याने 'जन्म आला हेला, पाणी वाहता वाहता मेला' अशी स्थिती होते.

या सर्वांना शिक्षक मार्गदर्शन करू शकतात. शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणू शकतात. शिक्षकी-पेशा सामान्य नाही, सन्मान्य आहे. ज्ञानार्जनाला व ज्ञानप्रसाराला वाहून घेतलेल्या शिक्षकांचे जत्थेच्या जत्थे निर्माण व्हायला हवे.  मुलांना सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक किंवा सांस्कृतिक समूहाशी बांधून घ्यायला शिकवायला हवं. मुलांच्या सशक्त भावनांचा उत्सव व्हायला हवा. त्यांना नवीन नवीन कल्पना द्याव्यात. माणूस बनवा. भित्र्या मुलांनाही सिंहाचं काळजी द्या. शिक्षकाच्या केवळ अस्तित्वाचा प्रभाव असावा. युक्तिवाद इतका सूक्ष्म असावा की ऐकणाऱ्याचे भान हरपावे. पुस्तकी ज्ञानाला स्वत:च्या प्रज्ञेचा स्पर्श व्हावा. ज्ञानाला अनुभूतीचे बळ असावे.

### ५. निष्कर्ष :

आज नवनवीन पद्धती येत आहेत. त्यांना स्वीकारलं पाहिजे. रटाळपणे शिकवू नये. फक्त पुस्तकी माहिती वाचून किंवा बोलून दाखवण्यापेक्षा थोडे त्यापलीकडचेही (पण मर्यादेचे भान ठेवून) सांगावे. स्वत:च्या मुलांसाठी चोखंदळपणे शिक्षक निवडणाऱ्या माय-बाप शिक्षकांनी आपणही विद्यार्थ्यांना पूर्णपणे संतुष्ट करतो ना, याचा विचार करावा. बोर्डानेसुद्धा शिक्षकांचे ज्ञान व प्रयत्न अद्ययावत आहेत ना, हे तपासावे. शिक्षक, पालक, विद्यार्थी, व्यवस्थापन, बोर्ड या सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास 'राष्ट्रविकास' चांगल्या प्रकारे होऊ शकेल. सत्याची शिकवण आचरणात आणून जेव्हा विद्यार्थ्यांचा ऐहिक, अध्यात्मिक व मानसिक विकास होईल, तेव्हाच राष्ट्राचा खरा विकास होईल. बा शिक्षका, ऊठ, जागा हो. तू 'अमृताचा पुत्र' आहेस.

❖❖❖

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ) पुणे

## सुवर्ण महोत्सव वर्ष २०१५

### :: सुवर्ण महोत्सव विशेषांक प्रकाशनाकरिता विशेष सहकार्य ::

श्री. जी. डी. सोनवणे - संशोधन अधिकारी, राज्यमंडळ

श्री. के. एस. गांगोडे - पर्यवेक्षक लिपिक

श्री. आर. एम. शिंगाडे - वरिष्ठ लिपिक

श्री. पी. एन. मिलके - वरिष्ठ लिपिक

श्री. एम. एस. क्षिरसागर - कनिष्ठ लिपिक

श्री. पी. एस. गायकवाड - कनिष्ठ लिपिक

श्रीमती आर. एम. शिलेदार - कनिष्ठ लिपिक

श्रीमती एम. एम. मटकर - कनिष्ठ लिपिक

श्री. डी. एम. गोळे - कनिष्ठ लिपिक

श्री. जी. एस. सायकर - शिपाई

# एकविसाव्या शतकातील शिक्षणापुढील आव्हाने

– श्री. जी. टी. राठोड
शासकीय माध्य. व उच्च माध्य. आश्रमशाळा, राणीगाव,
ता. धारणी, जि. अमरावती
संपर्क : ७६२०८१८८८६

**प्रास्ताविक :**

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा विस्तार वाढला आहे. शैक्षणिक क्षेत्र व ज्ञान सतत वाढत आहेत. विद्यार्थीसंख्या सतत वाढत आहे. विषयांची संख्या व विषयज्ञानाची खोली वाढते आहे. अध्यापनाचे तंत्र पद्धतीत, प्रतिमाने यात नव्याने भर पडत आहे. नवीन साधने तयार होत आहेत. नवीन संशोधन चालू आहे. सामाजिक, राजकीय, जागतिक शिक्षणाचे संदर्भ बदलत आहेत. शिक्षणाचा अर्थ, व्याख्या बदलत चालल्या आहेत. या सर्वांची एकविसाव्या शतकात शिक्षणापुढे आव्हाने आहेत.

**शिक्षणापुढील आव्हाने :**




**अपूर्ण अभ्यासक्रमाची रचना :**

अभ्यासक्रमांची रचना संख्या १०० वर्षांचीच दिसून येते. काही किरकोळ बदल दिसत असले तरी परीक्षा पद्धती, अध्यापन पद्धती, सुट्टीचे दिवस, वेळापत्रक इ. बाबत चाकोरीबाहेर कोणी जात नाहीत. त्यामुळे अभ्यासक्रमात बदल जाणवत नाही.

**शिक्षकपेशाची फारकत :**

शिक्षक पेशा हा इतर व्यवसायापेक्षा फार वेगळा आहे. काही पथ्य, नैतिकता सांभाळून कामे केले पाहिजे हे सर्वांना मान्य आहे. परंतु व्यापारी दृष्टिकोन ठेवून सर्व शैक्षणिक कार्य चालते. आत्मियता नसलेले शिक्षक दिसून येतात.

**चुकीची अध्यापन पद्धती :**

अभ्यासासाठी विविध अध्यापन पद्धती व तंत्रे, साधने शिक्षक प्रशिक्षणात अभ्यासली जात असली तरी प्रत्यक्षात त्याचा वापर होत नाही. त्यामुळे अध्यापन-अध्ययन चुकीच्या मार्गाने चालू आहे. मानसशास्त्रीय व इतर तात्त्विक भाग पुस्तकातच राहतो.

**शिक्षक प्रशिक्षण संस्थेत फारकत :**

प्रशिक्षण संस्था, प्रशिक्षित शिक्षक आणि कार्यरत असणाऱ्या संस्था यांचा मेळ बसत नाही. त्यामुळे विकासाची लक्षणे दिसत नाहीत. सर्वच ठिकाणी स्वायत्तता दिसते. सहकार्य, समन्वय साधला जात नाही. याबाबत कोणतीच खंत वाटत नाही.

**विषयज्ञानाची उणीव :**

विद्यार्थी व शिक्षकांमध्ये स्वत:च्या विषयाच्या ज्ञानाची गरिबी जाणवते. त्यामुळे आत्मविश्वास कमी आहे.

**शैक्षणिक सुविधांची कमतरता :**

अनेक ठिकाणी सर्वच प्रकारच्या गैरसोयी दिसून येतात.

**व्यवस्थापनाचे दुर्लक्ष :**

अनेक ठिकाणी व्यवस्थापन समितीचे संस्थानांकडे दुर्लक्ष असलेले जाणून येते. त्यामुळे शिक्षणावर त्याचा परिणाम जाणवत आहे.

**आर्थिक दुर्बलता :**

शिक्षणाच्या सोयीसाठी आर्थिक गुंतवणूक कमी होत आहे. त्याचा परिणाम शैक्षणिक दर्जा सुधारणेवर होत असतो.

**दीर्घ नियोजनाचा अभाव :**

शिक्षणाला दीर्घ नियोजन हवे व त्यानुसार कार्यवाही सुद्धा झाली पाहिजे.

**योग्य शिक्षक संख्येचा तुटवडा :**

प्राथमिकपासून उच्च शिक्षण संस्थांतून विद्यार्थी व शिक्षकसंख्या यांचे प्रमाण नेहमी अयोग्य व गरजेपेक्षा फारच कमी जाणवते. त्यामुळे एकूण कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे.

**संशोधन कार्य कमी :**

संशोधन योग्य व आवश्यक ते होत नाही. जे होते ते फक्त पदवीसाठी होते. त्यासाठी संशोधन योग्य करणे महत्त्वाचे आहे.

**संगणक शिक्षकांची कमतरता :**

जवळपास सर्वच शाळा, महाविद्यालयीन संस्थांमध्ये संगणक शिक्षकांची कमतरता जाणवत आहे. परिणामी विद्यार्थ्यांना देशातील चालू घडामोडी व इतर कार्य समजत नाही.

**प्रसार माध्यमाचा अभाव :**

अनेक संस्थांमध्ये प्रसारमाध्यमे उपलब्ध नाहीत. त्यामुळे शिक्षणात अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी विद्यार्थी कमकुवत बनत आहे.

## भाषेचा अभाव :

भारतामधील काही दुर्गम भागामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्या भाषेचा अभाव जाणवत आहे. म्हणून त्या त्या भागातील शिक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे.

## पालकांचा बदलता दृष्टिकोन :

अनेक पालकांचा आपल्या पाल्याबद्दलचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. परिणामी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होत आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्तीचे वातावरण :

अनेक ठिकाणी शिक्षक विद्यार्थ्यांची कुवत, बुद्धिमत्ता, मानसशास्त्र न जाणताच ज्ञान देत असतात. परिणामी विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्तीचे सध्या वातावरण दिसत आहे.

## विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची संधी मिळत नाही :

भारतामध्ये अनेक ठिकाणी फक्त शिक्षकांनाच प्रशिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना काहीच समजत नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

## उपाययोजना :

- अभ्यासक्रमांची पुनर्रचना हवी.
- आर्थिक सोयीत वाढ - खाजगीकरणात सुधारणा
- संशोधनात वाढ व वापरण्यावर अधिक भर हवा
- शैक्षणिक कार्याची आवड व मान्यतेत वाढ
- राजकीय हस्तक्षेप कमी व सामाजिक जागृती अधिक
- पुढील किमान २५ वर्षाचे नियोजन हवे
- सामाजिक, राजकीय, शैक्षणिक एकसंघपणा हवा.
- प्रवेशप्रक्रियेत बदल आवश्यक
- शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा वाढवून कार्यक्षम शिक्षकांना प्राधान्य
- सेवाशक्तीची पुनर्बांधणी करण्याची गरज
- शैक्षणिक मूल्यमापन प्रक्रियेत बदल हवा.
- शैक्षणिक साधने व नव्या तंत्राचा जाणीवपूर्वक वापर
- प्रशिक्षित संगणक शिक्षकांची नियुक्ती करावी.
- पालक मेळावा सक्तीचा करावा व त्याची सत्यता पाहणी वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करावी.
- विद्यार्थ्यांना प्रशिक्षणात संधी उपलब्ध करून द्यावी.
- शाळाची कार्यपद्धतीची पाहणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी करावी.

❖❖❖

# व्यावसायिक शिक्षण – काळाची गरज

श्री. पी. के. कऱ्हाड
उपप्रचार्य – योगेश्वरी महाविद्यालय,
अंबाजोगाई, बीड

''शिक्षण ही एक ज्योत आहे, जी आपलं अंधारमय जीवन प्रकाशमय करते.'' अर्थात ज्याप्रमाणे अंधकारमयाचा शेवट होऊन प्रकाशमय वातावरण तयार होते त्या ज्योतीचे महत्त्व शिक्षणाशी निगडित आहे. मग शिक्षण पारंपरिक असो किंवा व्यावसायिक शिक्षण. व्यावसायिक शिक्षणामुळे गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे मनुष्यामध्ये विविध धंद्याचे शिक्षण मिळून, श्रम व शिक्षण यांची सांगड घालून जीवनासाठी, जीवनातून, निसर्गातून व उद्योगधंद्यातून शिक्षणाची व्यवस्था निर्माण होते. युनेस्कोच्या शिक्षण व्याख्येवरून 'व्यावसायिक शिक्षण म्हणजे व्यक्तीला सामाजिक जीवन स्वत:च्या पायावर जगण्यासाठी उत्पादित घटकांवर आधारित कौशल्य प्राप्त करून देणे होय.' ''व्यक्तीच्या आवडी व क्षमता लक्षात घेऊन (लिव्हिंग विथ अर्निंग) जीवनात स्थिर होण्याचे मार्गदर्शन कृतिशील शिक्षण म्हणजे व्यावसायिक शिक्षण होय.'' व्यावसायिक शिक्षणाच्या वरील व्याख्येवरून व्यावसायिक शिक्षणाची गरज भासते. मानवी जीवनात व्यावसायिक शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. व्यावसायिक शिक्षणामुळे मनुष्य स्वावलंबी बनतो.

**शिक्षण हे केवळ ज्ञानलालसेचे, बुद्धिविकासाचे साधन नसून व्यावसायिकदृष्ट्या बुद्धीचा विकास करणे होय.**

## व्यावसायिक शिक्षणाची गरज :

व्यावसायिक शिक्षणातून व्यवसायकौशल्य प्राप्त करून घेतल्यामुळे इतर शिक्षणाच्या पुढे जाण्याची संधी मिळते. वैज्ञानिक शाळांमुळे उद्योगधंद्यांचा विकास झाला. औद्योगिक विकास व भौतिक समृद्धी हे जीवनाचे मार्गदर्शक सूत्र बनण्याकरिता व्यावसायिक शिक्षणाची गरज बनत चालली आहे. वाढत्या उद्योगधंद्यांमध्ये व कारखान्यामध्ये कार्य करण्यासाठी कुशल कारागिरांची, तंत्रज्ञांची व यंत्रज्ञांची गरज पाहून व्यावसायिक शिक्षणाकडे अनेकांचा कल वाढू लागला आहे. व्यावसायिक शिक्षणातून माणसामध्ये प्रतिष्ठा प्राप्त होते. सामान्य व्यक्तीच्या, जनतेच्या बहुजन समाजाच्या गरजांचा विचार वाढीस लागतो. शिक्षण हे केवळ ज्ञानलालसेचे, बुद्धिविकासाचे साधन नसून व्यावसायिकदृष्ट्या बुद्धीचा विकास करणे होय. अनेक प्रकारच्या शिक्षणातील पदव्या प्राप्त केल्या म्हणजे व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त होत नसून व्यावसायिक शिक्षणाने व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास मदत होते. म्हणून हर्बट स्पेन्सरच्या What knowledge is of most worth या निबंधात म्हटल्याप्रमाणे प्रचलित शिक्षणाचा दोष म्हणजे त्यातील उपयुक्तता मूल्य हे कमी आहे. औद्योगिक क्रांतीमुळे समाजरचनेत फार मोठे स्थित्यंतर घडल्यामुळे जीवनाचे स्वरूप अंतर्बाह्य बदलून गेले. सामाजिक संस्था, शासन व्यवस्था व औद्योगिक संस्था यांचा व्याप वाढल्यामुळे व्यावसायिक शिक्षणाची गरज वाढत चालली आहे.

श्रमजीवी लोक शिक्षण घेण्याचा आपला हक्क बजावून बौद्धिक विकासाचे व आर्थिक उन्नतीचे स्वप्न पाहू लागतात. तेव्हा ते स्वप्न खरे सत्यात उतरण्याची किमया व्यावसायिक शिक्षण करते. तसेच बदललेल्या सामाजिक

परिस्थितीमुळे बुद्धिजीवी वर्गातील लोकांनाही उदरनिर्वाहासाठी उत्पादन कार्य व व्यवसायांकडे वळणे आवश्यक झाल्यामुळे व्यावसायिक शिक्षण दिशा देते. खाजगी व शासकीय संस्थांमध्ये नोकऱ्यांची गरज निर्माण झाल्यामुळे व्यावसायिक शिक्षण त्यास मदत करते.



आज आपण सर्वजण विज्ञानयुगात वावरत आहोत. जीवनाचे आज फार मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण झाले असून यंत्रनिर्मितेचे प्रमाण व यंत्राचा आपल्या जीवनावर वाढत चाललेला प्रभाव हा व्यावसायिक शिक्षणामुळेच वाढीस लागतो.

आजच्या युगाला यंत्रयुग असे म्हटले जाते. आर्थिक विकास हा उत्पादनावर अवलंबून असतो व उत्पादन वाढविण्याचे साधन म्हणून व्यावसायिक शिक्षणाकडे पहावे लागते. औद्योगिक व आर्थिक प्रगतीसाठी व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे. उत्पादन क्षमतेचा विकास हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिविकासातील एक महत्त्वाचा घटक मानून प्रत्येकाला व्यावसायिक शिक्षण हे सक्तीचे केले पाहिजे असे कार्ल मार्क्सनी म्हटले आहे. आज रशिया, अमेरिका, जपान, या देशामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व आहे. तसेच भारतात देखील महत्त्व वाढत चालले आहे. म्हणून व्यावसायिक शिक्षण महत्त्वाचे आहे. औद्योगिक विकास राष्ट्रीय संपत्तीचा विकास व उच्चतर उद्दिष्टे बाजूला सारून शुद्ध व्यावहारिक पातळीवर विचार केला तरी व्यावसायिक शिक्षणाची गरज किती वाढली हे सहज लक्षात येते. सर्वसामान्य माणूस हा उदरनिर्वाहासाठी, नोकरीसाठी शिक्षण घेतो. कलाशाखेचे शिक्षण हे नोकरीशिवाय अन्य बाबतीत उपयुक्त ठरत नसते. नोकऱ्या मिळू न शकल्यामुळे बेकारांची संख्या वाढत चालली आहे. परंतु व्यावसायिक शिक्षणाच्या जोरावर मानव एखादा व्यवसाय करून स्वत:च्या पायावर उभा राहून आर्थिक प्रगती करू शकतो. परंतु आजच्या व्यावसायिक शिक्षणाची कुचंबणा न होता, प्रत्येकाने काळाचा ओघ पाहून व्यावसायिक शिक्षण घेतले पाहिजे.

व्यावसायिक शिक्षणाकडे भारतीय तरुणांनी आवर्जून वळले पाहिजे कारण व्यक्तीमध्ये कामाच्या योग्य सवयी लावणे, कष्टाळूपणा, सहनशीलता, शारीरिक कार्यक्षमता इ. गुणांचा विकास होतो. मनुष्यामध्ये श्रमप्रतिष्ठेची भावना निर्माण होऊन बुद्धिजीवी व श्रमजीवी या वर्गातील अंतर कमी होईल. याचा तत्त्वाचा (work experience) पुरस्कार कोठारी आयोगाने सुद्धा केला आहे. तसेच व्यावसायिक शिक्षणातून वैज्ञानिक शिक्षण व विविध प्रकारच्या तांत्रिक विद्याशाखेचा विकास होतो. उदा. स्थापत्य, वैद्यक, अभियांत्रिकी इ. बुद्धिमत्तेच्या जोरावर व व्यावसायिक शिक्षणाच्या आधारे व्यक्ती संशोधन यंत्रनिर्मिती व तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता व्यावसायिक शिक्षणाची कास धरल्याखेरीज राष्ट्राची प्रगती होणार नाही.

थोडक्यात वरील विवेचनावरून एकच निष्कर्ष निघतो की, तो म्हणजे ज्ञान, बुद्धी, कल्पकता, प्रतिभा इ. शक्तीच्या विकासाची किमया पूर्ण करण्याकरिता व्यावसायिक शिक्षणाची काळाची गरज आहे. शेवटी 'कौशल्य बल साधनम् ।' याच अर्थाने म्हटले जाते.

❖❖❖

# चारित्र्य निर्मितीसाठी शिक्षक

कु. यु. जी. ठाकरे
प्राचार्या - स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय,
रूरल इन्स्टिट्यूट, अमरावती

**मूल्यशिक्षण ! मूल्यशिक्षण ! मूल्यशिक्षण !**

**भारतीय संस्कृतीचे विचार**

भारत हा देश कृषी प्रधान देश म्हणून प्रसिद्ध आहे. जगात भारतीय लोकांचे जीवनमान हे दोन संस्कृतीमध्ये गणले गेले आहे. एकप्रकारे एका नाण्याच्या दोन बाजूमध्ये गणले गेले आहे. नाण्याची पहिली बाजू म्हणजे आत्मा परमात्म्याशी जोडणारी आध्यात्मिक संस्कृती की ज्या संस्कृतीमुळे मानवी जीवनात योगसाधना, धारणा, ध्यानसमाधी व दिव्यदर्शन तसेच सत्य, अहिंसा, सदाचार, करुणा, दया, प्रेम, बंधुत्व, संस्कार, समर्पण, सद्‌भावना, विवेक, स्मरण, संस्कार, संकल्पना, संयम, समता, संतोष, पवित्रता, स्वावलंबन, स्वाभिमान, शांती व समाधान हे सर्व अनुभवास व वागण्यात येतात. मानवी जीवन आध्यात्मिक, सुखी व शांततामय बनते हेच जगाला भगवान सुदर्शन चक्रधारी श्रीकृष्ण भगवान यांनी सांगितले व दाखवून दिले. हे पौराणिक सत्य आहे हेच जगाला सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी सिद्ध करून दाखविले तसे एक सूत्र आहे की आत्मा परमात्म्याशी तादात्म्य करतो तेव्हा महात्मा बनतो. दुसरी बाजू म्हणजे शेती. मातीतून कृषिसंस्कृती की ज्या संस्कृतीमुळे भारतीय जीवनात अन्न, वस्त्र, निवारा, पशुपालन व वृक्षसंवर्धन इत्यादी बाबींची पूर्तता करण्यात आली व मानवी जीवन सुखी समृद्ध व आयुष्यमान बनले.

> **केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षण म्हणजे बालकाच्या व व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक आणि आध्यात्मिक विकास साधणारे माध्यम आहे.**
> **- महात्मा गांधी.**

आजची शिक्षणप्रणाली ही विद्यार्थीकेंद्रित आहे. विद्यार्थी शिक्षक आणि समाज असा हा त्रिकोण आहे. त्यामध्येच व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे. व्यक्ती, कुटुंब, शाळा हे सर्व घटक मिळून समाज तयार होतो. आपण समाजात राहतो, वागतो आणि वावरतो तर आपल्याला समाजाभिमुख शिक्षणाची गरज असते. आजच्या या आधुनिक काळात व्यक्ती ही परिपूर्ण शिक्षित झाली असे म्हणता येईल. चारित्र्यवान व्यक्ती बनविण्याकरिता मूल्यशिक्षणाची गरज आहे. तर सर्वप्रथम मूल्य म्हणजे काय हे आपण विचारात घेऊ.

**१. मानवी मूल्य - मानवी वर्तन**

औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक माध्यमातून मानवी मूल्य रुजविण्यास गेल्यास इतर मूल्य प्रस्थापित होण्यास व संस्कारित होण्यास आपोआपच हातभार लागतो. एकाच व्यक्तीच्या मनात दुसऱ्या व्यक्तीविषयी वाटणाऱ्या भावना ह्या विशिष्ट प्रकारच्या वर्तनातूनच प्रगट केल्या जातात व या प्रगट करण्यात आलेल्या भावनेमुळे पुन्हा याच प्रकारच्या क्रियेस प्रेरणा मिळत असते म्हणजेच भावनेमुळे क्रिया व क्रियांमुळे भावनांचे प्रगटीकरण घडून येते. असा यांच्यातील परस्पर संबंध आहे. डॉ. एकनाथ गावंडे यांनी मानवी मूल्यांचा शोध घेताना खालील सात मानवी मूल्ये संशोधित केली.

१. मानवी मूल्य - मानवी वर्तन कार्यसंस्कृती ही वर्तनातून प्रगट होते. कार्यसंस्कृती म्हणजे कामाच्या चांगल्या सवयी होय.

२. सत्यता - सत्याचा सतत पाठपुरावा करणे.
३. विधायकता - चांगल्या कामात मदत करणे.
४. कर्तव्यदक्षता - सोपविलेले काम वेळेवर करणे.
५. संयम - स्वत:चा मनावर ताबा ठेवणे
६. दया - दुसऱ्यावर प्रेम करणे
७. त्याग - नि:स्पृह वृत्तीने मदत करणे.
८. शास्त्रीयदृष्टी - समस्येची शास्त्रीय कारणमीमांसा करणे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेने औरंगाबाद येथे घेतलेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात चारित्र्य निर्मितीसाठी खालील मूल्यांची निवड केली.

१. स्वाधीनता २. कर्तव्यदक्षता ३. श्रमनिष्ठा ४. समता ५. विज्ञाननिष्ठा ६. सूचिता ७. बंधुता ८. भुतदया ९. निसर्गप्रेम १०. माता-पिता व गुरूविषयी आदर

## २) घटनात्मक मूल्य

प्रत्येक देशाला स्वत:ची स्वतंत्र घटना आहे. त्यांनी विशिष्ट मूल्यांचा समावेश केलेला असतो व त्यांना मार्गदर्शक तत्त्वे देखील असतात. त्यांना राष्ट्रीय मूल्य किंवा घटनात्मक मूल्य असे म्हणतात. उदा. भारतीय संविधानात खालील मूल्यांचा समावेश केलेला दिसून येतो. लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षता, समानता, न्याय, बंधुता, स्वातंत्र्यता.

## ३) सामाजिक मूल्य

प्रत्येक देश व त्या देशतील संस्कृती त्याला अनुसरून काही मूल्ये जोपासतो किंवा त्यांचे संवर्धन व संरक्षण करण्याचा प्रयत्न करतो.

## ४) व्यावसायिक मूल्य

अनेक प्रकारचे व्यवसाय अस्तित्वात आहेत व प्रत्येक व्यवसायाची स्वतंत्र मूल्ये आहेत. उदा. शिक्षकी व्यवसायाची खालील मूल्ये दिसून येतात.

१. ज्ञानलालसा २. कर्तव्यदक्षता ३. नियमितपणा ४. श्रद्धा




## ५) धार्मिक मूल्य

प्रत्येक धर्माला स्वतंत्र अधिष्ठान असून स्वतंत्र सिद्धांत व नियम आहेत. प्रत्येक धर्माची स्वतंत्र मूल्ये असतात. उदा. बौद्ध धर्माने खालील मूल्ये नमूद केली आहेत.

१. प्रज्ञा २. शील ३. करुणा. काही मूल्ये धर्माला समावेशक असतात तर काही त्या धर्माची वैशिष्ट्ये असतात.

## ६) सौंदर्याधिष्ठित मूल्य

वाङ्मय व कला (पेंटिंग, कार्व्हिंग, कला इ.) यांचे निकष व नियम ठरलेले आहेत. त्याचा शोध घेऊन ती मूल्ये ठरविता येतील.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. विद्यार्थी हा समाजाचा घटक आहे. म्हणून आज उच्च माध्यमिक मध्ये ११वी १२वी साठी समाजाच्या दृष्टीने मूल्यशिक्षणाची

गरज आहे. केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षण म्हणजे बालकाच्या व व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक आणि आध्यात्मिक विकास साधणारे माध्यम आहे. - महात्मा गांधी.

शिक्षण म्हणजे बालकाच्या किंवा व्यक्तीच्या शरीर मस्तिष्क आणि आत्म्याच्या अंतर्गत सर्वोत्तम गुणांचा विकास होय. स्वामी विवेकानंद म्हणतात की माणूस घडतो ते शिक्षण. यासाठी चारित्र्य संवर्धनाची गरज आहे. महात्मा गांधीजींनी व्यक्ती व राष्ट्राच्या चारित्र्यास अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. शिक्षणातून बालकाच्या, आचरणात, समाजवर्तनात उच्च प्रतीचे गुण विकसित करावे. बालकास स्वीकारणीय व अस्वीकारणीय वर्तनातील फरक लक्षात यावा त्याच वेळेस राष्ट्रीय चारित्र्य निर्माण होईल.

## शिक्षक

१. स्वत:चा स्वत:वर विश्वास असणे ही आत्मविकासाची पहिली पायरी. शिक्षणातूनच स्वत:चा विश्वास विकसित व्हावा.

२. आत्मज्ञानाबरोबर आत्मविश्वास व आत्मनिर्भरता यांचा विकास शिक्षणाने करणे.

३. शिक्षण हे व्यवहार्य असावे ज्यामुळे मानवाच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होतील.

४. चारित्र्य संवर्धन व नैतिकतेच्या विकासासाठी शिक्षण साहाय्यभूत ठरावे.

५. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट माणूस निर्माण करणे हे होय.

६. शक्तिक्षमता व सामर्थ्य हा शिक्षणाचा हेतू असावा.

७. शिक्षणापासून विश्वबंधुतेची भावना जोपासली जावी.

## महाराष्ट्र शासनाने खालील १० मूल्ये निश्चित केली आहेत.

१. राष्ट्रभक्ती

२. राष्ट्रीय एकात्मता

३. सर्वधर्म सहिष्णुता

४. स्त्री-पुरुष समानता

५. श्रमप्रतिष्ठा

६. वैज्ञानिक दृष्टिकोन

७. सौजन्यशीलता

८. संवेदनशीलता

९. वक्तशीरपणा

१०. नीटनेटकेपणा

वरील मूल्यांमधून व्यक्तिविकास, समाजविकास, राष्ट्र विकास याची मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांत रुजवणूक व्हावी असा उद्देश आहे. शिक्षण आणि मूल्ये यांचा अन्योन्यसंबंध आहे. मूल्याविषयी कार्यात्मक स्पष्टीकरण म्हणजे समाज आणि व्यक्ती यांच्या यथायोग्यरीत्या अन्योन्यसंबंध प्रस्थापित करणे आणि निकोप व्यक्तिमत्त्व व निकोप समाज निर्माण करणे होय. ज्याप्रमाणे उद्योजकाच्या अंगी गुण असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शिक्षक हा सुद्धा एक सृजनशील निर्माता होय. त्याकरिता खालील गुणांचा विकास होऊन व्यक्ती ही चारित्र्यसंपन्न बनावावी.

१. ज्ञान २. चारित्र्यसंपन्न ३. दूरदृष्टी ४. सृजनशील ५. जोखीम पत्करण्याची तयारी ६. प्रामाणिकपणा ७. व्यवहार्यता ८. तडजोडवृत्ती ९. संयमशीलता १०. देशभक्ती.




## नीतिमत्ता विकास

चारित्र्य संपन्नतेसाठी नीतिमत्ता विकास महत्त्वाचा आहे. नैतिकतेतूनच उद्याचा भावी शिल्पकार जन्माला येतो. आजच्या युगात चारित्र्यसंपन्न व्यक्ती असणे गरजेचे आहे. आपला कृषिप्रधान देश हा भूमातेचा देश म्हटले जाते. तिचे संरक्षण व संवर्धन आपल्यालाच करणे गरजेचे आहे. निसर्ग कोपला असे उद्‌गार सहजच आपल्या तोंडावाटे बाहेर पडतात पण आपण त्याचा सूक्ष्म रीतीने विचार करीत नाही. वातावरणात होणारा बदल वाढतो. तापमान, अवेळी पाऊस, ओला दुष्काळ, सुका दुष्काळ, वाढत्या पर्यावरणाचा ऱ्हास, प्रदूषण, जंगले कटाई याकरिता आज मूल्यशिक्षणाची काळाला गरज आहे. आपण २०२० व्या शतकात आनंदात जीवन जगू का ? हा एक प्रश्नच डोळ्यासमोर उरला आहे. त्याकरिता भावी पिढी वाढवायची असेल तर मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. कृषिप्रधान देशात प्राचीन काळापासूनच हिंदू संस्कृती गाईला दैवत मानत आहे.

## पशुसेवा, पशुदया

### कलम नं. १

गावातील १०० टक्के लोकांनी मांसाहार सोडून (सेवा व अहिंसा) दिल्यास निसर्गाचे पर्यायाने पर्यावरणाचे संरक्षण होईल. परिणामत: गायी कापणे बंद होईल.

### कलम नं. २

गावातील गायी कापणाऱ्या विशिष्ट समाजातील मुला-मुलींना गायीचे गोमूत्र - शेण इत्यादीपासून औषधी गोळ्या व बाटलीबंद औषध आयुर्वेदिक दवाखान्यात पोहोचविण्याची सोय करून द्यावी. त्याबद्दल त्यांना सोय करून मासिक मानधन देण्यात यावे. त्यासाठी नि:शुल्क प्रशिक्षण द्यावे. त्यातूनच चारित्र्यवान व्यक्ती तयार होतो.

### कलम नं. ३

प्रत्येक गावात गायीच्या शेणापासून सेंद्रिय खते, उत्तम गांडुळ खत इत्यादी गावातील तळागाळातील लोकांकडून अनुदानावर सेंद्रिय खत तयार करून द्यावे. तयार झालेले सेंद्रीय खत अनुदानावर शेतकऱ्यांना देण्यात यावे.

### कलम नं. ४

गावातील गायी चारणारे व गायीचे पालन-पोषण करणारे, सेवा करणारे पशुसेवक समजून त्यांना मासिक वेतन देण्यात यावे.

### कलम नं. ५

गावातील गायी गोमाता मृत्युमुखी पडल्यास धर्म व्यवस्थेप्रमाणे त्यांची अंत्यविधी करून सोईनुसार गावात गोमाताची दफनभूमी करण्यात यावी.

नेहमी चांगले संस्कार मानवाला चांगले घडविते. म्हणजेच जर संस्कारक्षम असेल तर पशुदया त्यामध्ये समाविष्ट होईल. याकरिता चारित्र्यसंपन्नतेची गरज असते.

१. गाव २. तालुका ३. जिल्हा यामध्ये खेड्यांकडून शहरामध्ये चारित्र्यशिक्षणाची संकल्पना मांडता यावी तसेच खेडी स्वयंपूर्ण होतील. परिणामत: आपल्या भूमातेचे रक्षण होईल. समृद्धतेकडे वाटचाल करता येईल.

❖❖❖

# माझ्या कल्पनेतील आदर्श शिक्षण पद्धती

प्रा. डॉ. श्रीकांत गो. सबनीस
सेक्रेटरी, शिक्षण मंडळ, कराड

'प्रचलित शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल झाला पाहिजे', हे वाक्य स्वातंत्र्योत्तर काळात आपण अनेकवेळा ऐकले आहे. स्वतंत्र भारताचे शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी आजवर अनेक आयोग नेमले गेले. त्यामध्ये डॉ. राधाकृष्णन, डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगांचा उल्लेख करावा लागेल. तद्नंतर १९८६ मध्ये 'राष्ट्रीय धोरण पत्र' अधिकृतरीत्या जारी करण्यात आले. त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढे त्यातही कालपरत्वे बदल करण्यात आले. असे आणखीही बदल होत राहतील. तसे होत राहणे सयुक्तिक आहे. कारण नदी वाहता वाहताच जशी शुद्ध होते तसे शैक्षणिक धोरण प्रवाहित होण्यातच आदर्श शैक्षणिक धोरणाची बीजे साठवली गेली आहेत.

एवढे सगळे घडत असूनही आजच्या शैक्षणिक आकृतीबंधामुळे शिक्षणक्षेत्रातील समस्या संपलेल्या नाहीत, त्यांच्या कारणांचा विचार शिक्षणतज्ज्ञांच्या मनात सतत चालू असतो. शिक्षणाचे खरे प्रयोजन काय आहे ? याबद्दल प्रत्येकाच्या मनात स्पष्टता असायला हवी. व्यक्तीला कार्यक्षम बनवेल व यशस्वी जीवन जगण्याची दृष्टी देईल अशा शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज आहे. शिक्षणामुळे माणसाला आपल्या पुढील समस्यांचे निराकरण करता आले पाहिजे. म्हणून शिक्षणामध्ये चिंतनशीलता पाहिजे. शिक्षणाने माणसांची आकलनशक्ती, ग्रहणशक्ती व धारणाशक्ती वाढली पाहिजे. केलेल्या अभ्यासावर स्वतंत्र विचार करता आला पाहिजे. त्यातून मनात काही प्रश्न निर्माण झाले पाहिजेत. त्यांची उत्तरे शोधण्याची क्षमता शिक्षणाने माणसात निर्माण केली पाहिजे. समजलेला अभ्यास स्वत:च्या शब्दात मांडता आला पाहिजे. मिळालेल्या शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास होणे अपेक्षित आहे.

शिक्षणामुळे माणसाला आपल्या पुढील समस्यांचे निराकरण करता आले पाहिजे. म्हणून शिक्षणामध्ये चिंतनशीलता पाहिजे. शिक्षणाने माणसांची आकलनशक्ती, ग्रहणशक्ती व धारणाशक्ती वाढली पाहिजे.

आपल्या देशात धार्मिक, वांशिक व सांप्रदायिक विविधता आहे. त्यामुळे इथे सांस्कृतिक विविधता असणे अपरिहार्य आहे. ही वस्तुस्थिती स्वीकारून मिळालेल्या शिक्षणाने माणूस आपसातील भेदाप्रती सहिष्णू बनला पाहिजे. असे घडले तरच भेदावर आधारलेले सामाजिक संघर्ष कमी होऊ शकतील. राष्ट्रप्रेम वाढीस लागेल. सुशिक्षित माणूस हा सुसंस्कृत आहे, असे चित्र समाजाला दिसले पाहिजे. पण आज दिसते काय ? तर संघटित गुन्हेगारी, आर्थिक घोटाळे यात तथाकथित सुशिक्षितांचा सहभाग सर्वांच्या पुढे येतो. एवढंच नव्हे तर दहशतवाद घडवून आणण्यात उच्चशिक्षित तंत्रज्ञांचा सहभाग दिसतो. पैशाच्या हव्यासापोटी काही प्रतिष्ठित मंडळी असभ्य वर्तन करताना दिसतात. समाजात दिसत असलेली नैतिक मूल्यांची घसरण ही बाब चिंतेची बनली आहे. यावर उपाय म्हणून ''मूल्याधिष्ठित शिक्षणाचा'' आग्रह धरला जातो. कारण मूल्यविरहित ज्ञान हे समाजाच्या अस्तित्वासाठी घातक आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे.

आपण आपली पारंपरिक शिक्षण पद्धती, स्वातंत्र्यपूर्व कालातील गुलामगिरीमुळे विसरलो आहोत. तसे होऊ देता कामा नये. मूल्याधिष्ठित शिक्षणाचा अंगीकार करून आपण साऱ्या जगापुढे आदर्श शैक्षणिक प्रक्रियेचा वस्तुपाठ ठेवला पाहिजे. सगळ्या देशात आज खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (खाउजा) याचे वारे वाहत आहेत. या परिस्थितीत

भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पहात आहे. आलेल्या या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता तरुणात निर्माण करणारी शिक्षणव्यवस्था असली पाहिजे. आपले विद्यार्थी जगातील कोणत्याही देशात गेले तरी आपल्या बुद्धीची चमक दाखवून जगात भारताची कीर्तीध्वजा फडकवत ठेवतील असे शिक्षण त्यांना मिळाले पाहिजे.

वस्तुत: शिक्षण हे मनुष्य शक्तीच्या विकासाचे साधन आहे. माणसाचे शरीर, मन आणि बुद्धी यांचा विकास शिक्षणाने झाला पाहिजे. अशा शिक्षणाने माणसाला स्वत:ची ओळख होऊ शकेल. त्याच्या मनात स्वत:विषयीच नव्हे तर विश्वाविषयी जिज्ञासा निर्माण झाली पाहिजे. मी म्हणजे कोण ? विश्व कसं निर्माण झालं याची उत्तरे शोधता आली पाहिजेत. केवळ अर्थार्जनासाठी व्यक्तीला तयार करणारे शिक्षण पुरेसे नाही. विख्यात तत्त्वज्ञानी सॉक्रेटीस म्हणाले होते की, ''Know thy self'' हेच खरं शिक्षण. म्हणजे 'स्व' ची ओळख म्हटलं की काहीतरी गूढ आहे असे वाटण्याचे कारण नाही. 'स्व' ची ओळख म्हणजे स्वत:मधील क्षमतांची जाणीव होते. स्वत:मधील गुण ओळखणे, स्वत:मधील बलस्थाने समजणे. इतका साधा, सरळ अर्थ 'स्व' च्या ओळखीत अंतर्भूत आहे. एकदा माणसाला स्वत:ची ओळख झाली की त्याला आपले गुणदोष कळतील. मग गुणांचा गुणाकार करून व दोषांचा भागाकार करून आपलं व्यक्तिमत्त्व निर्दोष करता येईल. असे घडले गेले की, विद्यार्थ्याला स्वत:च्या जीवनाची इमारत आपल्या अंगीभूत गुणांवर बांधता येईल. दुसऱ्याशी तुलना करत जगणं व आपण त्याचे सारखे नाही म्हणून न्यूनगंड बाळगणे असे होणार नाही. आज माणसे तुलना करत जगतात हा अयोग्य शिक्षणाचा परिपाक आहे.

उमलत्या वयातील प्रत्येक मुलगा अगर मुलगी सर्वसाधारण (समान) बुद्धिमत्ता घेऊन जन्माला आलेले असतात. असं असलं तरी जीवनाच्या लढाईत काही मुले पुढं जातात व काही मागे पडतात. याचे मुख्य कारण म्हणजे अयोग्य क्षेत्राची निवड, कोणाची बुद्धी कोणत्या क्षेत्रात चालेल हे त्याच्या अंगभूत गुणांवर अवलंबून असते. पण 'स्व' ची ओळख न झाल्यामुळे एखादा भला माणूस कुठल्या तरी नावडत्या क्षेत्रात जाऊन पडतो. मग जीवनभर पश्चाताप करण्याची वेळ येते. त्याचं जीवन निरस होऊन जाते. म्हणून पालकांनी अगर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारे कार्यक्षेत्र मिळवून देण्यास मार्गदर्शन करावे. केवळ एखाद्या व्यावसायिक क्षेत्राची चलती आहे, म्हणून त्यात आपल्या पाल्यांना ढकलून देऊ नये. त्यातून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भंग होतो.

प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:चे असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. म्हणून त्याला मिळत असलेल्या शिक्षणातून त्याचं शरीर, मन व बुद्धी यांचा संतुलित विकास साधला गेला पाहिजे. असं घडलं तरच कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद त्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता पंचमुखी व्यक्तीविकास हे सूत्र शिक्षणातून साकार व्हायला पाहिजे. पंचमुखी व्यक्ती विकासात शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक व अध्यात्मिक विकास होणे अपेक्षित असते. अर्थात हे शिक्षण केवळ शाळा-कॉलेजमधून मिळेल असे नव्हे तर त्याची सुरुवात बालवयातील संस्कारापासून होत राहते. निरोगी व कार्यक्षम शरीर हे सर्वांगीण व्यक्ती विकासाचे प्रमुख अंग आहे. म्हणून अभ्यासक्रमात योग शिक्षणाचा अंतर्भाव केला पाहिजे. योगासने व प्राणायाम यांच्या साध्या अभ्यासाने माणसाला आरोग्य प्राप्त होते. एवढंच नव्हे तर त्यांच्या मन व बुद्धीचा विकास होतो. स्वभावत:च माणसाचे मन चंचल आहे. योगामुळे ते संयमित व एकाग्र होते. त्यामुळे अभ्यास करताना मन एकाग्र करण्याची कला अवगत असली पाहिजे. कारण Concentration of mind is the law of success.

योग या शब्दात युज हा धातू आहे. युज म्हणजे जोडणे. तेव्हा योग साधनेतून व्यक्तीचे समाजाशी व पर्यायाने विश्वाशी नाते जोडले जाते. आज माणसे शिकलेली आहेत. पण त्यांची मने आक्रसलेली आहेत. समाजाशी त्यांना काही घेणे-देणे नाही असे

**'स्व' ची ओळख न झाल्यामुळे एखादा भला माणूस कुठल्या तरी नावडत्या क्षेत्रात जाऊन पडतो. मग जीवनभर पश्चाताप करण्याची वेळ येते. त्याचं जीवन निरस होऊन जाते. म्हणून पालकांनी अगर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारे कार्यक्षेत्र मिळवून देण्यास मार्गदर्शन करावे.**

वागतात. मन संकुचित असण्याचे परिणाम आज समाज भोगत आहे. प्रत्येक माणसाचे मन जन्मत: मुक्त असते. पण मुक्त म्हणजे स्वैराचारी किंवा सैरभैर नव्हे. मन मुक्त असले तरी ते अनिर्बंध नसते. त्या मुक्त मनाला आंजारून-गोंजारून कामाला लावल्यास मनाची महाप्रचंड शक्ती अनुभवास येते. आता या मनाच्या पलीकडे बुद्धीचे स्थान आहे. योगामुळे मन आणि बुद्धी बलवान होतात. एवढंच नव्हे तर मन व बुद्धीचं ऐक्य होते. या ऐक्याला ज्ञानार्जनामध्ये फार महत्त्व आहे. हे ऐक्य नसेल तर मन-बुद्धीमध्ये संघर्ष होतो. त्यातून विनाकारण मानसिक ताण निर्माण होतो. त्यातून माणसाची एकाग्रता कमी होते. त्यातून धारणाशक्ती हळूहळू कमी होते. या सगळ्याचा परिपाक म्हणून योग्य-अयोग्याची निवड करणं कठीण होऊन बसतं. मग माणसाची निर्णयशक्ती कमी होते. याचा परिणाम माणसाला आयुष्यभर भोगावा लागतो. म्हणून मन, बुद्धीचे ऐक्य महत्त्वाचे आहे. त्यातून जाणीवशक्ती, विचारशक्ती व तर्कशक्ती विकसित होते. मग माणसाचा बुद्ध्यांक (I.Q.) वाढतो. अशा माणसाला जीवनात येणारं आव्हान सहज पेलता येणं शक्य होतं. ही माणसं स्वत:च्या कोशात कधी रुतून बसत नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात परिपक्वता येते. तडजोड करून बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे शक्य होते. छ. शिवाजी महाराजांनी प्रसंगी मोगलांशी तह केला. कारण यशस्वी माघार घेण्यात परिपक्वता आहे. व्यक्तिमत्त्वात लवचीकता असेल तर माणसे यशाची शिखरे सहज पादाक्रांत करू शकतात.

***Eight Types of Quotients***

1) *Intelligence Quotient (I.Q.)*
2) *Emotional Quotient (E.Q.)*
3) *Understanding Quotient (U.Q.)*
4) *Passion Quotient (P.Q.)*
5) *Courage Quotient (C.Q.)*
6) *Communication Quotient (COM.Q.)*
7) *Spiritual Quotient (S.Q.)*
8) *Financial Quotient (F.Q.)*

संपन्न व्यक्तिमत्त्वाकरिता केवळ बुद्ध्यांक वाढून चालत नाही. तर त्याच्या जोडीला भावनांक (Emotional Intelligence) सुद्धा वाढावा लागतो. हृदय हे भावनांचे केंद्र आहे. हृदयाच्या विशालतेमुळे संत गाडगे महाराज, महात्मा गांधी, पूजनीय बाबा आमटे अशी व्यक्तिमत्त्वे माणसांच्या हृदय सिंहासनावर विराजमान झाली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अध्यात्मिक विकासाचेही सुंदर मिश्रण दिसून येते. थोडक्यात पंचमुखी व्यक्ती विकासामुळे मानवाचा महामानव होतो.

आपण आजची प्रचलित शिक्षणपद्धती पाहिली की, माणूस घडविणाऱ्या शिक्षणापासून आपण खूप दूर आहोत याची खंत वाटते. शाळा-कॉलेजमधील शिक्षणाने तर विद्यार्थ्यांना केवळ परिक्षार्थी करून टाकले आहे. परीक्षेतील मार्कस् म्हणजेच सर्व काही असे समीकरण तयार झाले आहे. त्या मार्कांचा ज्ञानाशी व ज्ञानाचा जीवनाशी काही संबंध असतो याचं विस्मरण झालं आहे. मेडिकल व इंजिनिअरिंग म्हणजेच उत्तम करियर समजून मार्कांसाठी घोकंपट्टी करीत राहणे हाच एक स्वाध्याय होऊन बसला आहे. मार्कांकरिता घोका व परीक्षेत जाऊन ओका आणि मोकळे व्हा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला जातो. पण खरं म्हणजे परीक्षेतील मार्कस् म्हणजे सर्वस्व नव्हे. शिक्षणाने माणसाची आकलन शक्ती वाढली पाहिजे. तसे झाले तरच त्याला स्वत:चे व बाह्य परिस्थितीचे आकलन होईल. त्याच्या लक्षात येईल की, समाजाच्या उन्नतीमध्येच आपले सौख्य लपलेले आहे. असा माणूस कोणाप्रती द्वेषभाव बाळगणार नाही. शिक्षणाने असा माणूस समाजसन्मुख होईल.

२१व्या शतकातील आव्हाने पेलता येण्यासाठी उत्तम शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले पाहिजे. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. हे लक्षात घेतलं तर चीनच्या स्पर्धेत भारतीय तरुणांचा हा एक प्लस पॉइंट आहे. आजच्या युगात संगणक व संदेशवहन यामुळे ज्ञानप्राप्ती सुलभ झाली आहे. त्याचा परिपाक म्हणून अध्ययन व अध्यापन यांच्या परंपरागत कल्पना बदलत चालल्या आहेत. सन २०२० पर्यंत जवळजवळ निम्मे जग Internet च्या जाळ्यात ओढले जाईल. माहितीचे मायाजाल उपलब्ध होईल. पण त्या माहितीचे रूपांतर ज्ञानात करता आलं पाहिजे. तरच शिक्षणाने माणसात परिपक्वता येईल. ही परिपक्वता माणसाचे व्यक्तिमत्त्व संपन्न करेल. तसे झाले नाही तर भावनिक प्रक्षोभ वाढेल. व्यक्तिमत्त्वामध्ये असंतुलन होईल. तसे न होण्याकरिता मनाला व बुद्धीला योग्य वळण जावले पाहिजे. मनाची प्रसन्नता टिकविता आली पाहिजे. असं व्यक्तिमत्त्व घडलं तरच जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहता येईल. आपण घेत असलेल्या शिक्षणाने माणसाला पूर्णत्व आले पाहिजे. असे पुरुषोत्तम बनविणारे शिक्षण आपल्या तरुण पिढीला मिळाले पाहिजे.

❖❖❖

# शिक्षण
## वास्तव व अपेक्षा

श्री. आशिष प्र. इंगळे
जनता हायस्कूल, पूर्णानगर, ता. भातकूली, जि. अमरावती
संपर्क : ९४०३००१८९३

देशाची प्रगती ही त्याच्या गुणवान नागरिकांमुळेच होत असते आणि हे गुणवान नागरिक शिक्षणातून निर्माण केले जातात. म्हणून नागरिक निर्माण करणारे शिक्षक ज्यांना 'सामाजिक इंजिनिअर' आणि 'मानवजातीचे निर्माते' असे संबोधान वापरून गौरविले जाते ते शिक्षकही गुणवान असणे आवश्यक आहे.

डॉ. राधाकृष्णन् यांनी म्हटल्याप्रमाणे -

"The teacher's place in the society is of vital importance. He acts as the pivot for the transmission of intellectual traditions and technical skills from generation to generation and helps to keep the lamp of civilization burning."

म्हणजेच शिक्षक हा समाजाचा कणा असल्यामुळे संपूर्ण समाजाची उभारणी करण्याचे महान कार्य शिक्षकांना करावयाचे आहे. शिक्षकी व्यवसाय ही एक कला व शास्त्र या दोघांचा संगम असल्यामुळे शिक्षकाला केवळ ज्ञान ग्रहण करून चालणार नाही तर ते ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्येही आत्मसात करावी लागतील. म्हणजेच tricks of trade त्याला शिकाव्या लागतील.

शिक्षण ही सातत्यपूर्ण आणि सर्वसमावेशक अशी प्रक्रिया असल्यामुळे तिच्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलायची आहेत.

### १. राष्ट्रीय एकात्मता :

भारत हा बहुभाषिक आणि बहुसंस्कृती असलेला देश असून लोकशाही राज्यपद्धतीचा आपण स्वीकार केलेला आहे. ही लोकशाही टिकवून त्यातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे कार्य शिक्षकाला शिक्षणाच्या माध्यमातून करावे लागणार आहे. यासाठी शिक्षण हे लोकशाही समाजवादाचा, धर्मनिरपेक्षततेचा पुरस्कर्ता असणारे हवे. यासाठी अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल करून लोकशाहीचे संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणारा अभ्यासक्रम तयार करावयाचे उद्दिष्ट शिक्षणासमोर आहे. २१व्या शतकाची नवी आव्हाने जसे - ICT, e-learning, Tele-conferencing, virtual classroom यासारखी आव्हाने पेलून राष्ट्रीय एकात्मतेसाठी ICT चा उपयोग करून घ्यावा लागणार आहे.

### अध्ययनाचे आधारस्तंभ

१. ज्ञानासाठी / माहितीसाठी अध्ययन
(Learning to know)

२. कर्मासाठी अध्ययन
(Learning to do)

३. वसुधैव कुटुंबकम्‌साठी शिक्षण
(Learning to live together)

४. अस्तित्वासाठी/मानवतेसाठी शिक्षण
(Learning to be)

### २. अध्ययनाचे चार स्तंभ :

आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचा विचार करण्यासाठी एक आयोग नेमण्यात आला. या आयोगाचे अध्यक्ष होते जॅक्स डेलार्स. डॉ. डेलार्स यांनी १९८६ मध्ये 'Learning : The Treasure within' या नावाने आयोगाचा अहवाल सादर केला. या अहवालात त्यांनी जागतिक शिक्षणासाठी (Global Education) अध्ययनाचे चार स्तंभ नमूद केलेले आहेत. या चार स्तंभांवर संपूर्ण शिक्षण प्रक्रियेची भिस्त आहे. अध्ययन हे बालकामध्येच असलेली मौल्यवान गोष्ट आहे. तिचा विकास शिक्षणाने करावा असा या नावाचा मतितार्थ.

हे चार स्तंभ भारतातील वैदिक पद्धतीवर आधारित असून ज्ञान, कर्म, सहजीवन आणि 'तत् तत्त्वं असि (तत्त्वम्सि)' हे चार योग सांगणारे आहेत. भगवान श्रीकृष्णाने गीतेत केलेला बोध व्यक्तीला स्वत:ला ओळखण्याचा संदेश देतो. 'Know thy self' किंवा 'Know yourself' हेच तत्त्व डेलार्स आयोगाने सांगितलेले आहे. ज्ञानयोग, कर्मयोग, सहजीवन आणि माणूस म्हणून जगण्यासाठी शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. आज समाजात सर्वत्र भ्रष्टाचार उफाळून वर येत आहे. अनागोंदी कारभाराला तर लगामच नाही. अशा विपरित परिस्थितीत माणसाला माणूस म्हणून जगण्याचे आणि जगविण्याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षकांना शिक्षणाच्या माध्यमातून करावयाचे आहे.

## ३. समाजामध्ये निर्माण होणारे ताणतणाव

जागतिक शिक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ. डेलार्स यांनी अहवालाच्या तात्त्विक बैठकीमध्ये "Education : The Necessary Utopia" 'शिक्षण हे (गरजेचे) सुखस्थान' असल्याचे नमूद करून आधुनिक समाजामध्ये निर्माण होणाऱ्या विविध ताणतणावांचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. हे ताणतणाव म्हणजे -

१. जागतिक आणि स्थानिक
२. सार्वत्रिक आणि वैयक्तिक
३. पारंपरिकता आणि आधुनिकता
४. दीर्घकालिक आणि तात्कालिक विचार
५. स्पर्धा आणि संधीची समानता
६. ज्ञानाचा प्रस्फोट आणि मानवाच्या मर्यादा

हे सर्व ताणतणाव सामान्यपणे शिक्षणाला आणि विशेषत: शिक्षकाला प्रभावित करणारे आहेत. सर्वत्र ज्ञानाचा प्रस्फोट होत असला तरी सर्वच क्षेत्रातील ज्ञान मानवाच्या आवाक्यात येणे अशक्य आहे. मानवाच्या ज्ञानग्रहण क्षमता ह्या काही प्रमाणात मर्यादित आहेत. त्याला आपल्या क्षमतेनुसार ज्ञान ग्रहण करावे लागते. परंतु शिक्षणाच्या माध्यमातून या क्षमतांचा विकास करता येतो. तसेच संख्यात्मकता व गुणात्मकता यामध्येही संघर्ष आहे. शिक्षणातून संख्यात्मकतेपेक्षा गुणात्मकतेला प्राधान्य देऊन पारंपरिकता आणि आधुनिकता यांचा मेळ घालावा लागणार आहे. यासाठी शिक्षकाने शिक्षणाच्या केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता आधुनिक आणि पर्यायी शिक्षणव्यवस्थेचा (tele-conferencing, e-learning, virtual classroom) अंगीकार करून या दोघांचा समन्वय साधल्यास निर्माण होणारे ताण कमी करता येऊ शकेल. सार्वत्रिकतेचा विचार करताना शिक्षण सर्वांपर्यंत कसे पोहचेल याचा विचार करून तसेच व्यक्तीच्या अभिक्षमता, अभिरुची, कौशल्ये यांचा विकास करून व्यक्तिमत्त्व विकासाला हातभार लावण्यासाठी प्रयत्नही शिक्षक शिक्षणाला करावे लागणार आहे.

थोडक्यात, भविष्यात निर्माण होणारी ही आव्हाने पेलण्यासाठी शिक्षकाने सज्ज होऊन Teachers are not born but made हे तत्त्व अंगीकारावे आणि उत्तमोत्तम निर्मिती करावी.

## ४. आधुनिकता आणि पारंपरिकता यातील संघर्ष

आजमितीला जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग जवळ आले. त्यामुळे संस्कृतीची देवाणघेवाण सुरु झाली. आंतरक्रिया वाढल्या. याचा परिणाम शिक्षणावर झाला. पारंपरिक पद्धतीने दिले जाणारे शिक्षण जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवू लागले. असे असले तरी सांस्कृतिकदृष्ट्या पारंपरिकता आणि आधुनिकता यातील संघर्ष घातक ठरु पाहात आहे. आपण आपली संस्कृती विसरून पाश्चात्य संस्कृतीचा अंगीकार करतो आहे. कोणत्याही संस्कृतीतील चांगले ते जरूर घ्यावे. उत्तमाचे अनुकरण करावे परंतु अंधानुकरण मात्र करू नये. आजचे चित्र नेमके अंधानुकरण केले जात असल्याचे दिसत आहे. मुलांवर योग्य ते संस्कार करून अंधानुकरण टाळण्यासाठी शिक्षणाला पुढाकार घ्यावा लागणार आहे. शिक्षक शिक्षणातून संस्कृतिसंवर्धन करणारे शिक्षक निर्माण केल्यास असे शिक्षक मुलांमध्ये संस्कृतीची मूल्ये रुजविण्यास सक्षम ठरु शकतील आणि पारंपरिकता व आधुनिकतेचा मेळ घालून शिक्षणाला उच्च दर्जा प्राप्त करून देऊ शकतील म्हणजे शिक्षक शिक्षणाला अत्यंत डोळसपणे आणि विचारपूर्वक शिक्षणकृतीचा अवलंब करावा लागेल.

## ५. समृद्ध भौतिक सुविधा

सध्याचे युग हे ज्ञान व तंत्रज्ञानाचे, संप्रेषणाचे युग असल्यामुळे भौतिक सुविधा पारंपरिक राहून चालणार नाही. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी आधुनिक सुखसोयी व सज्जता आवश्यक असते. परंतु भारतासारख्या विकसनशील देशामध्ये ज्ञानाच्या प्रस्फोटाबरोबर लोकसंख्येचाही प्रस्फोट होत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात भौतिक सुविधा पुरविणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत ज्ञानार्थ्यांच्या गरजा भागविण्यासाठी शिक्षक शिक्षणाला तारेवरची कसरत करावी लागेल हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. virtual classroom चा वापर करण्यासाठी आधुनिक साधने व तंत्रांनी युक्त अशी खोली तयार केल्यास खऱ्या अर्थाने 'Learning virtual' ठरू शकेल. वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी वाढती साधनसामग्री उपलब्ध करून देणे शिक्षणातील खूप मोठी समस्या असून शिक्षणाच्या गुणात्मकतेवर ती परिणाम करू शकते. हा विचार करून या समस्येचे निराकरण करण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे.

## ६. स्पर्धा आणि संधीची समानता

भारतीय घटनेमध्ये नमूद केलेले समता हे तत्त्व अंगीकारण्यासाठी सर्वांना समान संधी उपलब्ध करून द्याव्या लागतील. त्याचबरोबर स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी मुलांच्या वैयक्तिक गुणांचाही विकास करावा लागेल. म्हणजेच स्पर्धा आणि संधीची समानता ही दोन्ही आव्हाने शिक्षक शिक्षणाला पूर्ण करावी लागतील.

## ७. दिवसेंदिवस वाढत जाणारे दफ्तराचे ओझे

दिवसेंदिवस वाढत जाणारे दफ्तराचे ओझे ही उदयोन्मुख अशी समस्या असून तिचे निराकरण करण्यासाठी संशोधनकार्य हाती घेऊन त्यावर उपाय शोधण्यासाठी आपल्या अधिकाऱ्यांना प्रेरणा द्यावी लागेल आणि संशोधनाच्या माध्यमातून या समस्येवर योग्य तो मार्ग काढावा लागेल.

## ८. मूल्याधिष्ठित शिक्षण

समाजातील अनाचार, भ्रष्टाचार, लबाडी आणि लाचखोरी नष्ट करण्यासाठी मूल्याधिष्ठित नागरिक निर्माण करणे आज काळाची गरज बनली आहे. ही गरज भागविण्यासाठी अधिव्याख्यात्यांना मूल्याधिष्ठित शिक्षणक्रम राबवून उत्तम शिक्षक तयार करावे लागतील. असे शिक्षक विविध कृती आणि स्ववर्तनाच्या माध्यमातून मुलांमध्ये मूल्ये रुजविण्यास सक्षम ठरतील.

## ९. सर्वसमावेशक शिक्षण

असे म्हटले जाते की, 'Children that learn together learn to live together' सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे all for children for all children हे ध्येय असणारे शिक्षण म्हणजे सर्वसमावेशक शिक्षण होय. अध्ययन अकार्यक्षम बालकांना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या कार्यक्षम बनविणे हे अतिशय आव्हानात्मक कार्य असून सामान्य शाळांमधून शिक्षकाला ते करावयाचे आहे. सर्वसमावेशक शिक्षणाचे तत्त्वज्ञान म्हणजे उत्तम अध्यापन नीतींचा अवलंब, शिक्षक-विद्यार्थी यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध, समानता आणि सर्वांच्या विकासासाठी शिक्षण प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी शिक्षकाला विशेष क्षमता व कौशल्यांचा विकास करणे अपरिहार्य आहे. म्हणजे खऱ्या अर्थाने अकार्यक्षम बालकांना वेगळे शिक्षण देण्यापेक्षा शिक्षणात वेगळेपण आणणे ही शिक्षक शिक्षणासाठी कठीण. परंतु आवश्यक असणारी बाब करावयाची आहे. या बालकांना शिक्षण देण्यासाठी सामान्य शाळेत विशेष सुविधांची तरतूद करावी लागेल. आणि आधीच आर्थिक बाजू कमकुवत असणाऱ्या आमच्या शाळा-महाविद्यालयात यांना या विशेष सुविधांसाठी विशेष तरतूद करावल लागेल. अशा विविध उदयोन्मुख प्रश्नांना तोंड देण्यासाठी शिक्षकाला सज्ज व्हावे लागेल.

१०. ही सर्व आव्हाने पेलण्याकरिता अधिव्याख्याते किंवा शिक्षकांना आपल्यामध्ये उत्सुकता, सफलतेसाठी स्वातंत्र्य, संशोधनवृत्ती, भावनिक बुद्धिमत्ता आणि आपल्या व्यवसायाप्रति प्रामाणिकपणा सचोटी, जबाबदारी या गुणांचा विकास करावा लागेल. तरच भविष्यकालीन आव्हाने पेलणे शक्य होईल आणि 'राष्ट्रनिर्माण' हे शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करता येईल.

❖❖❖

# डॉ. आंबेडकरांचे शिक्षणासंबंधी विचार

**प्रा. गौतम डांगे**
जिल्हा परिषद हायस्कूल तथा कनिष्ठ
महाविद्यालय, धानोरा, जि. गडचिरोली
संपर्क : ९४२२३६१०७७

> ''व्यक्तीला जाणीव *(Realization)* देते ते शिक्षण होय.''

डॉ. आंबेडकर म्हणजे ज्ञान आणि ज्ञान म्हणजे डॉ. आंबेडकर होते. मधमाशी ही ज्याप्रमाणे मध गोळा करण्यासाठी एका झाडावरून दुसऱ्या झाडावर जाऊन मध गोळा करते त्याप्रमाणे डॉ. आंबेडकर ज्ञान गोळा करीत असत. ज्ञानाचे ते आयुष्यभर भुकेले होते. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असे ते म्हणत. डॉ. आंबेडकर यांना ज्ञानाची कधीही न संपणारी भूक/तहान लागलेली होती. आणि त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी समाजातील विषमतेविरुद्ध सामाजिक परिवर्तनासाठी एक हत्यार म्हणून केला. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील अडथळा म्हणून निरक्षरता दूर करण्यासाठी शिक्षणाचा ध्यास धरला. शिक्षण एक हत्यार म्हणून शिक्षणाचा पाठपुरावा केला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.' असा मंत्र तमाम अस्पृश्य बांधवांना दिला. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, हे त्यांनी ओळखले होते. ते नेहमी म्हणत 'सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे.' शिक्षणाचा हेतू लोकांचे नैतिकीकरण आणि सामाजिकीकरण करणे हा होता. सभ्यता आणि संस्कृती यांना शिक्षण हा पाया होता, असे त्यांनी जाहीर केले होते.

अस्पृश्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगताना म्हणत असत की, 'जातिप्रथेच्या तटबंध्यावर उघड उघड हल्ला करण्यासाठी अस्पृश्यांनी शिक्षण घेतलेच पाहिजे. आपले पोट भरण्यासाठी जगू नका. परंतु सांस्कृतिक विकासासाठी मानवी प्राणी म्हणून जगा'. असा उपदेश त्यांनी केला. आपले लोक शिक्षणाचे बाबतीत किती मागासलेले आहेत याची त्यांना पूर्णत: जाणीव होती. शिक्षणाची गरज त्यांनी ओळखली होती.

भारतीय समाजव्यवस्था जात, धर्म, वर्ण, या विविधतेवर, विषमतेवर आधारलेली आहे हे त्यांनी ओळखले होते. अशा विषम समाज व्यवस्थेविरुद्ध गौतम बुद्धांनी पहिला प्रहार केला. 'ज्ञान म्हणजे प्रकाश' अशी व्याख्या गौतम बुद्धांनी त्या काळी केली होती.

अस्पृश्यता आणि जातिभेद म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेला लागलेले रोग/कॅन्सर होत. म. फुले छत्रपती शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जातिभेद, अस्पृश्यता, निरक्षरता नष्ट करण्यासाठी स्त्री शिक्षण, कामगार चळवळ, अस्पृश्यताचे शिक्षण, विधवा विवाहाला पाठिंबा इ. बाबतीत कार्य केले. त्यांनी कृतिशील आंदोलने उभारली. शिक्षणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन विधायक आणि स्वप्नात्मक होता. शिक्षण हा सामाजिक, आर्थिक, राजकीय क्रांतीचा मूलाधार आहे असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. तुमचा उद्धार करण्यास आता एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे राजकारण, कायदा करण्याची शक्ती, पोटभर अन्न, राहण्यास जागा, प्रत्यार्जनाचे साधन मिळत नाही, याला कारण देव किंवा दैव दोन्हीही नाही. तुम्हाला अन्न, वस्त्र आणि निवारा आणि शिक्षण देणे या देशातील कायदे करणाऱ्या

**शिक्षण ही आजची गरज आहे. वेळ आली तर उपाशी रहा, पण मुलाबाळांना शिकवा. शिकेल व पचवील तोच खरा मोठा**

सत्तेचे कार्य आहे व या सत्तेचा कारभार तुमच्या संमतीने साहाय्याने आणि सामर्थ्याने चालणार आहे.

भारतातील पददलित, स्त्रिया यांच्या दैन्यावरचा रामबाण उपाय म्हणजे शिक्षणच होय. अशी त्यांची खात्री होती. मानवाला क्रियाशील बनविणं, अन्याय अत्याचाराचे विरोधात संघर्ष करणे आणि त्या ध्येयासाठी संघटन करणे म्हणजे क्रांतीचा मार्ग खुला करणं होय. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या तीन तत्त्वात डॉ. आंबेडकरांच्या सर्व शैक्षणिक विचाराचे सार आहे. शिक्षणाची संधी प्रत्येकांनी साधावी आणि या संधीचा सदुपयोग करावा हे त्यांच्या जीवन शिक्षणाचा मुख्य सूत्र होते. त्यांच्या मते 'आई-बाप मुलांना जन्म देतात. कर्म देत नाहीत हे म्हणणे बरोबर नाही.' आई-बाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात. आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली पाहिजे. तरच आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल.

शिक्षणाचं महत्त्व सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ''स्वाभिमान, स्वावलंबन, आणि आत्मोद्धार हे परिणामकारक शिक्षणाचं ध्येय होय.'' शिक्षणातूनच व्यक्तिमत्त्वाचा जन्म होतो. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय, आत्मविश्वास, आत्मआदर आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाची प्रतिष्ठा निर्माण करण्याची क्षमता शिक्षणात असणं आवश्यक आहे. स्वत:चा स्वत:नेच करावयाचा विकास म्हणजे आत्मोद्धारांची संकल्पना होय.

देशातील अस्पृश्यता, गुलामगिरी, अप्रतिष्ठा यांचे दाहक चटके बाबासाहेबांनी लहानपणापासूनच सहन केले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांची महती त्यांनी ओळखली होती. शिक्षण ही विकासाची पायवाट आहे. विकासासाठी स्वातंत्र्य त्यांना हवे होते. आणि स्वातंत्र्य हे मूल्यशिक्षणाशिवाय सापडणार नाही. याची त्यांना खात्री पटलेली होती. आत्मोद्धारासाठी स्वातंत्र्य, स्वावलंबनासाठी समता आणि स्वाभिमान प्रदान करणारी बंधुता त्यांना हवी होती. त्यासाठी त्यांनी सर्वांसाठी शिक्षण आणि सर्वांना विकासाचं स्वातंत्र्य हवं होते. त्यांचे मते, 'शिक्षण हा राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र आहे.' सामाजिक क्रांती घडवून आणावयाची असेल तर त्याची बीजे बालवयातच पेरली पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

'शिक्षण म्हणजे परिवर्तन' हे त्यांच्या शैक्षणिक विचाराचं मुख्य सूत्र होते. शिक्षण हे सामाजिक क्रांतीच प्रभावी साधन आहे, म्हणून प्रत्येकांनी शिक्षणाचा ध्यास धरावा असा त्यांचा आग्रह होता.

डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे, ''व्यक्तीला जाणीव (Realization) देते ते शिक्षण होय.'' शिक्षणाअभावी माणूस म्हणजे निव्वळ पशू होय, असे त्यांचे मत होते. उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हिनबल होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.

संत गाडगे महाराजांनी आपल्या किर्तनातून शिक्षणाचा सोपा अर्थ सांगितला. 'शिक्षणाअभावी माणूस म्हणजे निव्वळ धोंडा होय.' डॉ. आंबेडकरांनी सांगितलं होतं, 'आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरती बंदिस्त करू नका, तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंध:कार दूर होईल असं परावर्तित करा. ' गाडगे महाराज पुढे म्हणतात, 'शिक्षण ही आजची गरज आहे. वेळ आली तर उपाशी रहा, पण मुलाबाळांना शिकवा. शिकेल व पचवील तोच खरा मोठा.'

डॉ. आंबेडकरांच्या मते 'शिक्षण हे माणसाला घडवित असते. जे माणूस घडविते ते शिक्षण. शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम होय. शिक्षणाचा हेतू ज्ञान आणि चारित्र्याची निर्मिती करणे हा असावा. जी व्यक्ती आपल्या पत्नी आणि अपत्यापेक्षाही शिक्षणावर अधिक प्रेम करते त्या व्यक्तीला शिक्षणप्रेमी म्हणावे.'

संत तुकडोजी महाराज म्हणतात, 'माणूस सामूदायिक करायचा म्हणजे पहाडातील दगड एकत्र आणून बसविणे नव्हे, माणसाला माणूस म्हणून जगायचे शिक्षण द्यायचे असते.'

डॉ. आंबेडकरांच्या मते भारतात जातिभेद राहण्याचे दोन मार्ग आहेत. 'एकतर सर्वांना शस्त्रे वापरण्याची परवानगी नव्हती आणि दुसरी गोष्ट म्हणजे अज्ञान होय.'

१३ जून १९५४ रोजी मुंबईच्या भाषणात ते म्हणाले होते, ''आपण शिकलो म्हणजे सर्व काही झाले असे नाही. मात्र शिक्षणाबरोबर माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय माणसाची किंमत शून्य आहे. ज्ञान हे तलवारीसारखे आहे, तलवारीचा सदुपयोग करायचा की दुरूपयोग करायचा हे माणसाच्या शीलावर अवलंबून असते. तलवारीने एखाद्याचा खूनही करील किंवा एखाद्याचा बचावही करील. शिकलेली माणसे केवळ पोटभरू असून चालणार नाही. ज्यांना स्वार्थापलीकडे काही दिसत नाही, ज्यांना थोडाही परमार्थ करता येत नाही ती माणसे नुसती शिकली म्हणून काय झाले ? ज्ञान हे जीवनाला अत्यंत आवश्यक आहे. ज्ञान नसल्यामुळे मानवाचे फार मोठे नुकसान होत असते. म्हणून ज्ञान/शिक्षण सर्वांनी घेतलेच पाहिजे.'' शिक्षण हे मानवी सभ्यता आणि संस्कृतीचा खरा पाया करण्यासाठी ज्ञान आणि चारित्र्य यांची एकता त्यांना अपेक्षित होती.

१९२४ मध्ये अस्पृश्यांच्या उद्धारासाठी डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. वसतिगृहे उघडून दलित वर्गांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, वाचनालये, समाजकेंद्रे, आणि अभ्यास मंडळे उघडून दलित वर्गात संस्कृतीच्या प्रसाराचे प्रचालन करणे, औद्योगिक आणि कृषिशाळा उघडून दलित वर्गाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करणे ही या सभेची उद्दिष्टे होती.

१९२५ मध्ये दलित वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे वसतिगृह सुरू केले. कपडे, लेखन सामुग्री, भोजन खर्च त्यांनी स्वत: केला.

१९२८ मध्ये दलित शिक्षण संस्थेची स्थापना (Depressed Classes Education Society) केली व दलित वर्ग शिक्षण संस्थेला साहाय्य करण्याचे आवाहन मुंबई शासनाला केले.

अनुसूचित जातीमध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ८ जुलै, १९४५ रोजी 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. २० जुलै १९४६ रोजी सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरू केले. भारतात बौद्धिक, सामाजिक, नैतिक लोकशाहीची उभारणी करणे हा या सोसायटीचा हेतू होता. १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलींद कला व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. १९४६ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ विधी महाविद्यालय स्थापन केले. वंचित लोकांच्या उद्धारासाठी त्यांनी करुणेने आपल्या ज्ञानाचा उपयोग केला. शिक्षणानेच माणसाचे व्यक्तिमत्त्व फुलते. शिक्षणाशिवाय माणूस आपली कोणतीच प्रगती करू शकत नाही हे त्यांना ठाऊक होते. शिक्षण हे उच्चवर्गीयांची मक्तेदारी झालेले होते. आत्मोद्धारासाठी शिक्षण आवश्यक आहे. हे डॉ. आंबेडकरांनी लोकांना पटवून दिले.

शिक्षण माणसाची शोषणापासून मुक्तता करते. बरे काय ? वाईट काय ? याची पारख करता येते. ज्या समाजात निरक्षरता, अज्ञान, शिक्षणाचा अभाव आहे तो जनसमुदाय पशुत्वाच्या पातळीवर जगत असतो. अशा ज्ञानापासून पारख्या आणि संस्कृतीपासून पोरक्या झालेल्या जनसमुदायात दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, परंपराचा अभाव, मानवी संस्कृतीचा अभाव दिसून येतो. अशा ज्ञानहिन समुदायात चारित्र्यहिनता व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचा अभाव दिसून येतो. अशा शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजाला शिक्षण मिळायला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

शिक्षणाचे महत्त्व सांगताना बाबासाहेब म्हणतात, 'माणसाने नेहमी माणसासारखे वागावे' हा त्यांचा एक साधा सिद्धांत होता. शिक्षणाने माणूस मोठा होतो. त्याचे मन आणि बुद्धी प्रगल्भ होते. 'मी मोठा कसा झाले, असे जर मला विचारले तर मी सांगेन शिक्षणाच्या उज्ज्वल संस्काराने.'

शिक्षणातून माणसे निर्माण झाली पाहिजेत. ज्ञानासारखे या जगात दुसरे काही पवित्र व श्रेष्ठ आहे काय ? माणूस बनविणे हेच खरे शिक्षण. बाबासाहेब लोकशिक्षणाचे एक शिल्पकार होते. ते म्हणत 'माझ्या तत्त्वज्ञानाची मुळे धर्मात आहेत, राज्यशास्त्रात नाहीत, फक्त तीन शब्दात माझे तत्त्वज्ञान गुंफले आहे. समता, स्वातंत्र्य व बंधुत्व. मानवता हेच धर्माचे दुसरे नाव. बहुजन समाजाच्या शिक्षणातच देशाचे भाग्य लपलेलं आहे. माणसा माणूस हो, माणसासारखा वाग. यामध्येच शिक्षणाचा अर्थ आहे. शिक्षण घेतलेल्या माणसाने समाजातील अज्ञान दूर करावे. आम्ही आमच्यातील आत्मविश्वास गमावता कामा नये. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात संधीची लाट येते. तिचा उपयोग केला तर माणूस वैभवाला जातो हे त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. त्यांचे जीवन एक ज्ञानयज्ञ होते. संकटांना डगमगू नकोस, परिस्थितीवर मात कर, तू एक योद्‌धा आहेस. असे विचार त्यांना स्फूर्ती देत असत. अभ्यास, वाचन व व्यासंग हा त्यांचा जीवनआत्मा होता.'

सर्व बहुजन समाजांनी बाबासाहेबांच्या ज्ञानसाधनेचा आदर्श स्वीकारावा, त्यांच्या शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोनाचा आदर करावा. बाबासाहेब एक ज्ञानज्योत होती. त्या ज्योतीने लाखो लोक / दिवे उजळले गेले. बाबासाहेब म्हणजे माणूस घडविणारी, माणसांना माणूसपणा शिकविणारी, एक संजीवक शक्ती होती. डॉ. आंबेडकर हे दलितांच्या जीवनाचे जसे शिल्पकार होते तसे नवभारताच्या घटनेचे शिल्पकारही होते. आणि त्याहूनही श्रेष्ठ म्हणजे ते ज्ञानमहर्षी होते.

❖❖❖

## माणसं आपलीशी करा

- माणसांशी गोड बोला, एका गोड शब्दाइतका आनंद जगामध्ये कशातही नाही. म्हणून माणसांशी गोड बोला.
- हृदयाशी मैत्री करा आणि मदत करा. नवे मित्र जोडत चला.
- जे जे करावयाचे ते अगदी आनंदाने करा. मनापासून करा. आहे त्या परिस्थितीत राहून आनंद शोधणं, ही एक जीवनकलाच आहे.
- शाबासकी देताना कंजुषी करू नका. टीका करताना मात्र जाणीवपूर्वक विचार करा.
- प्रत्येक प्रश्नाला तीन बाजू असतात, स्वत:ची, दुसऱ्याची आणि योग्य, दुसऱ्यांच्या मतांचा विचार करा.
- खेळकरपणा आणि विनोदबुद्धी तुमच्याजवळ असू द्या, आणि महत्त्वाचे म्हणजे लोक संग्रहासाठी नम्रता हवीच.
- खळखळून हसा, राग दाखवायला ७२ स्नायू लागतात, हसायला फक्त १४.
- मित्राला नावाने (किंवा टोपण नावाने) हाक मारा, दुसऱ्या कुठल्याही शब्दापेक्षा माणसाला स्वत:चे नाव ऐकणे जास्त मधुर वाटते.
- माणसांमध्ये आस्था दाखवा, प्रयत्न करा. प्रत्येक माणसात आवडण्यासारखं काहीतरी सापडेल.
- लोकांच्या भावनांची कदर तर कराच पण आपलेपणाने वागा. लोक स्वत:हून आपल्याजवळ येतील.
- दुसऱ्याची कामे ताबडतोब करा, माझ्यासाठी यानं काय केलं हीच गोष्ट माणूस पाहत असतो.

**नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००४

## उच्च माध्यमिक व शालांत प्रमाणपत्र परीक्षा

### जाहीर प्रकटन

**संदर्भ : इ.११वी व १२वी ची पाठ्यपुस्तके उर्दू माध्यमात भाषांतर करण्याबाबतचे दि. २१/०६/२०१३ चे प्रकटन पहावे.**

मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे दि. ३/११/२०१४ च्या आदेशानुसार मंडळामार्फत इ. ११वी व १२वी च्या इंग्रजी व मराठी माध्यमाव्यतिरिक्त ज्या माध्यमातून मंडळाने भाषेतर विषयांची उत्तरपत्रिका लिहिण्याची सुविधा दिली आहे व ज्या भाषेतर विषयांच्या माध्यमाची पाठ्यपुस्तके मंडळ तयार करीत नाही अशा माध्यमात पाठ्यपुस्तके भाषांतर करून पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी इच्छुक असलेल्या खाजगी प्रकाशकांकडून खालील अटींच्या अधीन राहून प्रस्ताव मागविणेबाबत प्रकटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१. मंडळामार्फत मराठी/इंग्रजी माध्यमातून तयार करण्यात आलेली पाठ्यपुस्तके प्रमाणभूत मानून अचूक भाषांतराची कार्यवाही मंडळ विनियम १९७७ मधील नियम क्र.१७ नुसार करावयाची आहे. भाषांतर करून पाठ्यपुस्तके सादर करण्यास इच्छुक असणाऱ्या लेखकांना किंवा प्रकाशकांना राज्य मंडळाच्या सचिवांकडे त्यांच्या नावाची नोंदणी करावी लागेल. अशा नोंदणीकरिता १० वर्षांसाठी रक्कम रुपये १५,०००/- अथवा राज्यमंडळ वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे शुल्क भरावे लागेल. तसेच पाठ्यपुस्तक मंजूर करण्यासंदर्भातील सर्व अटींचे पालन करावे लागेल. ज्या लेखकांकडून किंवा प्रकाशकांकडून नावे नोंदविलेली नाहीत अशा लेखकांकडून किंवा प्रकाशकांकडून सादर करण्यात आलेल्या पुस्तकांचा विचार केला जाणार नाही.

२. पाठ्यपुस्तकातील मजकूर, आशय, पाठ्यांश, चित्रे, आकृत्या व नकाशे इ. मंडळामार्फत मराठी/इंग्रजी माध्यमातून प्रकाशित केलेल्या पुस्तकातून प्रमाणभूत मानून अर्थ न बदलता जसेच्या तसे भाषांतर होणे आवश्यक आहे. सदर भाषांतर करताना कोणत्याही त्रुटी राहू नयेत याची दक्षता प्रकाशकांनी घ्यावी. नकाशाच्या आंतरराष्ट्रीय सीमांबाबत सर्व्हे ऑफ इंडिया, डेहराडून यांची अधिकृत मान्यता घेणे आवश्यक राहील.

३. उर्दू व इतर माध्यमात भाषांतर करून पाठ्यपुस्तके मंडळास सादर केल्यानंतर तज्ज्ञ व अभ्यासमंडळाकडून त्यांची छाननी/तपासणी करण्यात येईल. प्रत्येक पुस्तकामागे छाननी शुल्क रुपये १०,०००/- यासह पुस्तकांच्या बारा मुद्रित प्रती सचिव, राज्यमंडळ यांचेकडे (विनामूल्य) सादर कराव्या लागतील.

४. पाठ्यपुस्तकातील राज्यमंडळ अध्यक्षांची प्रस्तावना/मनोगत खाजगी प्रकाशकांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये छापता येणार नाही. तसेच मंडळातील राजपत्रित अधिकारी, मंडळ अधिकारी आणि अभ्यासमंडळ सदस्य यांची नावे पाठ्यपुस्तकामध्ये छपाई करण्यास मान्यता देता येणार नाही.

५. खाजगी प्रकाशकांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित, अर्थशास्त्र, इतिहास आणि भूगोल इ. विषयांच्या तांत्रिक व शास्त्रीय संज्ञाची काळजी आपल्या स्तरावर घेण्यात यावी.

६. सदर पाठ्यपुस्तके मंडळास सादर केल्यानंतर भाषांतरकार तसेच अभ्यासमंडळाच्या छाननी व शिफारशीनंतर मंडळाकडून ती प्रमाणित करण्यात येतील.

७. खाजगी पाठ्यपुस्तकासाठी मंडळाचा लोगो (बोधचिन्ह) वापरता येणार नाही.

उपरोक्तनुसार ज्या खाजगी प्रकाशकांना पुस्तके प्रकाशित करावयाची आहेत, त्यांनी मंडळाकडे विहित शुल्क भरून नाव नोंदणी करावी.

सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे ४११ ००४.

दिनांक : २६/११/२०१४

प्रतिक्रिया

# एक आठवण ...

ऑक्टोबर महिन्याचे 'शिक्षण संक्रमण' हातात मिळाले. खरं तर हा अंक हातात आला की पूर्ण वाचल्याशिवाय चैनच पडत नाही. परंतु सुट्टी लागल्यानंतर घरातील दिवाळीची तयारी आणि पेपर तपासणे या दोन कामांमुळे अनुक्रमणिका व अध्यक्षांचे मनोगत वाचले आणि कामातून वेळ काढून अंक निवांतपणे वाचू म्हणून तो व्यवस्थित ठेवला. पेपर तपासण्याचे काम झाले अन् अंक वाचण्यास घेतला तोच त्यातील एका निवेदनावर माझी नजर गेली. 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे च्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्ताने आपल्या आठवणी व अनुभव पाठवा' हे सोनवणेसाहेबांनी दिलेले निवेदन वाचताच माझं मन भूतकाळात डोकावलं आणि माझ्या शिक्षकी पेशातील आणि जीवनातील एक अविस्मरणीय घटना मला आठवली की जी मी बऱ्याचवेळा इतरांना सांगते.

मी १९९५ पासून विठामाता विद्यालय, कराड येथे उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहे. १९९७ पासून दहावीचे विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे बोर्डाचे पेपर तपासते. २००४ साली च्या शिक्षकांच्या नवोपक्रम स्पर्धेत माझा जिल्हा व राज्यस्तरावर नंबर आला आणि कृतिसंशोधनासाठी निवड झाली. कृतिसंशोधनासाठी ३००० रु. शिष्यवृत्ती मिळाली व ३१ मार्चपर्यंत कृतिसंशोधन तीन प्रतीत पुणे येथे पाठवायचे होते. खरं तर मार्च महिना म्हणजे बोर्डाच्या कामाचा महिना. शाळेत बोर्ड परीक्षा चालू, बोर्डाचे पेपर तपासण्यासाठी आलेले, त्याचबरोबर अहवालाची गडबड चालू होती. बोर्डाचे पेपर तपासत असतानाच शिपाई आला, बाई तुमची मनीऑर्डर आली आहे. पोष्टमन थांबला आहे लवकर या असे सांगून गेला. जाऊन पाहते तर 'शिक्षण संक्रमण' मध्ये माझा फेब्रुवारी महिन्यात एक लेख प्रसिद्ध झाला होता त्याचे बोर्डाकडून मानधन आले होते. या सर्व गोष्टीमुळे माझ्या डोक्यात बोर्ड आणि बोर्डच होतं. त्याचा परिणाम असा झाला की की कृतिसंशोधन अहवाल पाठविण्यासाठी पोष्टात गेले आणि पुणे च्या ऐवजी महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे हा पत्ता लिहून पाठवून दिले.

बोर्डाचे पेपर तपासून झाले, कृतिसंशोधन पूर्ण झाले. मनावरचे खूप मोठे ओझे कमी झाले. या आनंदातच शाळेच्या परीक्षेच्या कामास सुरुवात केली. शाळेच्या परीक्षा झाल्या आणि साधारण २८ एप्रिलच्या दरम्यान माझ्या नावावर बोर्डाचे एक पाकीट आले. आता आणखी काय बोर्डाचे काम आले म्हणून जरा नाराजीनेच मी ते पाकीट फोडले, आतील पत्र वाचले अन् एक क्षण माझा स्वत:वरच विश्वास बसेना. मी कामाच्या गडबडीत केवढी मोठी चूक केली होती. पण बोर्डातील लोकांनी अगोदर ती बिनभोबाट दुरुस्ती केली होती आणि मग मला कळविली होती. मी चुकीच्या पत्त्यावर कृतिसंशोधन पाठविले आहे हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर ला एक पत्र व माझे कृतिसंशोधन त्यांनी लगेच पाठवून दिले होते व त्याच पत्राची एक माहितीप्रत मला पाठविली होती.

ही गोष्ट मला माझ्या आयुष्यात कसे वागावे हे शिकवून गेली. खरंच बोर्डाने दाखविलेली ही माणुसकीची झलक मी कधीच विसरू शकणार नाही. आज मी विज्ञान-तंत्रज्ञान अभ्यासमंडळाची सदस्य म्हणून सतत पुण्याला बोर्डामध्ये जाते आणि तेथे काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिमध्येच ही माणुसकी अनुभवते.

- डॉ. विश्रांती निकम-देसाई
उपशिक्षिका विठामाता विद्यालय, कराड

***

## प्रतिक्रिया ...

Shikshan sankraman of November 2014, with 114 pages is really special for the English teachers. The team of contributors of this special issue have given us the push up, by guiding us in the best manner . Dr. U.D.Pradhan (Convener) Board of studies in English (Secondary) and Smt.Shaileja Mulay have guided me before when this new syllabus was to be brought into practice. This activity based curriculum is todays very necessity, as it confirms on the mind of the student. The step wise explanation can make the teacher study deeply and go to the roots of it. They themselves should try hard. A.P.J. Abdul Kalam has rightly said " Only lesser work gives trouble not more work ", is really true. Being an international language ,window to the world,we have to study it from the root level, and also know its importance. The students should gain self confidence and remove the fear of English language from their mind. No subject is difficult,the way to see it is the matter. No child is a learned person from birth. When we come in this world we have to learn many things. Just this monthly subscription will really give us a boost in teaching and promise to progress from all over. I really thank all the English convener for printing about the English language.

***- Mrs. Waichal( Nazare) Pallavi***

Kuchan Prashala, Solapur.

## प्रतिक्रिया ...

माहे नोव्हेंबर २०१४ चा अंक वाचला. 'शिक्षण संक्रमण' अंक अतिशय दर्जेदार व वाचनीय आहे. अंकामध्ये 'भारताचे संविधान' (२६ नोव्हेंबर संविधान दिन) श्री. सोनवणे साहेब यांनी लिहिलेला अंक अतिशय वाचनीय आहे. लेखामध्ये भारतीय लोकशाहीबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चिंतन-मंथनातून भारतीय राजकारणाला, समाजकारणाला दिशा देण्याचा असामान्य प्रयत्न लेखामधून केला आहे. 'स्त्रियांचा कैवारी व शोषितांचा मुक्तीदाता' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य गुणगौरव रूपाने सादर केले, अतिशय माहितीपूर्ण व उपयुक्त आहे.

तसेच डॉ. उमेश प्रधान सरांनी लिहिलेला 'शैक्षणिक उपक्रमशीलता' हा लेख शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक आहे. शिकणे ही एक सातत्यपूर्ण क्रिया आहे. शिक्षकांनी दैनंदिन अध्यापनाला उपक्रमांची जोड दिल्यास अध्यापन रंजक, तणावरहित आनंददायी होऊ शकते. याविषयी अनमोल मार्गदर्शन होते. अतिशय आवडला. शिक्षण संक्रमण मधील लेख आम्हाला नेहमीच मार्गदर्शक ठरावे ही अपेक्षा. शिक्षकांचे हक्काचे 'ज्ञानपीठ' व्हावे ही मनोकामना !

**- एस. डी. दामोदरे**

जनता हायस्कूल, हरम, ता. अचलपूर

## प्रतिक्रिया ...



ज्ञान मंदीर हे सर्वांसाठी सदा खुले ।
ज्ञानवंत, बुद्धीवंत, येथूनच पुढे गेले ।।
१०वी/१२वी परीक्षेचा, येथे रचतो पाया ।
येथील गुणवत्ता वाखाणली योग्य ठरली सर्व उपाया।।
याचे सर्व श्रेय आहे येथील पूर्व इतिहासा ।
होतात प्रयोग शिक्षणाचे, त्यावर आहे प्रशासकीय ठसा ।
सेवा येथील आहे, खऱ्या समाज जीवनाची ।
घडते सेवा ज्ञानाची व देशातील भाव भावनांची ।
सुवर्ण महोत्सवाचे निमित्ताने, चिंतीतो शुभ कामना ।
मंडळ रहावे शाश्वत, त्याचा सुवर्ण इतिहास, कळो साऱ्या जना।।

**- श्री. अशोक वाघमारे**
निवृत्त वरिष्ठ अधिक्षक,
पुणे विभागीय मंडळ, पुणे, दिघी, पुणे १९.

माहे नोव्हेंबर २०१४ चा शिक्षण संक्रमण अंक हातात पडला. त्याचे पूर्ण अवलोकन करण्यात आले. मुखपृष्ठापासून तर शेवटच्या पानापर्यंत त्यात सामाजिक, वैचारिक व सांस्कृतिक विचार दिसून आला. मात्र मुखपृष्ठावरील चित्र अत्यंत बोलके असून भारताचे माजी प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिप्रेत असणारी देशातील मुले जशी गुलाबाची फुले टवटवीत मुले फुलांसह आकर्षक दिसत असून लक्ष वेधून घेत आहेत.

अंकातील काही लेख उदा. शिक्षण दिनाच्या निमित्ताने भारताचे संविधान, बालदिन, भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले हे लेख विशेष वाचनीय आहेत, त्यामुळे अशा अनेक लेखांसह शिक्षण संक्रमणची उंची वृद्धिंगत होते, त्यामुळे नेहमीच अशा लेखांना प्राधान्य देऊन अंक दिशादर्शक ठरावा हीच शुभेच्छा !

**- प्रा. विनोद मेश्राम**
महेंद्र विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बेला(भंडारा)



गेल्या पन्नास वर्षांतील या मंडळाची प्रगती अगदी जवळून पाहणारा मी एक साक्षीदार आहे. याचा मला अभिमान वाटतो. शास्त्र विषयाचा परीक्षक, विशेष-शिक्षण अभ्यासमंडळाचा अध्यक्ष, मंडळाच्या 'शिक्षण संक्रमण' मासिकाचा संपादकीय-सदस्य, कार्यकारी मंडळ सदस्य इ. अनेक अधिकारमंडळांवर काम करण्याची संधी मला प्राप्त झाली आहे.

एवढेच नाही तर मंडळाचे अनेक अध्यक्ष हे माझे विद्यार्थी होते. मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये, विशेषत: मूल्यमापन, संशोधन, पाठ्यपुस्तके-लेखन, विषय-शिक्षकांचे उद्बोधन, देशातील आणि परदेशातील शिक्षणतज्ज्ञांचे मार्गदर्शन, शिक्षकांच्या संशोधनप्रकल्पाला मार्गदर्शन यासाठी मला मंडळाच्या कामकाजामध्ये भाग घेता आला हे मी माझे भाग्य समजतो.

आपल्या मंडळाने आपल्या कामाचा दर्जा सतत उच्चतम ठेवून महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाला कायम प्रगतिपथावर ठेवले आहे.

**- प्रो. श्रीधर पाटणकर**
१५, राजलक्ष्मी, कर्वेनगर, पुणे ५२.